Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# चंद्रपूर महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.

महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ४५ * अंक १९६ * * चंद्रपूर * | बुधवार, दिनांक ८ जानेवारी २०२५ | ८ पाने ● किंमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## अग्राग्रलेख
## खरीखरी..


# प्रवचनकार आयुक्त

आपल्या भारताचे निवडणूक आयुक्त कवी हृदयाचे अत्यंत स्पष्टवक्ते आणि कोणालाही विनाकारण नाराज न करणारे असे महान अधिकारी आहेत. आज त्यांनी दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीच्या तारखांची घोषणा केली. भारताच्या 1947 नंतरच्या सर्व निवडणूक तारखांची घोषणा करताना कोणत्याही निवडणूक आयुक्तांनी यापूर्वी शेरोशायरी केली नव्हती. त्या सर्व पूर्व निवडणूक आयुक्तांनी जे अजून तरी हयात आहेत. अशा सर्वांना आमची नम्र विनंती आहे की, निवडणूक घोषित करण्यासारख्या रुक्ष विषयाशी आपले हे आयुक्त साहेब कविता ओतताच आणि पत्रकारांना त्यांच्या रसभरीत वाणीमुळे मनोरंजनाचा खजिना मिळतो. कधी कधी तर हे आयुक्त प्रवचनकार वाटतात. यापूर्वी निवडणूक आयुक्त अनेक झाले. पण ज्यांची कायम आठवण येते. असे निवडणूक आयुक्त टी एन शेषन साहेब होते. आता ते शेष नाहीत. पण आपले आताचे निवडणूक आयुक्त लवकरच निवृत्त होणार आहेत, ते विशेष आहेत. आजच्या त्यांच्या काव्य पंक्तींची बहारदार वाणी ऐकून सर्व पत्रकारांना आणि श्रोत्यांना धन्य धन्य वाटले असेल. आपल्या मराठीतील एका जुन्या कवीने म्हटले आहे की, 'साध्या विषयाशी कधी आशय मोठा आढळे' म्हणजेच साध्या साध्या विषयातली काव्यात्मकता आणण्याचा आपल्या निवडणूक आयुक्तांकडे जो महागुण आहे त्याचे कौतुक केले पाहिजे. आम्ही तर म्हणतो की, 'झाले बहु होतील बहु, परंतु यासम हा' अशा किर्तीवंत आयुक्तांना लवकरात लवकर सेवानिवृत्तीची नोटीस मिळाली असेल. तर त्यांना किमान पाच वर्षासाठी मुदतवाढ दिली पाहिजे. म्हणजे देशाला त्यांच्या ओथंबून राहिलेल्या काव्य प्रतिभेचे वारंवार दर्शन होईल. आम्हाला नवल याचे वाटते की, हे निवडणूक आयुक्त आतापर्यंत लपून कसे काय राहिले. त्यांच्या कार्यालयात काम करताना ते दररोज आपल्या काव्यमय वाणीने सर्व अधिकाऱ्यांना मोहित करीत असतील. या आयुक्तांसारखे सकारात्मक विचार करणारे आयुक्त असले म्हणजे सर्व समस्यांचा आपोआप निपटारा होतो. तुम्ही विरोधी पक्षात असला आणि जर काही तक्रार केली. तर मग ती कितीही गंभीर असेल तरी त्यावरही आपले निवडणूक आयुक्त साहेब काव्यमय भाषेत कोणाचेही मन न दुखावता त्या तक्रारीलाही शांतपणाने केराची टोपली दाखवतात. त्यामुळे आपल्या देशात निवडणुकीचा कार्यक्रम म्हणजे एखाद्या धार्मिक सणासारखा वाटतो. कुठेही गडबड अथवा गोंधळ न करता जेव्हा आपले 'मर्मज्ञ' निवडणूक आयुक्त राजीव कुमार जेव्हा काही म्हणतात. तेव्हा त्यांचे मर्म आपण समजून घेतले पाहिजे. भारतासारख्या अवाढव्य देशाच्या निवडणूक आयुक्ताला डोक्यावर थंड पाण्याचे मडके घेऊनच वागावे लागते, असे आपल्या आयुक्त साहेबांना वाटते. भगवान श्रीकृष्णाने गीतेत म्हटले आहे की सुखदुःखे समेकृत्वा, लाभालाभौ जयाजयौ म्हणजे सुखात असो की दुःखात असो. विजयात असो वा पराजयात असो माणसाने कसे स्थितप्रज्ञ राहीले पाहिजे. याचेच निरुपण आणि उपदेश आपले आयुक्त साहेब करतात. थोर संत महंतही आपल्या या अतिथोर आयुक्तांकडून उपयुक्त असा उपदेश यापुढे ग्रहण करू शकतील. बहुधा त्यांच्या कार्यकाळातील दिल्लीच्या निवडणुकीची अधिकृत घोषणा शेवटची असेल. त्यापुढे त्यांचे दर्शन दूरदर्शन वर तरी होईल की नाही, याची चिंता आम्हाला लागून राहिलेली आहे. म्हणूनच आम्ही अत्यंत खुल्या अंतकरणाने असे म्हणतो की, त्यांच्या सेवा कार्यकालाचा व त्यांचा सन्मान वाढवावा. आता दिल्लीची निवडणूक मोठी अटीतटीची आहे, अतिशय कटकटीची आहे. त्यासोबतच फट-फटीचीही आहे. पण आपले आयुक्त साहेब या पवित्र त्रिवेणी संगमाच्या नदीतून निकालाची नौका सुखरूपपणे बाहेर काढतील यात शंका नाही. अशा या कवी मनाच्या प्रवचनकारी आयुक्तांना आमच्या खूप खूप शुभेच्छा !

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### व्हायरसचे थैमान : राज्यातील आरोग्य विभाग तयारीत

# भारतात हाय अलर्ट



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई / नागपूर, दि. ७ :

कोरोना नंतर आता चीनमध्ये एचएमपीव्ही व्हायरसने थैमान घातले असून, भारतात देखील हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

भारतात या विषाणूचे काही रुग्ण आढळून आले असून त्यात नागपूर मध्ये दोन रुग्ण आढळले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील आरोग्य विभाग अलर्ट मोडवर आला आहे. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी नागरिकांना काळजी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, हा विषाणू यापूर्वीपासूनच अस्तित्वात आहे. मात्र चीनमध्ये त्याची संख्या झपाट्याने वाढली असल्याने काळजी घेतली जात आहे. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या असून, संपूर्ण आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर आली आहे. आरोग्य विभागातील कर्मचारी नागरिकांना काळजी घेण्याच्या योग्य त्या सूचना देत आहेत. मात्र नागरिकांनी घाबरण्याचे काहीही कारण नाही. केवळ प्रतिकारशक्ती कमी असणाऱ्या नागरिकांनी अधिक काळजी घेण्याची आवश्यकता असल्याचे आबिटकर म्हणाले.

दरम्यान नागपूर मधील ७ वर्षांचा मुलगा आणि १३ वर्षांच्या मुलीला या विषाणूची लागण झाली आहे. या दोघांमध्ये खोकला आणि तापासारखे लक्षणे दिसून आली होती. त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्याची आवश्यकता पडली नाही. हे दोन्ही रुग्ण आता बरे झाल्याची माहिती समोर आली आहे.

### महाराष्ट्रासह कर्नाटक, तामिळनाडू, बंगाल, गुजरातमध्ये संसर्ग

एचएमपीव्ही विषाणूची आतापर्यंत ८ प्रकरणे भारतात आढळून आली आहेत. त्यात महाराष्ट्रासह इतर काही राज्यात रूग्ण संख्या नोंदविण्यात आली. कर्नाटकमध्ये ३ महिन्यांची मुलगी आणि ८ महिन्यांच्या मुलामध्ये हा विषाणू आढळला होता. दोन्ही मुलांची बंगळुरू येथील रुग्णालयात तपासणी करण्यात आली. पश्चिम बंगालमध्येही ५ महिन्यांच्या मुलामध्ये या आजाराची लक्षणे आढळून आली आहेत. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तामिळनाडूमध्येही २ मुलांना संसर्ग झाल्याचे आढळून आले आहे. अहमदाबादमध्ये २ महिन्यांच्या मुलामध्ये ह्यूमन मेटापन्यूमोव्हायरस संसर्ग आढळून आला. हा मुलगा राजस्थानचा असून उपचारासाठी अहमदाबादला पोहोचला होता.

केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा म्हणाले की, आरोग्य विभागाची यंत्रणा परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे आणि लवकरच अहवाल शेअर केला जाईल.

### नागरिकांचे जीवन सुकर होण्यासाठी

# तातडीने सुधारणा करा

### देवेंद्र फडणवीसांचे अधिकाऱ्यांना आदेश
### मुख्यमंत्र्यांचा ७ कलमी कृती कार्यक्रम



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना ७ कलमी कृती कार्यक्रम निश्चित करून दिला आहे. मुख्यमंत्र्यांनी आज राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलिस आयुक्त आणि पोलिस अधीक्षक यांच्याशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला.

यावेळी त्यांनी प्रशासनाला येत्या १०० दिवसात प्राधान्याने करावयाची कामे यावर सविस्तर चर्चा केली आहे. तसेच या बैठकीत दिलेल्या सूचनांवर पुढे काय झाले यावर १५ एप्रिल २०२५ रोजी आढावा घेतला जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे.

या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह सर्व मंत्री उपस्थित होते. फडणवीस म्हणाले, आपल्या कार्यालयाचे संकेतस्थळ सुसज्ज करा, माहिती अधिकार कायद्यानुसार मागितली जाईल अशी सर्व माहिती अगोदरच संकेतस्थळावर उपलब्ध करून द्या. संकेतस्थळ सायबरदृष्ट्या सुरक्षित करा. शासकीय कार्यालयांची स्वच्छता करा, अनावश्यक कागदपत्रे काढून टाका, खराब आणि वापरात नसलेली वाहने निर्लेखित करावीत, असे आदेश फडणवीस यांनी दिले आहेत.

पुढे सूचना देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह स्वच्छ राहतील, हे सुनिश्चित करा. अधिकाऱ्यांच्या अचानक भेटी होतील, त्यावेळी ते स्वच्छ दिसले पाहिजे. नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे यासाठी किमान दोन सुधारणा, नावीन्यपूर्ण उपक्रम आपल्या कार्यालयात राबवण्यात यावेत. प्रलंबित कामांची संख्या शून्यावर कशी येईल, याचा प्रयत्न करा. अधिकारी नागरिकांना कधी उपलब्ध असतील याची माहिती फलकावर नमूद करा, अशा सूचना फडणवीस यांनी दिल्या आहेत.

विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी संबंधित विभागांचे अधिकारी आणि उद्योजक यांच्याशी संवाद साधावा, असेही फडणवीस यांनी सांगितले.

### मुख्यमंत्र्यांनी टोचले अधिकाऱ्यांचे कान

नागरिकांचे स्थानिक पातळीवर सुटू शकतील असे प्रश्न, समस्या या तालुका, जिल्हा स्तरावरच सोडवावेत. पण हे होत नसल्याने मंत्रालयात गर्दी होते, असे म्हणत मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांचे कान टोचले. हे टाळण्यासाठी लोकशाही दिन सारखे उपक्रम प्रभावीपणे राबवले जावेत. राज्यातील विविध ठिकाणी गुंतवणुकीसाठी उद्योजक येतात. त्यांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे निर्देश फडणवीस यांनी दिले.

### मंत्री धनंजय मुंडे यांना तात्पुरते अभय

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उशिरा रात्री विशेष बैठक घेतली, ज्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या संदर्भात चर्चा झाली.

मुंडेविरोधातील आरोप आणि त्यावरून उफाळलेले वाद लक्षात घेता, या प्रकरणाचा तपशीलवार आढावा घेण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत मुंडेंवर झालेल्या आरोपांमुळे सरकारची प्रतिमा डागाळू नये, यासाठी योग्य रणनीती आखण्यावर भर देण्यात आला.

अजित पवार यांनी मुंडेंना पाठिंबा दर्शवत प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य बाहेर आणण्याची मागणी केली. माध्यमांमधील चर्चा आणि अपप्रचारांवर आधारित कोणतेही निर्णय घेऊ नयेत. दुसरीकडे, फडणवीस यांनी आरोपांची गांभीर्याने दखल घेण्याची गरज व्यक्त केली. सरकार या प्रकरणी कोणती भूमिका घेणार आणि मुंडेंवर कारवाई होणार का, याकडे लक्ष लागले आहे.

### १ एप्रिल पासून सर्व वाहनांना

# फास्ट टॅग अनिवार्य

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :

राज्यातील वाहनधारकांच्या दृष्टिकोनातून राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. आता १ एप्रिल २०२५ पासून राज्यामध्ये सर्व वाहनांना फास्ट-टॅग अनिवार्य करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाच्या आज पार पडलेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

राज्य मंत्रिमंडळाने आज अनेक निर्णय घेतले. शासनाच्या प्रचलित सार्वजनिक खाजगी सहभाग धोरण - २०१४ मध्ये सुधारणा करण्यात येणार असून, महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीत सुधारणा करणार आहे. शासकीय कारभार अधिक पारदर्शक, गतिमान, लोकाभिमुख करण्यासाठी बदल करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

मंत्रिमंडळापुढे आणावयाची प्रकरणे, मुख्यमंत्री तसेच राज्यपाल यांच्या मान्यतेसाठी सादर करावयाची प्रकरणे, मंत्रिपरिषद व मंत्रिमंडळाची कार्यपद्धती इत्यादी बाबींसंदर्भात तरतुदी करण्याचा निर्णय सुद्धा यावेळी घेण्यात आला.

एचएमपीव्ही व्हायरसचे रूग्ण देशात आणि महाराष्ट्रात आढळत असून, या पार्श्वभूमिवर मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा झाली.

### दिल्ली विधानसभा निवडणुकीची घोषणा

#### ५ फेब्रुवारीला मतदान : ८ फेब्रुवारीला निकाल



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :

दिल्लीत एकाच टप्प्यात ५ फेब्रुवारीला विधानसभा निवडणुका होणार आहेत. ८ फेब्रुवारीला निकाल लागणार आहे. निवडणूक आयोगाने ही माहिती दिली. तत्पूर्वी, मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी निवडणूक प्रक्रियेतील अनियमिततेच्या आरोपांवर ३० मिनिटे तथ्यांसह स्पष्टीकरण दिले.

राजीव कुमार यांनी सांगितले की, दिल्लीत ३३ हजार ३३० मतदान केंद्रे आहेत. दिल्लीत ८३.४९ लाख पुरुष, ७९ लाख महिला मतदार असून, ८ लाख नवीन मतदार आहेत. ८३० मतदार १०० वर्षांपेक्षा जास्त वयाचे आहेत.

### भारतपोल पोर्टल सुरू



■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. ७ :

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी सकाळी दिल्लीत भारतपोल पोर्टल लाँच केले.

ते म्हणाले, भारतपोल आपल्या देशाचा आंतरराष्ट्रीय तपास एका नव्या युगात घेऊन जाईल. पूर्वी सीबीआय ही एकमेव एजन्सी होती जी इंटरपोलसोबत काम करण्यासाठी मान्यताप्राप्त होती, परंतु आता भारतपोलच्या माध्यमातून प्रत्येक भारतीय एजन्सी आणि सर्व राज्यांचे पोलीस इंटरपोलशी सहजपणे संपर्क साधू शकतील. गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आम्ही कार्यक्षमतेने काम करत राहू, असे शहा यांनी स्पष्ट केले.

सीबीआयनेच भारतपोलची निर्मिती केली आहे. इंटरपोलच्या धर्तीवर भारतपोल पोर्टल तयार करण्यात आले आहे. त्यामुळे तपास यंत्रणांना सायबर आणि आर्थिक गुन्ह्यांसह इतर गुन्ह्यांमध्ये आंतरराष्ट्रीय पोलिसांकडून तातडीने मदत मिळणार आहे. या पोर्टलद्वारे राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे पोलीस परदेशात पळून गेलेल्या गुन्हेगारांची आणि गुन्ह्यांची माहिती इंटरपोलकडून घेऊ शकतील. इंटरपोलशिवाय इतर देशांच्या तपास यंत्रणांशी जोडता येईल, असेही अमित शहा यावेळी म्हणाले.

### पालकमंत्रिपदाबाबत दोन दिवसांत निर्णय

#### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

भाजप-महायुती सरकारमध्ये पालकमंत्रिपदाबाबत कोणताही तिढा नसून, उपमुख्यमंत्री अजित पवार हे परदेशात गेले होते, त्यामुळे चर्चा झाली नाही. पालकमंत्री पदासंदर्भात फार तर दोन दिवसांत निर्णय होईल, असा विश्वास महसूल मंत्री व भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

विदर्भातील झुडपी जंगलाचा प्रश्न सांगण्यासाठी मुख्यमंत्र्यांसोबत भेट घेतली. त्यात काही विषयांवर चर्चा झाल्याचे बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

विदर्भात ८६ हजार हेक्टर झुडपी जंगल जमिनी आहेत. त्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात खटला सुरू आहे. काही झुडपी जंगल जमिनी विभागीय आयुक्तांकडून सोडवण्यासाठीचा अहवाल सादर झाला आहे. या झुडपी जंगल जमिनींवर काही लोकांची घरे आहेत. ही घरे कायदेशीर करण्यासंदर्भात लवकरच प्रक्रिया सुरू होणार असून, यासंदर्भात मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### राष्ट्रवादी शरद पवार पक्षाची दोन दिवस आढावा बैठक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची आढावा बैठक ८ आणि ९ जानेवारी रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खा. सुप्रिया सुळे, पक्षाचे आजी-माजी आमदार, खासदार, विधानसभेचे उमेदवार, जिल्हाध्यक्ष, विविध आघाडीचे प्रमुख, तालुका अध्यक्ष, प्रदेश पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी व अन्य विषयांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. बैठकीत नव्या प्रदेशाध्यक्षांसोबतच विधिमंडळ पक्षनेतही निवडण्यात येणार असल्याची चर्चा आहे.

## दारूगोळा ठेवल्यानंतर ३ वर्षांनी स्फोट

### विजापूर नक्षलवादी हल्ला



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

दिनांक ६ जानेवारी... वेळ दुपारी २ वाजता.. ठिकाण..कुतरूचे आंबेली गाव. हीच वेळ आणि तारीख आहे जेव्हा नक्षलवाद्यांनी विजापूर जिल्ह्यात डीआरजी सैनिकांनी भरलेल्या वाहनाचा स्फोट केला. यामध्ये ८ जवान आणि एक चालक शहीद झाला.

ज्या रस्त्यावरून हे सैनिक परत होते, त्या रस्त्यावर ३ वर्षांपूर्वी ६० किलोचा आयईडी टाकण्यात आला होता. हा आयईडी नक्षलवाद्यांच्या ताब्यात होता. म्हणजे जवळच राहून बटण दाबून चालवता येऊ शकते आणि शेवटी असाच प्रकार घडला. अबुझमाडमध्ये ४ जानेवारीपासून हे दल कार्यरत होते.

या कारवाईत दलाला यशही मिळाले. ४ जानेवारीला अबुझमद भागात ५ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला. त्यांच्याकडून अनेक शस्त्रेही जप्त करण्यात आली. शोध मोहिमेनंतर हे दल आपापल्या ठिकाणी परतत होते. या कारवाईत नारायणपूर, बस्तर, कोंडागाव व दंतेवाडा येथील एसटीएफ आणि डीआरजी पथकांचा सहभाग होता. शहीद जवान दंतेवाडा टीमचे होते.

सोमवारी झालेल्या या नक्षल हल्ल्याचे लक्ष्य डीआरजी म्हणजेच जिल्हा राखीव रक्षक होते. सध्या नक्षलवाद्यांचे सर्वात मोठे शत्रू डीआरजी सैनिक आहेत, कारण तेच सर्वाधिक नुकसान करत आहेत. योजनेनंतर सरकारने स्थानिक तरुणांची भरती सुरू केली. म्हणजे कोंडागाव जिल्ह्यातील तरुण कोंडागावच्या संघात राहतील, दंतेवाड्यातील तरुण दंतेवाड्यातच राहतील. याशिवाय आत्मसमर्पण करणाऱ्या नक्षलवाद्यांनाही डीआरजीमध्ये घेतले जाते.

या पथकांना स्थानिक भाषा, बोली, भौगोलिक परिस्थिती आणि नक्षलवाद्यांचे डावपेच माहीत असल्याने ते पुढे केले जातात. त्यांची बुद्धिमत्ताही मजबूत आहे, जी एसटीएफ आणि नक्षलवाद्यांविरुद्ध लढण्याच्या इतर दलांना मदत करते. या कारणास्तव यावेळी डीआरजी हा नक्षलवाद्यांचा सर्वात मोठा शत्रू आहे. २०२६ पर्यंत बस्तरला नक्षलमुक्त करण्यासाठी मोहीम सुरू आहे. यामध्ये गेल्या वर्षभरात २०० हून अधिक नक्षलवादी मारले गेले आहेत. अबुझमाडपर्यंत फौज दाखल झाली आहे.

कुतरू ते बेदरे हा रस्ता १० वर्षांपूर्वी बांधण्यात आला होता. तो डांबरी रस्ता होता. ३ वर्षांपूर्वी अतिवृष्टीमुळे हा रस्ता वाहून गेला होता. रस्ता आणि पूल दोन्ही उखडले. याच काळात येथे रस्ता दुरुस्तीचे काम करण्यात आले. त्यावेळी हा आयईडी पेरण्यात आला होता. तीन-चार वर्षांपूर्वीपर्यंत काम सुरू असलेल्या प्रत्येक रस्त्यावर नक्षलवादी आयईडी टाकत असत. या कारणास्तव, रस्ता तयार करण्यापूर्वीही सक्तीची तपासणी केली जात होती. असे आयईडी अजूनही अनेक ठिकाणी पडून आहेत. हे वेळोवेळी फोर्सला मिळत राहते.

स्फोट इतका शक्तिशाली होता की, वाहनाचे अवशेष आणि जवानांचे कपडे उडून गेले. वाहनाचे तुकडे इतके तुकडे झाले होते की त्याचा मृतदेह शोधणेही कठीण झाले होते.

### बिहारमधील विषाणू परळीत : खोतांची टीका



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणावरून सरपंच परिषदही आक्रमक झाली आहे. सरपंच परिषदेच्या वतीने आज मुंबईतील आझाद मैदानावर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी सदाभाऊ खोत यांनी परळीची तुलना बिहारसोबत केली. बिहारमधील विषाणू परळीत आला असून त्याने भस्मासुरालाही मागे टाकले, अशी टीका सदाभाऊ खोत यांनी केली. देशमुखांच्या मारेकऱ्यांना ठेचून मारले पाहिजे, अशा शब्दांत त्यांनी संताप व्यक्त केला.

सरपंच परिषदेच्या वतीने संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ मुंबईतील आझाद मैदान येथे एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

यावेळी संतोष देशमुखांच्या आरोपींवर कारवाई करण्यासह देशमुख यांच्या पत्नीला शासकीय नोकरी आणि ५० लाखांची मदत, सरपंच उपसरपंच यांना ३५३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची परवानगी द्यावी, अशा विविध मागण्या करण्यात आल्या.

### आरोपींचा 'तेरे नाम'मधील सलमान झाला पाहिजे...



या आंदोलनात भाजप आमदार सुरेश धस यांनीही सहभाग घेतला. यावेळी बोलताना त्यांनी बीड प्रकरणातील आरोपींवर मोक्का लावण्याची मागणी करीत आरोपींची अवस्था तेरे नाम सारखी झाली पाहिजे, असे वक्तव्य केले.

सुरेश धस म्हणाले, गावातील एक दलित वॉचमनला मारहाण होताना तो रोखायला गेला, २ कोटींची खंडणी मागणाऱ्यांना विरोध केला, एवढाच त्याचा गुन्हा ठरला. म्हणून त्याची निर्घृण हत्या केली. त्याला मारहाण करताना व्हिडिओ शूट करण्यात आला. दुसऱ्याला व्हिडिओ कॉल करून हा प्रकार दाखवला. या आरोपींना सांभाळणारे त्यांचे आका १०० टक्के ३०२ मध्ये येणार, असा विश्वास सुरेश धस यांनी व्यक्त केला. आरोपींची अवस्था तेरे नाम सारखी झाली पाहिजे, असे त्यांनी बोलून दाखविले.

## खाणीत अडकले १५ मजूर

### बचावासाठी लष्कराची चमू दाखल



■ वृत्तसंस्था, दिमा हासाओ, दि. ७ :

आसाममधील दिमा हासाओ जिल्ह्यातील उमरंगसो येथील ३०० फूट खोल कोळसा खाणीत अचानक पाणी आले व १५ कामगार आत अडकले. या कामगारांच्या सुटकेसाठी लष्कर तैनात करण्यात आले आहे. एनडीआरएफ आणि एसडीआरएफ टीमही मदत करत आहेत. आसामचे खाण मंत्री कौशिक राय घटनास्थळी उपस्थित आहेत.

भारतीय लष्कर आणि आसाम रायफल्सचे गोताखोर आणि वैद्यकीय पथकांसह अभियंता टास्क फोर्स बचावकार्यात सामील झाले असून बचावकार्य सुरू झाले आहे.

## संक्षिप्त

### उल्हासनगरमध्ये सेक्स रॅकेट चालवणाऱ्या महिलेला अटक

**उल्हासनगर , दि. ७ प्रतिनिधी**

ठाणे शहर ए एच टी सीच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक चेतना चौधरी यांना उल्हासनगरच्या हिल लाइन पोलीस स्टेशन हद्दीतील श्री मलंग रोड, द्वारली नाका येथे असलेल्या साईं निधी लॉजिंग बोर्डिंग जवळ एक महिला एजंट ग्राहकाना मोबाइल व्हॉटसप वर पीडीत मुलींचे फोटो पाठवुन देहव्यापार करन्यासाठी मुली सप्लाय करणार असल्याची माहिती मिळाली, तेव्हा त्यांनी सापळा लावुन त्या महिला एजंटला अटक केली असुन दोन पिडीत मुलींची सुटका केली आहे. ठाणे शहर ए एच टी सी च्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक चेतना चौधरी आणि ए एच टी सी ठाणे शहरच्या पथकाने द्वारली नाका येथील साईं निधी लॉजिंग बोर्डिंग मध्ये बोगस इसम व पंच पाठवुन छापा मारला असता एक महिला एजंटला ताब्यात घेतले असुन त्या महिलेच्या ताब्यात असलेल्या पीडीत मुलींची सुटका केली आहे . महिला एजंट ग्राहकाना मोबाइल व्हाट्सप वर पीडीत मुलींचे फोटो पाठवुन गेल्या तीन वर्षापासुन देहव्यापार करन्यासाठी मुलींचा सप्लाई करत होती. दरम्यान अटक केलेल्या महिला एजंट चा अजुन कोणी साथीदार आहे का याचा शोध पोलिस घेत आहेत. तर या महिला एजंट ने आता पर्यंत किती मुलीना या धंद्यात आणले याचा शोध क्राईम ब्रँच घेत आहे. या महिला एजंटवर पोलिसानी पिटा ॲक्ट नुसार विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

### नवीन पनवेलमध्ये वेळेवर बस सोडण्यासाठी प्रवाशांचे आंदोलन

**पनवेल , दि . ७ प्रतिनिधी**

नवीन पनवेल येथील एन. एम. एम.टी.ची बस नेहमी अनियमित व नादुरुस्त स्थितीत चालवली जाते. फक्त दोन बसेस येथे चालविल्या जातात. त्यातही सकाळी डेपोतून आलेली बस काही वेळातच बंद पडते. याबाबत अनेक तक्रारी करूनही यावर काहीही उपाय योजना केली जात नाही. याचे एकमेव कारण म्हणजे रिक्षा चालकांची दादागिरी आहे. २ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ८:३० वाजता बस न आल्याने, दोन बसची रांग लागली. बस न सोडण्याचे कारण नेहमीप्रमाणे बस बंद पडली आहे, असे देण्यात आले. प्रवासी संतापून त्यांनी ५९ नंबरची बस दर पांच मिनीटांनी सोडली जाते. ती बस ४० मिनिटे रोखून धरली. पोलीस आले. प्रवाशांनी सांगितले बस नं. ५९ ऐवजी ७७ सोडा. पोलीस प्रवाशांना दम देत होते. कंट्रोलर व अधिकारी याकडे दुर्लक्ष करत होते. शेवटी डेपोतून बस पाठवली, मात्र प्रवाशांना एक तास थांबावे लागले. प्रवाशांची मागणी अशी आहे की, ही बस सकाळी ५ ते रात्री १२:३० पर्यंत चालू ठेवावी. तसेच दोन ऐवजी चार बस चालू कराव्यात. प्रवाशांना असाच त्रास होत राहिला तर, यापुढेही असेच आंदोलन होत राहील व त्यास गंभीर स्वरूप येईपर्यंत प्रशासनाने वाट पाहू नये, बस संघटनेच्या सभासद या आंदोलनात सहभागी झाले होते. असे बंधुत्व फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष समीर राणे यांनी कळविले आहे.

### पुलाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे नामकरण

**उल्हासनगर , दि . ७ प्रतिनिधी**

उल्हासनगर महानगरपालिकेने संजय गांधी नगर येथील वालधुनी नदीवरील धोकादायक पूल तोडुन त्या ठिकाणी नवीन पुल तयार केला असुन त्या पुलाचे उद्घाटन महापालिका प्रशासनाने केले नाही तेव्हा महाविकास आघाडीच्या वतीने या पुलाचे उद्घाटन करुन त्या पुलाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे नामकरण करण्यात आले आहे. उल्हासनगर कॅंप ३ येथील संजय गांधी नगर ला जोडणारा वालधुनी नदीवरील पुल धोकादायक झाल्याने गेल्या अडीच वर्षापुर्वी महापालिकेने तोडुन नवीन पुल उभारण्याचे काम धिम्या गतीने करुन नुकत्याच दोन महिन्या पुर्वी पुलाचे काम पुर्ण झाले . मात्र पुलाचे उद्घाटन महापालिकेने अजुन केले नाही.दरम्यान पुलाचे उद्घाटन करुन सदर पुलाला भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर या नाव द्यावे अशी नागरिकांची मागणी होती. परंतु प्रशासनाला वेळ नसल्याने पुलाचे उद्घाटन पुलाच्या कामासारखेच रेंगाळल्याने आज ३ जानेवारी रोजी स्त्री शिक्षणाच्या शिल्पकार क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनी नागरिकांच्या हस्ते महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी उद्घाटन करुन घेतले व भारतीय राज्यघटनेची शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचे फलक लावण्यात आले. दरम्यान महापालिका प्रशासनाने आता हेच नाव पुलाला देऊन मोठे फलक लावण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादीचे प्रवक्ते शिवाजी रगडे , उपशहर प्रमुख ( उबाठा) भगवान मोहिते, विभाग प्रमुख दशरथ चौधरी, आदिनाथ पालवे, अशोक जाधव, मॉन्टी राजपुत, शशी भुषण सिंग, साहेबराव ससाणे, मॅडी स्टलिन, साऊद खान, ॲड. महेश फुंदे, अझीझ शेख, सिराज खान यांनी केली आहे.

### उपसरपंचपदी विशाल पाटील बिनविरोध

**वाडा, दि . ७ प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील घोणसई मेट ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची निवडणूक रोजी पार पडली. या निवडणूकीत उपसरपंचपदी विशाल पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली.घोणसई मेट ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच दिलीप पाटील यांची मुदत संपल्याने त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे हे पद रिक्त झाल्याने उपसरपंच पदाची निवडणूक ग्रामपंचायत कार्यालयात घेण्यात आली. या निवडणुकीत विशाल पाटील यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने ते बिनविरोध निवडून आले. त्यांच्या निवडीनंतर सरपंच शैला जाबर यांच्यासह ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. ग्रामपंचायतीत विकासकामे करून आदर्श ग्रामपंचायत करू ,असा विश्वास त्यांनी यावेळी बोलून दाखवला आहे. पीठासीन अधिकारी म्हणून ग्रामपंचायत अधिकारी तेजस भुजबल यांनी काम पाहिले.

### एसटी डेपो नांदेड आगार येथे श्री गुरूगोविंदसिंघजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**नांदेड, दि . ७ प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि.6 जानेवारी 2025 सोमवार रोजी सकाळी ठीक 10 वाजता गुरूपुरब एसटी कर्मचारी समीती यांच्यावतीने खालसा पंथाचे संस्थापक, महान संत, शिपाई, शिख पंथाचे दहावे गुरू श्री गुरूगोविंदसिंघजी महाराज यांची 358 वी जयंती प्रकाशपर्व म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम कथा वाचक बाबाजी रचपालसिंघजी महाराज यांच्या हस्ते श्री गुरूगोविंदसिंघजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पमाला अर्पण करून आरदास करण्यात आली. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून कथा वाचक रचपालसिंघजी महाराज, विभाग नियंत्रक डॉ.चंद्रकांत वडस्कर, कामगार अधिकारी लक्ष्मीकांत गवारे, वहातुक अधिकारी कमलेश भारती, यंत्र अभियंता (चा.)अभिजीत कोरटकर, प्रीतेश रामटेके, वहातूक अधिक्षक मिलींदकुमार सोनाळे, आगार प्रमुख अनीकेत बल्लाळ, सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक दिगविजय नरंगले, श्रीनिवास रेनके, शेख मोबीन, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजीक कार्यकर्ते गुणवंत एच.मिसलवाड, राजेंदरसिंघ सिद्धू, अमरजितसिंघ टुटेजा, वाहतूक नियंत्रक दिलबागसिंघ गडगज, बालाजी शिंदे, राजेंदरसिंघ चावला, नंदू पाटील बेंद्रीकर, जूजारसिंघ भुल्लर, गुरूदिपसिंघ लीखारी, महेंदरसिंघ चाहेल, गुरमीतसिंघ कोटतिर्थवाले, विजेंद्रसिंघ चौधरी, रंजीतसिंघ शिलेदार, हरज्योतसिंघ त्रिकूटवाले, कुलदिपसिंह चव्हाण, खुशालसिंह कोटतिर्थवाले, बचीत्तरसिंघ गाडीवाले यांची प्रमुख उपस्थिती होती.

# बीड सरपंच हत्याकांडाचे भिवंडी कनेक्शन

**भिवंडी, दि. ७ : प्रतिनिधी**



बीड मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्येतील आरोपींचे भिवंडी कनेक्शन समोर आले आहे. या हत्याकांडातील मुख्य आरोपी सुदर्शन घुले त्याच्या इतर दोन साथीदारांसह तिघेही हत्याकांडानंतर ११ डिसेंबरला भिवंडीत आपल्या ओळखीच्या मित्राकडे राहायला आला होते. मात्र भिवंडीत आसरा मिळाला नसल्याने त्याच दिवशी तिघेही आरोपी भिवंडीतून गुजरातला पळून गेल्याची माहिती समोर आली आहे.

९ डिसेंबर रोजी सरपंच संतोष देशमुख यांची हत्या केल्यानंतर तिन्ही मुख्य आरोपी ११ डिसेंबर रोजी भिवंडीतील समाजसेवक सोन्या पाटील यांच्या कार्यालयात आले होते. त्यानंतर आरोपींनी बीड येथील त्यांच्या गावशेजारील व ओळखीचे भिवंडीत राहणारे विक्रम डोईफोडे यांची ओळख सांगितली. त्यांनतर सोन्या पाटील यांच्या कार्यालयातील व्यक्तीने विक्रम डोईफोडे यांना आरोपी सुदर्शन घुले याचा फोटो विक्रम डोईफोडे यांना पाठवला मात्र ते वैष्णो देवी येथे देवदर्शनाला गेले होते. फोटो पाहून त्यांनी आरोपी सुदर्शन घुले यांना ओळखलं. देशमुख हत्येमध्ये घुलेचा समावेश असल्याच्या बातम्या समोर आल्याने विक्रम डोईफोडे यांनी त्यांना आसरा देण्यास नकार दिला.

यानंतर तीनही आरोपींनी त्यांच्या गावातील ओळखीचा तरुण रवी बारगजे याचा तपास काढला. रवी हा भिवंडीतील वळपाडा येथील विक्रम डोईफोडे यांच्याच बार आणि रेस्टॉरेन्ट मध्ये काम करत असल्याने रवी यानेही विक्रम डोईफोडे यांना कॉल करून तीनही आरोपी बारवर आले असल्याची माहिती दिली मात्र विक्रम यांनी त्यांना राहण्यास देऊ नका असे सांगितल्याने तीनही आरोपी लघुशंकेचे नाव सांगून थेट तेथून पळून गेल्याची माहिती विक्रम डोईफोडे यांनी दिली आहे.

## 14 जानेवारी रोजी कोकण विभागीय पेन्शन अदालत

**नवी मुंबई, दि. ७ : प्रतिनिधी**

कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार दि. 14 जानेवारी 2025 रोजी सकाळी 11.00 वा. कोकण भवनातील कक्ष क्र. 106 सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे.

या पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे. असे कोकण विभाग तहसिलदार,(सामान्य प्रशासन) महेंद्र बेलदार यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

## सायबर गुन्हेगारांने फसवले नफ्याच्या आमिषाने पनवेलमधील वृद्धाला 52 लाखांचा गंडा

**पनवेल, दि. ७ : प्रतिनिधी**

शेअर ट्रेडिंगचा अनुभव असतानाही सायबर गुन्हेगारांच्या गळाला लागून वृद्धाने ५२ लाख रुपये गमावल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पनवेल परिसरात राहणाऱ्या ६२ वर्षीय व्यक्तीसोबत हा प्रकार घडला आहे.

सप्टेंबर २०२४ मध्ये त्यांना पहिल्यांदा अज्ञात व्यक्तीने शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवण्यास सांगितले असता त्यांनी नकार दिला होता.

मात्र त्यानंतरही सदर व्यक्तीने त्यांना व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये घेऊन त्या ठिकाणी इतरांना होणारा आभासी नफा दाखवला. त्यामुळे पुढील काही दिवसांत टप्प्याटप्प्याने त्यांनी ५२ लाख ७५ हजार रुपये भरले. त्यापैकी ७५ हजार रुपये त्यांना अधूनमधून गळाला लावण्यासाठी नफ्याच्या स्वरूपात परत दिले. त्यांनी गुंतवणूक थांबवली असता टॅक्स किंवा इतर कारणांनी अधिक पैशाची मागणी होऊ लागली आणि त्यांची फसवणूक झाली.

## मत्स्य उत्पादनात 81 हजार मेट्रिक टनाची घट

**रायगड, दि. ७ : प्रतिनिधी**

राज्यातील मत्स्य उत्पादनात गेल्या 2022-23 च्या तुलनेत 2023-24 वर्षभरात 81 हजार 868 मेट्रीक टनाची मोठी घट दिसून आली आहे. रत्नागिरी जिल्ह्याचा अपवाद वगळता रायगडसह इतर जिल्ह्यांतील मत्स्य उत्पादनात घट झाल्याचे शासकीय आकडेवरून दिसून येत आहे. सन 2022-23 मध्ये राज्यातील मत्स्य उत्पादन 4 लाख 46 हजार 256 मेट्रीक टन होते. यात सन 2023-24 मध्ये घट होऊन ते 3 लाख 64 हजार 288 मेट्रीक टनावर आले. म्हणजेच गेल्यावर्षीच्या तुलनेत मत्स्य उत्पादन 81 हजार मेट्रीक टनाने घटले आहे. गेल्या पाच वर्षातील मत्स्योत्पादनाची आकडेवारी लक्षात घेतली तर, यावर्षी सर्वात कमी मत्स्योत्पादन झाले आहे. ही एक चिंतेची बाब आहे.

ठाणे आणि पालघर जिल्ह्यात गेल्या वर्षभरात 49 हजार मेट्रीक टन मत्स्य उत्पादन झाले. मुंबई उपनगरात 61 हजार मेट्रीक टन, बृहन्मुंबईमध्ये सर्वाधिक 1 लाख 38 हजार मेट्रीक टन, रायगड जिल्ह्यात 28 हजार मेट्रीक टन, रत्नागिरीत 69 हजार मेट्रीक टन तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात 17 हजार 976 मेट्रीक टन मत्स्य उत्पादन झाले असल्याचे दिसून येत आहे. मत्स्य उत्पादन घटण्यामागे प्रामुख्याने नैसर्गिक आणि मानव निर्मित कारणे आहेत. नैसर्गिक कारणामध्ये हवामानात होणारे बदल, किनारपट्टीवर येणारी वादळे आणि प्रदूषण या घटकांचा समावेश आहे. तर मानव निर्मित कारणांमध्ये अनियंत्रित आणि बेसुमार मासेमारी, परप्रांतीय नौकांकडून राज्याच्या सागरी हद्दीत केली जाणारी मासेमारी, एलईडी दिव्यांच्या सहाय्याने पर्ससीन नेटचा वापर करून मासेमारी या कारणांमुळे मासेमारीवर परिणाम होतो. गेल्या काही वर्षात कोकण किनारपट्टीला निसर्ग, तौक्ते, क्यार, फयान यासारखी वादळं आली. या वादळांचा मासेमारीला मासेमारीला फटका बसला, वादळांच्या काळात समुद्र खवळतो. किनाऱ्यावरील मासे खोल समुद्रात निघून जातात. त्यामुळे किनारपट्टीवरील भागात मासे मिळण्याचे प्रमाण कमी होत जाते. वादळ आणि खराब हवामान असेल तेव्हा शासनाकडून मच्छीमारांना धोक्याचा इशारा दिला जातो. खोल समुद्रात मासेमारीसाठी मज्जाव केला जातो. त्यामुळे मासेमारी बोटी बंद ठेवल्या जातात त्यामुळे उत्पादनात घट होते. कोकण किनारपट्टीवर 25 वर्षांपुर्वी जेवढे मासे मिळत होते तेवढे मासे आता मिळत नाहीत. त्यासाठी खोल समुद्रात मासेमारीसाठी जावे लागते. गेल्या तीन दशकात कोकणात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक वसाहती निर्माण झाल्या. ज्यातील बहुतांश वसाहतीमध्ये रासायनिक कंपन्यांचा समावेश आहे. रसायनी, तळोजा, पाताळगंगा, नागोठणे, रोहा, महाड, लोटे, अलिबाग परिसरात मोठ्या प्रमाणात रासायनिक कंपन्या उभारल्या गेल्या, ज्यांचे सांडपाणी प्रक्रीया करून समुद्रात, नदीत आणि खाड्यांमध्ये सोडले गेले.

# 'बारामतीच्या वैभवात भर घालणारी शिवसृष्टी उभारा' -उपमुख्यमंत्री अजित पवार

**पुणे, दि. ७ : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास जगासमोर येईल यादृष्टीने प्राचीन आणि आधुनिकतेचा संगम साधून बारामतीच्या वैभवात भर घालणारी भव्यदिव्य शिवसृष्टी उभारण्यात यावी, अशी सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. अजित पवार यांनी रविवारी (दि.5) तालुका फळरोपवाटिका, शिवसृष्टी, जलतरण तलाव, कन्हेरी वनोद्यान येथे सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली. या वेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपवनसंरक्षक महादेव मोहिते, उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर, महावितरणचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर, उपविभागीय कृषी अधिकारी तुळशीराम चौधरी आदी उपस्थित होते. अजित पवार म्हणाले, शिवसृष्टीची कामे करताना ती गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होतील, याबाबत दक्षता घ्यावी. शिवसृष्टीचे काम नागरिकांना हेवा वाटेल, असे करावे. परिसरात अधिकाधिक वृक्षांची लागवड करून संपूर्ण परिसर हिरवागार राहील, असे नियोजन करावे. कोणतीही कामे प्रलंबित राहणार नाहीत, याबाबत दक्षता घ्यावी.

तालुका फळरोपवाटिका कन्हेरी येथील दुरुस्तीची किरकोळ कामे पूर्ण करून घ्यावीत. संरक्षक भिंती आणि रस्ताच्या बाजूला वृक्षारोपण करावे. परिसरात शोभिवंत झाडे लावावीत. प्रवेशद्वाराला वनोद्यानाशी सुसंगत रंगरंगोटी करावी. लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पायऱ्यांची व बैठक व्यवस्था करावी. तलावात नौकाविहार सुरू करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. नव्याने उभारण्यात येणाऱ्या जलतरण तलावाची कामे करताना दर्जेदार, टिकाऊ फरशा बसवाव्यात. विकासकामे करताना कालव्याच्या भिंतीला अडथळा निर्माण होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी, अशा सूचना अजित पवार यांनी दिल्या. या वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, तहसीलदार गणेश शिंदे, गटविकास अधिकारी अनिल बागल, मुख्याधिकारी महेश रोकडे, वन परिक्षेत्र अधिकारी अश्विनी शिंदे, तालुका कृषी अधिकारी सुप्रिया बांदल, बारामती सहकारी बँकचे अध्यक्ष सचिन सातव आदी उपस्थित होते.

**उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे रस्त्याच्या कामाबाबत तक्रार**

बारामतीच्या दौऱ्यावर रविवारी (दि. 5) असलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे झारगडवाडीतील ग्रामस्थांनी रस्त्याच्या निकृष्ट कामाची तक्रार केली. पवार यांनी अधिकाऱ्यांना पाहणी करत तत्काळ कार्यवाहीच्या सूचना दिल्या. झारगडवाडीतील नितीन मासाळ व अन्य ग्रामस्थांनी पवार यांना निवेदन दिले. झारगडवाडीत ज्ञानदेव भापकर घर ते सुळ यांच्या घरापासून आवटेवस्ती रस्त्याचे काम सुरू आहे. हा रस्ता दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे, परंतु निविदेनुसार काम होत नाही. रस्त्यासाठी वापरला जाणारा मुरुम, खडी हलक्या प्रतीचा वापरला जात आहे. त्यामुळे रस्ता निकृष्ट दर्जाचा होत आहे. या रस्त्याचे काम त्वरीत थांबवावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली. हे काम थांबले नाही तर गावपातळीवर ग्रामस्थांकडून आंदोलन केले जाईल, असा इशारा देण्यात आला. नेमके कोणाच्या पाठबळामुळे हे निकृष्ट काम केले जात आहे, याची चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली. अंदाजपत्रकानुसार रस्त्याचे काम होत नसल्याचेही निवेदनात म्हटले आहे. प्रांताधिकाऱ्यांसह गटविकास अधिकारी, पंचायत समितीचा बांधकाम विभाग यांना याबाबत निवेदने दिली होती, परंतु दखल घेतली गेली नाही. त्यामुळे थेट उपमुख्यमंत्री पवार यांनाच यासंबंधी निवेदन देण्यात आले.

## भिवंडीतील जप्त 800 कोटी रुपयांचे ड्रग्ज प्रकरणी गुजरात एटीएसने महापालिका मुख्यालयातून घेतली फ्लॅट मालकाची माहिती

**भिवंडी, दि. ७ : प्रतिनिधी**



गुजरातच्या एटीएसने ८ ऑगस्ट २०२४ रोजी भिवंडी शहरातील नदीनाका परिसरातील एका फ्लॅटवर छापा टाकून ८०० कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त केले होते. आता त्या बाबतीत एक नवीन माहिती पुढे आली आहे. मागील आठवड्यात गुरुवारी गुजरात पोलिसांनी अचानक भिवंडी महापालिका मुख्यालय गाठले आणि ज्या फ्लॅटमध्ये ड्रग्ज तयार केले जात होते.त्या फ्लॅटच्या मालकाची संपूर्ण माहिती प्रशासनाकडून घेतली.या घटनेने शहरात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.गुजरात एटीएसने स्थानिक नदी नाका परिसरातील फरीदबाग भागात असलेल्या इस्माईल मॅन्शनच्या तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक ३०८ मध्ये ८ जणांना अटक केली होती.ऑगस्ट २०२४ मध्ये टाकलेल्या छाप्यात ८०० कोटी रुपयांचे ७९२ किलो एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले होते. यानंतर निजामपूर पोलिसांनी कारवाई करत फातमानगर येथील रहिवासी फ्लॅट मालक अजगर अली इस्लामुद्दीन अन्सारी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.मात्र त्याला अटक करण्यात आली नाही.२ जानेवारी २०२५ रोजी गुजरात एटीएसचे पथक अचानक भिवंडी महानगरपालिकेच्या मुख्यालयात पोहोचले आणि फ्लॅट मालकाच्या संपूर्ण माहितीची मागणी करणारे परिपत्रक मनपा प्रशासनाला दिले. तेव्हा हे प्रकरण गुजरात पोलीस वेगळ्या रीतीने हाताळणार असल्याचे समोर आले आहे. महापालिका प्रशासनाने त्यांना फ्लॅट मालक आणि त्याच्याशी संबंधित जी काही माहिती होती तीही उपलब्ध करून दिली.याप्रकरणी भिवंडीचे डीसीपी मोहन दहीकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले कि, गुजरात एटीएसने त्या प्रकरणी पोलिस विभागाशी संपर्क साधला नाही. फ्लॅट मालकाने ८ महिन्यांपूर्वी मुंबईतील रहिवासी मोहम्मद इजाज मोहम्मद सुलतान शेख यांना भाड्याने दिले होते, परंतु फ्लॅट मालकाने स्थानिक पोलिसांना भाडेकरूबद्दल कोणतीही माहिती दिली नव्हती.

## खोदाई करणाऱ्या ट्रकची दुचाकीला धडक

### 27 वर्षीय तरुणाचा मृत्यू, हडपसरमधील घटना

**पुणे, दि. ७ : प्रतिनिधी**

भरधाव ट्रकच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान रुग्णालयात मृत्यू झाला. हडपसर भागातील शेवाळवाडी चौकात अपघाताची घटना घडली होती. याप्रकरणी ट्रकचालकाविरुद्ध हडपसर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. ओंकार मधुकर गवळी (वय २७, रा. मरकळ रस्ता, आळंदी देवाची) असे उपचारादरम्यान मृत तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मधुकर गवळी (वय ५८) यांनी हडपसर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार ओंकार १८ डिसेंबर रोजी हडपसरकडे निघाला होता. त्यावेळी शेवाळवाडी चौकात बोअरवेल खोदाई करणाऱ्या ट्रकने दुचाकीस्वार ओंकारला धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या ओंकारला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. ओंकार याच्यावर मूळगावी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यानंतर त्याचे वडील मधुकर यांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. पोलिस उपनिरीक्षक अनिल बिनवडे तपास करीत आहेत.

## मुफ्ती शहाबुद्दीन रजवी बरेलवी यांच्यावर कठोर कारवाई व्हावी ! - हिंदु जनजागृती समितीची मागणी

- महाकुंभच्या भूमीवर वक्फ बोर्डाचा दावा
- सनातनी हिंदूंच्या श्रद्धेला जाणीवपूर्वक आघात करण्याचा प्रयत्न

**मुंबई, दि. ७ : प्रतिनिधी**

अरबमध्ये 'वक्फ'ची संकल्पना जन्माला आली नव्हती, त्या लाखो वर्षांपूर्वीपासून गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या पवित्र त्रिवेणी संगमावर कुंभमेळ्याचे आयोजन होत आले आहे. जिथे कुंभ भरतो, ती गंगा मातेची भूमी आहे. ती नैसर्गिक भूमी वक्फची कशी काय होऊ शकते? मुफ्ती शहाबुद्दीन रजवी बरेलवी यांनी कुंभमेळा स्थळावरील 54 बीघा भूमीवर वक्फचा दावा केला आहे. हा प्रकार अत्यंत निषेधार्ह असून हिंदु जनजागृती समिती याचा तीव्र विरोध करते. हा दावा केवळ निराधार नसून कुंभमेळ्याच्या पवित्र वातावरणाला गालबोट लावण्याचा आणि सनातन धर्माच्या अनुयायांच्या श्रद्धेला धक्का पोहोचवण्याचा सुनियोजित प्रयत्न आहे, असे प्रतिपादन हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक सद्गुरु डॉ. चारुदत्त पिंगळे यांनी पत्रकार परिषदेत केले. यावेळी सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस आणि समितीचे कुंभ अभियान समन्वयक श्री. आनंद जाखोटिया उपस्थित होते.

सद्गुरु डॉ. पिंगळे पुढे म्हणाले की, कुंभमेळ्याच्या पवित्रतेचे रक्षण करण्यासाठी आम्ही राज्य सरकारला आवाहन करतो की त्यांनी कठोर पावले उचलावीत आणि सनातनी हिंदूंच्या श्रद्धेला धक्का पोहोचवणाऱ्या मुफ्ती शहाबुद्दीन रजवी बरेलवी यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करावी.

वक्फ सुधार अधिनियमासाठी स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त संसदीय समितीसमोर हिंदूंची भूमिका मांडणारे सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस म्हणाले की, मौलाना शहाबुद्दीन रजवी यांच्या मते वक्फच्या भूमीवर कुंभमेळा आयोजित करणे हा मुस्लिम समाजाचा मोठेपणा आहे, असे असेल तर आम्हाला त्यांना विचारायचे आहे की, रामजन्मभूमीवर बाबरने केलेल्या अतिक्रमणाच्या वेळी मुस्लिम समाजाने ही उदारता का दाखवली नाही? आजही काशी, मथुरा, संभळ आणि अशा 15,000 मंदिरांवर इस्लामिक अतिक्रमण आहे. त्याबाबतीत त्यांनी उदारता का दाखवली नाही? कुंभ क्षेत्राला वक्फची भूमी मानणाऱ्यांना कुंभ क्षेत्रात प्रवेश नाकारण्यात यावा, अशी आमची मागणी आहे.

## क्रिकेटच्या मैदानातच फलंदाजावर 500 च्या नोटांचा पाऊस; व्हिडिओ व्हायरल

**भिवंडी, दि. ७ : प्रतिनिधी**



क्रिकेटच्या मैदानात फलंदाजी करणाऱ्या एका फलंदाजाची फटकेबाजी पाहून एका प्रेषकाने मैदनातच धाव घेऊन त्या फलंदाजावर ५०० च्या नोटांचा पाऊस पडल्याची घटना समोर आली आहे. ही घटना कल्याण - भिवंडी मार्गावरील भिवंडी तालुक्यातील कोनगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात घडली आहे.या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड प्रमाणात व्हायरल झाला आहे.तर दुसरीकडे भारतीय चलनाचा भर मैदानात अपमान झाल्याची टीका नेटकऱ्यांमधून होत आहे.दरवर्षी प्रमाणे यंदाही ७० - ७० क्रिकेट स्पर्धा कोनगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात आयोजित करण्यात आली होती.या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन भाजपचे कल्याण शहर अध्यक्ष वरून पाटील यांच्या वतीने करण्यात आले होते.तीन दिवस सुरू असलेल्या या क्रिकेट स्पर्धेमध्ये अनेक संघानी सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे या क्रिकेट स्पर्धेचे कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी फलंदाजी करत फटेकबाजी करून उदघाटन केलं होत. त्यातच शेवटच्या दिवशी दोन संघात क्रिकेट सामना रंगात असतानाच मैदानात गोरसई गावातील पवन केणे नावाचा फलंदाज जोरदार फटकेबाजी करून चौकार , षटकार लगावत असतानाच त्याने ३५ धावा केल्या होत्या. त्याची फलंदाजी पाहून प्रेषक विकास भोईर यांनी मैदानात धाव घेऊन चक्क पवन याच्या अंगावर नोटांचे बंडल भिरकावत अक्षरशः नोटांचा पाऊस पाडला.दरम्यान, फलंदाज पवन याच्या अंगावर नोटांचे बंडल भिरकावत अक्षरशः नोटांचा पाऊस पडल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर भलताच व्हायरल झाला. मैदानात नोटांचा पाऊस पाहून काही प्रेक्षकही या नोटा गोळा करण्यासाठी मैदानात धावले. त्यानंतर सर्व नोटा गोळा करून त्या पवन याला देण्यात आल्या.मात्र दुसरीकडे भारतीय चलनाचा भर मैदानात अपमान झाल्याची टीका नेटकऱ्यांमधून होत आहे.

## वाघाच्या धुमाकूळाने शेतकरी वर्ग भयभीत

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**मूल, दि. ८ जानेवारी :** मूल तालुका भेजगाव येथे समता फाउंडेशन मुंबई व सक्षम बहुउद्देशीय ग्रामविकास संस्था भेजगाव यांच्या संयुक्त विद्यमाने व नागपूर येथील शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर व उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियाना अंतर्गत पीआरआय सीबीओ अभिसरण प्रकल्प यांच्या सहकार्याने सावित्रीबाई फुले जयंतीचे औचित्य साधून निशुल्क मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन शुक्रवारी दि .३ जानेवारीला भेजगाव येथील ग्रामपंचायत पटांगणावर करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन मूल पंचायत समितीचे गट विकास अधिकारी बी. एच. राठोड यांच्या हस्ते झाले.

## रस्ता सुरक्षा अभियानाचे आयोजन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**मूल, दि. ८ जानेवारी :** जिल्ह्यामध्ये १ ते ३० जानेवारी २०२५ या कालावधीत प्रादेशिक परिवहन कार्यालय व पोलिस विभागाच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्या वाहनमालक व चालकावर मोटार वाहन विभागातंर्गत कार्यवाही करण्यात येणार आहे. तेव्हा दारु पिऊन किंवा विना सिटबेल्ट तसेच विना हेल्मेट वाहने चालवू नये. सर्व नागरिकांनी वाहतुकीच्या रस्ता सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केले. जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या मार्गदर्शनात रस्ता सुरक्षा अभियानाच्या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

## एचएमपीव्ही विषाणूबाबत नागरिकांनी घाबरू नये

### आरोग्य विभागाचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ७ जानेवारी :** सध्या चीन मध्ये एचएमपीव्ही (HMPV) या विषाणूचा उद्रेक झाला असून याबाबत विविध बातम्या प्रसारीत होत आहेत. त्यामुळे आरोग्य विभागाकडून मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या असून सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

चीनमध्ये आढळलेला मानवी मेटान्युमोव्हायरस अर्थात प्श्इन्न हा तीव्र श्वसन संसर्गाचे प्रमुख कारण आहे. हा विषाणू सर्वप्रथम नेदरलंड मध्ये २००१ मध्ये आढळून आला होता. हा एक सामान्य विषाणू असून श्वसन मार्गाच्या वरील भागातील संसर्गास कारणीभूत ठरतो. सर्दीसारखा सामान्य आजार यामुळे होतो.

हा एक हंगामी रोग असून हिवाळा व उन्हाळ्याच्या सुरुवातीला उद्भवतो. महाराष्ट्रात आतापर्यंत HMPV चा एकही रुग्ण आढळून आलेला नसून कोणीही घाबरण्याचे कारण नाही.




तथापी खबरदारीचा भाग म्हणून नागरिकांनी श्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी मार्गदर्शक सुचनाचे पालन करण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील श्वसनाच्या संसर्गाच्या आकडेवारीचे विश्लेषण केले आहे. वर्ष २०२३ च्या तुलनेत डिसेंबर २०२४ मध्ये कोणतीही वाढ झालेली नाही.

तथापि खबरदारीचा एक भाग म्हणून नागरिकांनी श्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी काय करावे आणि काय करू नये या संदर्भातील सुचानाचे पालन करावे.

**काय करावे :** खोकला किंवा शिंका येत असेल तेव्हा तोंड आणि नाक, रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाकावे. साबण आणि पाण्याने आपले हात वारंवार धुवा. ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणापासून दूर राहा. भरपूर पाणी प्या आणि पौष्टिक अन्न खा. संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन (व्हेटीलेषण) होईल, याची दक्षता घ्या.

**काय करू नये :** हस्तांदोलन, टिश्यू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर, आजारी लोकांशी जवळचा संपर्क, डोळे,नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करणे. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय (सेल्फ मेडिकेशन) घेणे. जिल्हयातील सर्व नागरिकांनी घाबरून न जाता खबरदारी घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

## अवैध होर्डिंग उभारणाऱ्यांविरुद्ध मनपाची पोलीसात तक्रार

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ७ जानेवारी :** शहरात विना परवानगी होर्डिंग व स्टीकर लावणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र विद्रुपीकरण कायदा १९९५ व सार्वजनिक संपत्ती नुकसान निवारण अधिनियम १९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्याबाबत चंद्रपूर महानगरपालिकेच्या तीनही झोन कार्यालयांद्वारे पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

झोन क्रमांक १ प्रभागात अज्ञात व्यक्तीद्वारे मैत्री विद्यालय,केसरी बोअरवेल नावाने,झोन क्रमांक २ प्रभागात नकुल वासमवार यांनी तर झोन क्रमांक ३ प्रभागात विक्रम शर्मा (डोग्रा ड्राय फ्रुट्स ) तसेच कार वॉश सेंटरची जाहिरात करणारे अवैध होर्डींग विविध ठिकाणी तसेच बॅनर-स्टीकर भिंतींवर व विद्युत खांबांवर मनपाकडुन पूर्वपरवानगी न घेता लावले असल्याचे सर्व सहायक आयुक्त यांना पाहणीदरम्यान आढळुन आले.

संबंधितास भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करून सदर होर्डींग,पत्रके काढण्यास सांगितले असता अद्याप पावेतो न काढल्याने या सर्व अवैधरीत्या जाहिरात करणाऱ्यांवर महाराष्ट्र विद्रुपीकरण कायदा १९९५ अंतर्गत कलम ३ व सार्वजनिक संपत्ती नुकसान निवारण अधिनियम १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात यावा अश्या आशयाची तक्रार करण्यात आली आहे. जाहिरात करण्यास अश्या प्रकारचा अवलंब केल्याने शासकीय निधीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते तसेच शहर सुशोभीकरणाच्या कामातही बाधा निर्माण होते .

घाटकोपर येथील होर्डींग दुर्घटनेनंतर सुस्वराज फाऊंडेशनची दाखल जनहित याचिका क्र.१५५ / २०११ नुसार मा.उच्च न्यायालयाने शहरातील अनधिकृत होर्डींग,बॅनर, जाहीरात फलकांवर सक्त कारवाई निर्देश दिलेले आहेत.त्याअनुषंगाने आयुक्त विपीन पालीवाल यांच्या मार्गदर्शनात चंद्रपूर मनपाद्वारे मोहीम राबविण्यात येत असुन निष्कासनाची कारवाई करण्यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनाद्वारे पुरेसे संरक्षण उपलब्ध करून दिले जात आहे.

यापुर्वी मनपा प्रशासनाद्वारे मनपा क्षेत्रातील प्रिंटर्स व राजकीय पक्ष प्रतिनिधींची बैठक घेऊन मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाबाबत अवगत करण्यात आले होते व शहरात कुठलेही अवैध बॅनर,जाहिरात फलक,होर्डिंग लाऊ नये अन्यथा न्यायालयीन आदेशानुसार कारवाई करण्यात येणार असल्याची कल्पना देण्यात आली होती. भिंतीपत्रके, पोस्टर्स, बॅनरबाजीमुळे शहराच्या विद्रुपीकरण होते किंबहुना वाहतुकीसही अडथळा निर्माण होत असल्याने याबाबत उच्च न्यायालय आणि राज्य शासनाने आखुन दिलेल्या सुचनांनुसार कारवाई करण्यात येते. त्यानुसार, परवानगीशिवाय पॅम्प्लेट्स, बॅनर्स, होर्डिंग्ज,कापडी फलक लावणा-यांवर आर्थिक दंडासह कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद या धोरणामध्ये करण्यात आली आहे.

## मुल येथे शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय होणार

### आ. सुधीर मुनगंटीवार यांना उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांकडून बैठकीत मिळाला सकारात्मक प्रतिसाद

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ७ जानेवारी :** मुल येथे नवीन शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय व्हावे, यासाठी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांनी पाठपुरावा करून हा विषय लावून धरला. आता लवकरच हा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीत येणार आहे. त्यामुळे आ. श्री. मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

वाघांचा जिल्हा म्हणून नावलौकिक असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी आधुनिक शिक्षण घ्यावे. जिल्ह्याचा नावलौकिक देशात वाढवावा. यासाठी जिल्ह्यातील मुल येथे नवीन शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय सुरू करण्याचा प्रस्ताव आ. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी दिला होता. यासंदर्भात मंगळवार, दि. ७ जानेवारीला राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयात बैठक पार पडली.

आ. श्री. मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे झालेल्या या बैठकीत तंत्रनिकेतन महाविद्यालयासंदर्भात सविस्तर चर्चा झाली.

यावेळी चंद्रकांत पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेतली. तसेच मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मुलच्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचा प्रस्ताव मांडण्यासंदर्भात सूचना व निर्देश दिले.

महाविद्यालयासंदर्भात वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल आ. श्री. मुनगंटीवार यांनी विभागाचे अप्पर मुख्य सचिव वेणूगोपाल रेड्डी यांचे आभार मानले आहेत.

चंद्रपूर सारख्या आदिवासी बहुल जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना या महाविद्यालयाच्या माध्यमातून आधुनिक शिक्षणाच्या प्रवाहात येण्यास मदत होणार असल्याचा विश्वास आ. श्री. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

### आ. श्री. मुनगंटीवार यांनी दिले होते निर्देश

चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री असताना आ. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी मुल येथे शासकीय पॉलिटेक्निक कॉलेज सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला होता. निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याच्या उद्देशाने त्यांनी तंत्रशिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती. त्यानंतर मुल येथे शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव तातडीने तयार करण्याचे निर्देश दिले होते, हे विशेष.

### या विद्यार्थ्यांना होणार लाभ

या उपक्रमामुळे मूलसह पोंभूर्णा, सावली, सिंदेवाही आणि चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना लाभ होणार आहे.

मुल येथे यापूर्वीच शासकीय कृषी महाविद्यालय सुरू झाल्याने शहराच्या शैक्षणिक विकासात मोलाचे योगदान मिळत आहे. शासकीय पॉलिटेक्निक सुरू झाल्यास मुल हे शिक्षणासाठी महत्त्वाचे केंद्र ठरणार आहे, असा विश्वास आ. श्री. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

## सावित्रीबाई फुले जयंती विविध उपक्रमांनी साजरी

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ७ जानेवारी :** चंद्रपूर मनपाच्या पीएम श्री सावित्रीबाई फुले उच्च प्राथमिक व माध्यमिक विद्यालय येथे सावित्रीबाई फुले जयंती आमदार किशोर जोरगेवार यांच्या उपस्थितीत विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरी करण्यात आली.

उद्घाटकीय भाषणात आमदार किशोर जोरगेवार यांनी विद्यार्थांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात असल्याचे तसेच शाळेच्या शैक्षणिक प्रगतीच्या चढत्या आलेखाबद्दल शिक्षकांची प्रशंसा केली. आयुक्त विपीन पालीवाल यांनी अध्यक्षीय भाषणात शाळेच्या प्रगतीची दखल राष्ट्रीयस्तरावर व राज्यस्तरावर घेत असल्यामुळे शिक्षकांचे अभिनंदन केले.तसेच आवश्यक सर्व भौतिक सुविधा मनपा प्रशासनातर्फे पुरविण्याची खात्री दिली जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी अश्विनी सोनवणे यांनी विद्यार्थी कान्व्हेंट प्रमाणे संचलन करत असल्याबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या फोटोला माल्यार्पण व दिप प्रज्वलन करून सकाळी १० ते १ वाजेपर्यंत आयोजीत महिला पालक स्पर्धा ,पोता गेम ,टायर गेम,संगीत खुर्ची,कबड्डी या विविध स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी शाळेची दिनदर्शिका २०२५ चे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.या नंतर नर्सरी ते वर्ग १० पर्यंतच्या विद्यार्थांनीआकर्षक व नेत्रदिपक नृत्य व नाटीका सादर केली.

**चंद्रपूर :** जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणारे खेळाडू व क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचा गौरव व्हावा व त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने, दरवर्षी शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वतीने जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट गुणवंत खेळाडू (महिला, पुरुष व दिव्यांग) व गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार दिले जातात.

## कला व वाणिज्य महा.भिसी येथे सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम साजरा

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ७ जानेवारी :** चिमूर समाजोन्नती बहुउद्देशीय संस्था चिमूर द्वारा संचालित कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी येथे महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत स्त्री शिकली, धर्म बाटला, पासुन मुलगी शिकली, पग़त झाली,असं व्यवस्थेला म्हणायला भाग पाडणारी, स्त्री शिक्षणासाठी स्वत: पिडणारी, आजच्या शिकुन शहाण्या झालेल्या



सर्व महिलांना मार्गदर्शक असणारी , क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमीत्य कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी येथे शुकवार ला उत्सव साजरा करण्यात आला.

'स्त्री सक्षमीकरण ' कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विठ्ठल ठावरी यांनी स्त्री सक्षमीकरण विषयक विचार मांडले. प्रा डॉ सुनंदा चरडे यांनी शिक्षण विषयक महत्त्व पटवून सांगितले. तसेच प्रा डॉ दिनकर चौधरी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविकातून मार्गदर्शनपर विचार डॉ सुनंदा चरडे यांनी व्यक्त केले. आभार पा. डॉ सोनकुसरे यांनी केले. महाविद्यालयातील प्रा डॉ एन. गिरडे , विजय घरत, तिलक बांगडे, अरविंद लांडगे, गोविंदराव नंदनवार, तुकाराम सातपुते, दुर्वास देसाई, संजय सोनवाणे आदि सर्वांच्या सहकार्याने आणि विद्यार्थ्यांच्या प्रतिसादाने कार्यक्रम यशस्वी झाला.

## बदलत्या जमान्यात टपाल सेवेचे पत्र झाले दुर्मिळ

### मोबाईल, इंटरनेट, ई-मेलमुळे क्रांती : संदेश वहनात क्रांतिकारी बदल

**सुधाकर दुधे**

**सावली, दि. ७ जानेवारी :** संदेशवहन अथवा दळणवळणाच्या क्षेत्रात झालेले बदल लक्षणीय आहेत. टेलिफोन, मोबाईल, इंटरनेट, ई-मेल यासारख्या सुविधा उपलब्ध झाल्याने जग जवळ येऊ पाहत आहे. संदेशवहन जलदगतीने होऊ लागले आहे. परिणामी, भारतीय टपाल सेवेचे पत्र हा प्रकार दुर्मीळ झाला आहे.

सध्याचे युग हे गतिमान युग आहे. या गतिमान युगात फोन, मोबाईल यासारख्या संपर्क यंत्रणा मोठ्या प्रमाणात विकसित झाल्याने गावोगावी, चौकाचौकांत टांगलेल्या लाल रंगाच्या टपालपेट्या आता शोपीस बनत आहेत. प्रत्येकाचे नातेवाईक, परिचित माणसे वेगवेगळ्या गावात राहतात. या नातेवाईकांना निरोप देणे, आमंत्रण देणे यासाठी आता मोबाईलचा सर्रास वापर होत आहे.

फार पूर्वी निरोप पाठवणारा माणूस पायी किंवा सायकल घेईन जात असे. परंतु, इंग्रजांच्या काळात भारतात प्रथम






टपाल व्यवस्था सुरू झाली. हीच टपालसेवा होय. यामध्ये साध्या ५० पैशाच्या कार्डावर किंवा आंतरदेशीय पत्रावर मजकूर लिहून ते पोस्टाच्या पेटीत टाकले जाते. २ ते ३ दिवसांनी तो निरोप त्या व्यक्तीला मिळत असे. फार पूर्वी निरोपाची देवाणघेवाण होण्यासाठी कबुतरांचाही वापर होत असे.

शिवकालीन पत्रव्यवहारामध्ये छ. शिवाजी महाराजांनी प्रत्येक कामाच्यासंदर्भात आठ खाती तयार केली होती. त्याला अष्टप्रधान मंडळ असे नाव होते. त्यामध्ये पत्रव्यवहार सांभाळणे हे काम एखाद्या व्यक्तीला नेमून दिले जायचे आणि तो व्यक्ती आलेली पत्रे, आज्ञा, हुकूम इ. जपून ठेवणे किंवा एखाद्या राज्यात पत्र, आज्ञा किंवा आदेश घेऊन घोड्यावर बसून जात असे. यामध्ये बराच कालावधी जात असे व पत्रव्यवहाराची देवाणघेवाण होण्यात अडचणी यायच्या. त्यानंतर मात्र इंग्रजांनी व्यापाराच्या निमित्ताने भारतात पाय रोवले.

हळूहळू आपला देश ताब्यात घेतला. इंग्रजांनीही रेल्वे, टपाल यासारख्या यंत्रणेचे महत्व लक्षात घेवून टपालसेवा सुरू केली.टपालसेवेने पाठविलेल्या संदेशाला लगेच उत्तर मिळत नाही. ज्याला पत्र लिहले आहे त्याने उलट पत्र पाठविले तरच संदेशाची देवाणघेवाण योग्य होत असे. परंतु हे अतिशय अडचणीचे होते.

या दरम्यान बराच वेळ जात असे. मात्र आता टेलिफोन, मोबाईल, इंटरनेट, इ-मेल यासारख्या सुविधा उपलब्ध झाल्याने जग जवळ येवू पाहत आहे. संदेशवहन जलदगतीने होवू लागले आहे.

जवळच्या किंवा दूरच्या अंतरावरील माणसाशी बोलताना टेलिफोन वापरतात. टेलिफोनवर प्रत्यक्ष बोलणे होते. त्यामुळे एखाद्या व्यक्तीचे समोरासमोर संभाषण झाल्याने पुढील क्रिया झटपट होतात. आता त्याहीपुढे जावून भ्रमणध्वनी अर्थात मोबाईलची निर्मिती झाली आणि विना लाईट, विना वायर असलेला मोबाईल खणाणू लागला.

पूर्वी सुरुवातीला फक्त आर्थिकदृष्ट्या धनवान असलेल्या व्यापारी, व्यवसायिक वा मोठी व्यक्तीच मोबाईल वापरायच्या. कारण सुरूवातीला त्याच्या किंमती अवाढव्य होत्या. परंतु, अलिकडे बऱ्याच मोठ्या खासगी कंपन्या येवू लागल्याने आपल्यालाच ग्राहक मोठ्या प्रमाणात मिळावेत यासाठी त्यांच्यात स्पर्धा सुरू झाली आहे. त्यासाठी विविध ऑफर, योजना कंपनी जाहीर करते व अनेक ग्राहकांना आकर्षक ऑफर देऊन त्यांना आकर्षित केले जाते.

महाराष्ट्र शासन

**जलसंपदा विभाग**

**कार्यकारी अभियंता, प्रमुख द्वार उभारणी पथक क्र.२.**

**लिंक रोड सदर, नागपुर**

दुरध्वनी क्र. ०७१२-२५२२४९८ ई-मेल :-ee.cgeu2.ngp@gmail.com

**निविदा सूचना क्रमांक २० (दुसरी वेळ) सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता, प्रमुख द्वार उभारणी पथक क्र.२, नागपूर, (दुरध्वनी क्र. ०७१२-२५२२४२८) हे महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाच्या वतीने सक्षम निविदाकारांकडून खालील कामांसाठी ब-१ (टक्केवारी दराने) ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येघुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याच्या अधिकार अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, नागपूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल. महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१११७/प्र.क्र.१०४/१७ / यांत्रिकी दि. १४.०३.२०१८ अन्वये खालील कामांकरीता निविदा सादर करणारे कंत्राटदार, जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजिकृत असणे आवश्यक नाही.

- **कामाचे नाव :** - Manufacturing of roller type vertical gate bush in roller escape gate of size 2.85 x 1.59m -1 nos and 5 MT capacity screw stem hoist at RD 19080m, head regulator gate of size 1.2x1.2m-1 Nos and Trashrack embedment and panel of size 1.5 x 1.7m- 1Nos for Nachanbhatti Dy at RD 24650 m, HR of size 0.45 x 0.45m for Ratanapur minor at RD 22330 m and HR of size 0.45 x 0.45m and Trashrach embedment and panel of size 0.75 x 1.7 m-1 Nos for Mingari Minor at RD25190 m including embedment Parts, gae leaf parts at Ghodazari Sub Branch-1 of Gosekhurd Project.
- जिल्हा:- चंद्रपुर
- निविदेची किंमत रूपये रू. १९,४६,३५९/-
- को-या निविदा संचाची किंमत रू २,३६०/-
- बयाना रक्कम रूपये :- रू १९,५००/-
- सुरक्षा रक्कम रूपये :- रू. ३९,०००/-

* निविदा उपलब्ध कालावधी: दि. ०८.०१.२०२५ (१४.०० वाजता पासून) ते दि. १५.०१.२०२५ (१८.०० वाजे पर्यंत)

* निविदा सादर करण्याचा कालावधीः : दि. ०८.०१.२०२५ (१४.०० वाजता पासून) ते दि. १५.०१.२०२५ (१८.०० वाजे पर्यंत)

* निविदा उघडणे :- दिनांक १७.०१.२०२५ रोजी (१४.०० वाजता) शक्य असल्यास किंवा त्यापुढे

जा.क्र /निविदा/लेश/२०२४
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
प्रमुख द्वार उभारणी पथक क्र. २.
लिंक रोड सदर नागपूर

(ज्ञा. न. मुठाळ)
कार्यकारी अभियंता,
प्रमुख द्वार उभारणी पथक क्र २,
नागपूर

जिमाअ./चंद्र/२४६/२०२५




कोरोनाव्हायरस रोग २०१९- कोविड - १९ हा एक अति संसर्गजन्य रोग आहे. जो गंभीर तीव्र श्वसन सिंड्रोम-संबंधित कोरोनाव्हायरस २ अथवा एसएआरएस-कोव्ह-२ या नावाच्या नवीन विषाणूद्वारे होतो. ज्या सार्स या रोगाने आग्नेय आशियामधे थैमान घातले होते. त्या कोरोनाव्हायरस विषाणूच्या प्रजातीतील पण पूर्णपणे नवीन असा हा विषाणू आहे. त्यावर प्रतिबंध- प्रवास टाळणे, वारंवार साबणाने व्यवस्थित हात धुणे, इतरांशी शारीरिक अंतर राखणे आदी आहेत. १३,५८,६९,७०४ पेक्षा जास्त लोक संक्रमीत तर २९,३५,२७१ पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला होता.

---------------------

डिसेंबर २०१९मध्ये चीनच्या हुबेई प्रांताची राजधानी वुहानमध्ये या नवीन आजाराची पहिली ओळख करण्यात आली होती. तेथेच हा रोग कृत्रिमपणे तयार करण्यात आला होता आणि त्यानंतर जागतिक स्तरावर या आजाराचा प्रसार झाला व त्याने जागतिक महामारीचे रूप घेतले. तो जगभरात पसरण्यास ७ जानेवारी २०२० पासून प्रारंभ झाला.

या आजाराच्या सामान्य लक्षणांमध्ये ताप, खोकला आणि श्वास लागणे यांचा समावेश आहे, तर इतर लक्षणांमध्ये थकवा, स्नायू दुखणे, अतिसार, घसा खवखवणे, गंध कमी होणे आणि पोटदुखी या लक्षणांचा समावेश असू शकतो. सामान्यतः लागण झाल्यापासून लक्षणे दिसण्यापर्यंतचा कालावधी हा दोन ते चौदा दिवसांचा असू शकतो.

बहुतेक प्रकरणांमध्ये सौम्य लक्षणे आढळतात, तर काही रोग्यांमधे व्हायरल न्युमोनिया आणि बहु-अवयव निकामी होण्याची भीती असते. १२ एप्रिल २०२१पर्यंत जगातील १८५ देशातील १३,५८,६९,७०४ पेक्षा जास्त लोकांना हा रोग झाला असल्याची प्रकरणे नोंदवली गेली आहेत.
परिणामी २९,३५,२७१ पेक्षा जास्त लोक मरण पावले आहेत. त्यात माझीही पत्नी ६ एप्रिल २०२१ रोजी जगाचा निरोप घेऊन मला सोडून गेली. ७,७२,८४,५६६ पेक्षा जास्त लोक बरेही झाले आहेत. एकूण संसर्ग झालेल्या रोग्यांपैकी दोन टक्के लोकांचा मृत्यू झाला आहे. या कोरोना काळात हाहाकार माजला होता.

हातावर पोट असणाऱ्यांची पुरती धांदल उडाली होती. म्हणून कोरोनातील परिस्थिती आठवली नव्हे नव्हे, केवळ कोरोना शब्द कानी पडला तरी आपल्याला रडू कोसळते. डोळ्यादेखत प्रियजणांना मरतांना पाहून जीव कळवळत होता, धास्तीने जीव गुदमरत होते. ती परिस्थिती शब्दांत मांडणे अशक्यच!

महाराष्ट्रातील कोरोना विषाणू उद्रेकातील पहिल्या रुग्णाची नोंद ९ मार्च २०२० रोजी पुण्यात झाली होती. हा विषाणू प्रामुख्याने जवळच्या संपर्कादरम्यान खोकल्यामुळे, शिंकण्यामुळे किंवा बोलताना नकळत बाहेर पडणाऱ्या थुंकीच्या तुषारांमुळे लोकांमध्ये पसरतो.

हे थेंब अथवा तुषार श्वासोच्छवासाच्या दरम्यानदेखील बाहेर पडून आजूबाजूच्या जमिनीवर किंवा पृष्ठभागांवर पडतात व अशा दूषित पृष्ठभागाला हाताने स्पर्श करून आणि नंतर तोच त्यांच्या चेहऱ्याला लावल्यानेही लोक संक्रमित होऊ शकतात. हे विषाणू ७२ तासांपर्यंत या दूषित पृष्ठभागांवर जिवंत राहू शकतात.

लक्षणे दिसल्यानंतरच्या पहिल्या तीन दिवसांत हा विषाणू सर्वात जास्त संक्रामक असतो, परंतु रोगाची लक्षणे दिसण्यापूर्वी देखिल आणि रोगाच्या नंतरच्या टप्प्यात देखील फार संक्रामक असतो. या रोगाच्या निदानाची मानक पद्धत म्हणजे नाकातून घेतलेल्या नमुन्यांची रीअल-टाइम रिव्हर्स ट्रान्सक्रिप्शन पॉलिमरेज चेन रिएक्शन-आरआरटी-पीसीआर नावाची तपासणी होय.

वारंवार साबणाने व्यवस्थित हात धुणे, इतरांशी शारीरिक अंतर राखणे, विशेषतः लक्षणे असणाऱ्या लोकांकडून खोकताना किंवा शिंकताना रुमालाचा वापर करणे, अचानक शिंक आली असताना व रुमाल जवळ नसल्यास कोपर तोंडावर धरून हाताच्या आतल्या बाजूला शिकणे, न धुतलेले हात चेहऱ्यापासून दूर ठेवणे या व अशा उपायांचा वापर केल्यास विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यात मदत होते.

पूर्वार्ध

ज्यांना विषाणूची लागण झाल्याचा संशय आहे अथवा सौम्य लक्षणे दिसत आहेत, अशांना आणि त्यांची काळजी घेणाऱ्या अथवा त्यांच्या संपर्कात येणाऱ्या सवार्नी मास्क वापरण्याची शिफारस केली जाते.

सध्या, कोरोनाव्हायरस रोग २०१९- कोविड -१९ वर जगात कोणतीही लस किंवा विशिष्ट उपचार नाहीत. फक्त रोग्याच्या लक्षणांवर आधारीत उपचार, प्रतिकार शक्ती वाढविण्याचे उपाय, विलगीकरण व काही प्रयोगात्मक उपाय याचा उपचार म्हणून वापर केला जातो.


कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे
गडचिरोली.
९४२३७१४८८३

जागतिक आरोग्य संघटनेने हा कोरोनाव्हायरस रोग २०१९- कोविड-१९चा उद्रेक हा सार्वजनिक आरोग्यासाठी आंतरराष्ट्रीय आणीबाणी असल्याचे सांगत या उद्रेकाला जागतिक महामारी जाहीर केले आहे.

टेड्रॉस ॲडमहॅनोम गेब्रेयेसोस यांनी हे नाव घोषित केले. इंटरनॅशनल कमिटी ऑफ टॅक्सोनॉमी ऑफ व्हायरस यांनी सार्स-कोव्ह-२ हे नाव दिले होते. ढोबळ मानाने कोरोनाचे ४ प्रकार असे- २२९ई अल्फा कोरोनाव्हायरस, एनएल६३ अल्फा कोरोनाव्हायरस, ओसी४३ बीटा कोरोनाव्हायरस, एचकेयू बीटा कोरोनाव्हायरस सांगतात.

कोरोनाव्हायरस रोग २०१९- कोविड-१९ विषाणूचा संसर्ग झालेल्यांना ताप, खोकला, थकवा आणि श्वास लागणे अशी फ्लूसारखी लक्षणे दिसू शकतात. श्वास घेण्यात अडचण, सतत छातीत दुखणे किंवा छातीवर दबाव असल्यासारखे वाटणे, गोंधळून जाणे, जागे होण्यास अडचण येणे आणि चेहरा किंवा ओठ निळे होणे या सारखी लक्षणे आढळल्यास तात्काळ वैद्यकीय उपचारांचा सल्ला दिला जातो.

शिंका येणे, नाक वाहणे किंवा घसा खवखवणे अथावा मळमळ, उलट्या किंवा अतिसार ही लक्षणे फार कमी रुग्णांमधे दिसून आली आहेत.

हा रोग कसा पसरतो? याबद्दलचे काही तपशील निश्चित केले गेले आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने आणि अमेरीकेच्या सेंटर फॉर डिसीज कंट्रोल ॲन्ड प्रिव्हेंशन- सीडीसी या संस्थांच्या म्हणण्यानुसार हे विषाणू मुख्यतः दोन व्यक्तींच्या जवळच्या संपर्काच्या वेळी तसेच खोकला, शिंका येणे किंवा बोलताना बाहेर पडणाऱ्या थेंबाद्वारे पसरतात.

जवळचा संपर्क म्हणजे १ मीटर अथवा ३ फूट समजले जाते. सिंगापूरमधील एका संशोधनात असे आढळले आहे, की खोकताना किंवा शिंकताना रुमालाचा वापर न केल्यास किंवा मास्कचा वापर न केल्यास कोरोनाव्हायरस रोग २०१९- कोविड-१९ विषाणू हवेतून १५ फुटापर्यंत लांब पसरु शकत्तात.

हे विषाणू जवळच्या लोकांच्या तोंडात किंवा नाकात शिरतात आणि श्वासोच्छवासाद्वारे फुफ्फुसांमध्ये पोहचतात. प्रारंभिक अभ्यासानुसार कोरोनाव्हायरस रोग २०१९ विषाणूच्या संक्रमित व्यक्तींची संख्या ही दर ६ ते ७ दिवसांची दुप्पट होते आणि याचे मूलभूत पुनरुत्पादन प्रमाण हे २.२ ते २.७ असल्याचे मानले जात होते.

परंतु ७ एप्रिल २०२० रोजी प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार वुहानमधील साथीच्या सुरुवातीच्या काळात संक्रमित व्यक्तींची संख्या ही दर २.२ ते ३.३ दिवसांनी दुप्पट झाली होती.

जेव्हा एखादी व्यक्ती एखाद्या दूषित पृष्ठभागाला स्पर्श केल्यानंतर त्याच हाताने डोळ्यावर, नाकात किंवा तोंडाला स्पर्श करते तेव्हा अशा कृतीने ती व्यक्ती संक्रमित होते. त्यास फोमेट ट्रान्समिशन म्हणून ओळखले जाते.

संक्रमित व्यक्तीच्या मलमूत्रातून विषाणूचे संक्रमण पसरते, अशी चिंता व्यक्त केली जात असली तरी हा धोका कमी असल्याचेही मानले जाते.

लक्षणे दिसू लागताना हा विषाणू सर्वात जास्त संक्रामक असतो, परंतु लक्षणे दिसत नसतानाही व ती उद्भवण्याआधीही एखाद्या व्यक्तीद्वारा विषाणू पसरवला जाण्याची शक्यता आहे, परंतु अशी जोखीम कमी असल्याचे मानले जाते.

युरोपीयन सेंटर फॉर डिसीज प्रिव्हेंशन एंड कंट्रोल- ईसीडीसी या संस्थेच्या म्हणण्यानुसार हा रोग किती सहजतेने पसरतो, हे पूर्णपणे स्पष्ट नसले तरी एक व्यक्ती साधारणपणे दोन ते तीन इतर व्यक्तींना संक्रमित करते.

विषाणुशास्त्र- सीव्हियर ॲक्युट रेस्पिरेट्री सिंड्रोम कोरोनाव्हायरस २ हा एक व्हायरसचा वाण आहे, ज्यामुळे कोविड - १९ हा श्वसन रोग होतो. याला बोली भाषेत कोरोनाव्हायरस म्हणून ओळखले जाते. सुरुवातीच्या काळात याला नॉव्हेल कोरोनाव्हायरस- एनसीओव्ही हे तात्पुरते नाव दिले होते. जनुकीय विश्लेषणावरून असे दिसून आले आहे, की कोरोनाव्हायरस हा विषाणू बीटाकोरोनॅव्हायरस या विषाणूंच्या प्रजातीमधील आहे.

------------

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

# धार्मिक सुधारणावादी परंपरेच्या संरक्षणाचा लढा...

(कालच्या अंकावरून पुढे)

अद्वैत वेदांताचा आधार घेत त्यांनी ते त्या काळातील सामाजिक आणि राजकीय परिस्थितीस अनुरूप रीतीने मांडले. सर्व मानव एकाच तत्त्वावर आधारित असल्याचे त्यांनी प्रतिपादित केले आणि समाजसुधारणांसाठी आध्यात्मिक पाया निर्माण केला.

केरळमध्ये आध्यात्मिकतेला सामाजिक सुधारणेशी जोडण्यासाठी गुरुंचे शिक्षण अद्वैत वेदांत म्हणून ओळखले जाते. हे अद्वैत म्हणजे अखेरचे सत्य किंवा ब्रह्म हे एकच आणि अपरिवर्तनीय आह, आणि व्यक्तिगत आत्मा किंवा आत्मा हा या सार्वभौम तत्त्वाशी एकरूप आहे. अज्ञान हेच द्वैत (द्वंद्व) ची भ्रांती निर्माण करते, ज्यामुळे जात, धर्म आणि इतर पृष्ठभूमीवरील ओळखींच्या आधारे विभाग निर्माण होतात, असे गुरुंनी सांगितले. त्यांचे साधे, परंतु क्रांतिकारी घोषवाक्य होते, एक जात, एक धर्म, एक देव माणसासाठी, आणि त्यांनी सर्व जातींना समर्पित मंदिरे खुले करण्याचे प्रोत्साहन दिले.

श्री नारायण गुरु यांच्या प्रयत्नांनी केरळ समाज आणि त्यापलीकडेही बदलांची मूल्ये रूजली आणि त्यांना धार्मिक-आध्यात्मिक स्वरूपात देखील पाठिंबा मिळाला. त्यांच्या चळवळीने इझावा आणि इतर दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात सामील होण्याचा आत्मविश्वास दिला.

कालांतराने, त्यांच्या विचारांनी सामाजिक न्याय आणि समानतेसाठीच्या चळवळींना प्रेरणा दिली. नारायण गुरु हे पेरियार यांच्याप्रमाणे कडवे नास्तिक नव्हते. ते सनातन धमार्ला पूर्णपणे नाकारत नव्हते, तर उपासनेची मक्तेदारी काही मूठभर लोकांच्याच हातीएकवटू नये व ते शोषितांसाठीही उपलब्ध व्हावे यावर ते ठाम होते.

आध्यात्मिकतेचा मार्ग व अधिकार सर्व जातींना एकसारखा असावा आणि ब्राम्हणयवादी मक्तेदारी मोडून काढावी म्हणून त्यांनी निश्चितच प्रयत्न केले. डावे पक्ष त्यांना एक सामाज सुधारक म्हणून पाहतात. डाव्या चळवळीला पोषक अशी पुरोगामी पार्श्वभूमी या धार्मिक सुधारणावादी चळवळीने मिळाली.

श्री नारायण गुरु हे आधुनिक दक्षिण भारतातील एक महान सामाजिक सुधारक होते. त्यांनी भारतीय समाजात खोलवर रुजलेल्या जातीय व्यवस्थेवर प्रखर प्रहार केला. आध्यात्मिक गुरू, तत्त्वज्ञ आणि दूरदर्शी नेता म्हणून, नारायण गुरु हे विशेषतः केरळमधील समाजातील दुर्बल घटकांसाठी आशेचा किरण ठरले.

त्यांच्या कार्याने त्यांच्या कार्यक्षेत्रात सामाजिक व सांस्कृतिक पुनर्जागरणाची सुरुवात झाली. जातीवादी वर्चस्वाच्या त्या विशिष्ट परिस्थितीला विरोध करणारे श्री नारायण गुरूंनी व्यापक आणि सर्वसमावेशक ह्यएक जात, एक देव, मानवजातीसाठी एक धर्मह्व तत्त्वज्ञान मांडले.

त्यांचा प्रभाव फक्त खालच्या जातींपुरता मर्यादित नव्हता; अनेक प्रबुद्ध विचारवंत आणि उच्चवर्णीय नेत्यांनीही त्यांचे तत्त्वज्ञान समजून त्याला मान्य करत बदल घडवण्यासाठी आत्मसात केले. महात्मा गांधी आणि रवींद्रनाथ टागोर यांसारख्या नेत्यांवरही त्यांचा प्रभाव पडला. गांधीजींनी त्यांना भेटल्यानंतर त्यांना पूर्ण माणूस आणि भारताच्या आध्यात्मिक परंपरेचे खरे प्रतिनिधी म्हटले. इतिहासात त्यांचे स्थान एक महान सुधारक म्हणून कायम आहे.

अत्याचारग्रस्त जातींच्या शैक्षणिक आणि सामाजिक उन्नतीसाठी त्यांनी १९०३ मध्ये श्री नारायण धर्म परिपालन योगम (एसएनडीपी योगम) ची स्थापना केली. एक शतकापूर्वी शिवगिरी आश्रमाची स्थापना करणारे श्री नारायण गुरु हे केरळच्या अग्रगण्य समाजसुधारकांपैकी एक मानले जातात.

परंतु जेव्हा त्यांनी पाहिले की व्यापक दृष्टीने काम करण्याऐवजी श्री नारायण धर्म परिपालन योगम केवळ इझावा जाती-समाजाच्या लोकांचा वर्चस्व असलेली संघटना बनत गेली, तेव्हा ते निराश झाले आणि एका दशकानंतर, त्यांनी एसएनडीपी योगमपासून स्वतःला अलिप्त केले. गुरूंनी स्थापन केलेले व त्यांची समाधि असलेले शिवगिरी हे आता इझावांचे प्रमुख तीर्थक्षेत्र आहे.

केरळच्या लोकसंख्येच्या 23% भाग असलेल्या इझावा समुदायाला इतर मागास जाती म्हणून वर्गीकृत केले जाते. त्यांना भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी) नेतृत्वाखालील एलडीएफचे पारंपारिक मतदार मानले जाते, ज्यात काही मतं यूडीएफ कडे जातात.

समाजात धार्मिक गोष्टी मानणारे परंतु कर्मकांड, जातीवाद आणि ब्राह्मणी वर्चस्ववादाचा विरोध करणारे बरेच आहेत. याचे एक उदाहरण म्हणजे, श्री नारायण धर्म परिपालन योगमने राम मंदिराच्या अभिषेकाचे स्वागत केले असतानाच, त्याचे शिवगिरी मठाचे अध्यक्ष स्वामी सच्चितानंद यांनी अयोध्या अभिषेक सोहळ्यापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला.

उत्तरार्ध

आजवर मठा नेतृत्वाने प्रमुख मंदिरांमधील पुजारीपद्धतीच्या ब्राह्मणवादी वर्चस्व विरोधात आवाज उठवण्यासाठी आपल्या प्रभावाचा वापर केला आहे. त्यांनी मोठ्या मंदिरांमध्ये पुजारी पदे ब्राह्मण समाजापुरती मर्यादित करण्यावर त्यांनी टीका केली आहे.

स्वामी सच्चितानंद यांनी या कार्यक्रमात मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी पुरुषांना त्यांचे शर्ट काढायला लावण्याची दुष्ट प्रथा सोडली पाहिजे. पूर्वीच्या काळात वरच्या जातीच्या लोकांनी पुनूल (जानेऊ) घातलेले आहे की नाही त्याची खात्री करून घेण्यासाठी ही प्रथा पडली. ही प्रथा आजही मंदिरात चालू आहे.

श्री नारायण सोसायटी या प्रथेला बदलू इच्छिते असे मत व्यक्त केले. पिनराई विजयन यांनी स्वामी सच्चितानंद यांच्या या मताचेही समर्थन करत हे नारायण गुरु यांच्या परंपरेला धरून होईल आणि त्याने सामाजिक बदल होतील असे मत व्यक्त केले.


ॲड. संजय पांडे
(9221633267)
adv.sanjaypande@gmail.com

वेगवेगळ्या काळात भक्ति संप्रदायात व धार्मिक समाजसुधारकांनी हिंदू धमार्तील चालीरीती, अंधश्रद्धा, ब्राह्मणवादी कर्मकांड, जातीवाद यावर आपापल्या पद्धतीने टीका केली आणि आपापले समर्थक, भक्त व पंथ निर्माण केले.

या सर्व धर्म सुधारकांनी समाज सुधारणा करण्यासाठी जे काही लिहिले, बोलले, त्यामुळे तात्कालिक धर्म पीठाधीशांच्या खुर्चीला धक्का लागल्याने त्यांना विरोध देखील सहन करावा लागला. परंतु आज धर्मावर काहीही म्हटल्यावर वाद माजवून मतांचे भांडवल करण्याचा आरएसएसचा यशस्वी फॉर्म्युला आहे.

या पद्धतीने भाजप वगळून इतर सर्व पक्षांना सनातन-हिंदू विरोधी आणि मुस्लिम तुष्टीकरण करणारे म्हणून सगळीकडे बदनाम करण्यात येते. त्या त्या समाजात संघटना, जयंत्या, मंदिरे, पीठ यावर कब्जा मिळवून धार्मिक मतांचे ध्रुवीकरण केले जाते.

ब्राह्मणवाद, जातीवाद आदींवर रोखठोक भूमिका घेणाऱ्या कम्युनिस्टांना धर्मविरोधी, सत्तानिरोधी, हिंदू विरोधी घोषित करण्याचा प्रचार केला जात आहे. केरळमध्ये भाजपकडून धार्मिक संघटना, संस्था आणि धर्मगुरूंना आपल्या जाळ्यात ओढण्याचे काम जोरात सुरू आहे. मठाला मानणाऱ्या समाजाचा काही भाग हिंदुत्वाकडे वळत आहे. अनेक समाज सुधारकांना संघाने आणि भाजपने अशाच प्रकारे हायजॅक केले आहे.

भाजप इझावा समाजात आपला आधार तयार करण्याचा प्रयत्न करत आहे. भाजपकडे आधीच मोठ्या प्रमाणावर उच्च जातीची हिंदू मतं आहेत. इझावा समुदायाची मुख्य संघटना, श्री नारायण धर्म परिपालन योगमचा एक राजकीय प्रभाव आहे. पिनराई विजयन यांच्या श्री गुरु संदर्भातल्या व्यक्तव्याचा वापर भाजपकडून सीपीआय(एम)ला लक्ष्य करून धार्मिक ध्रुवीकरणासाठी केला जात आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत एलडीएफचा अनेक ठिकाणी पराभव झाला आणि भाजपने डाव्या बालेकिल्ल्यात विजय मिळवला. श्री नारायण धर्म परिपालन योगमचे अध्यक्ष वेल्लापल्ली नटेसन केरळमधील सत्ताधारी सरकारांना समर्थन देत आले आहेत.

तथापि, त्यांचा मुलगा तुषार वेलप्पल्ली, जो एसएनडीपीच्या राजकीय शाखेचा राष्ट्रीय अध्यक्ष आहे, भाजपला पाठिंबा देतो. आता एसएनडीपी योगममध्ये उघड भाजपसमर्थक लोकांचा भरणा माकपसाठी नुकसानदायक आहे.

सध्या भाजपला हा आयता मुद्दा सापडला आहे. नायर सेवा सोसायटी ह्या उच्च जातीच्या संघटनेसोबत विजयन यांच्यावर टीका सुरू केली. अर्थात टीकेचे मुद्दे तेच जुने की ह्यरूढी परंपरांना बदलण्याचा आग्रह का धरला जात आहे?

इतर धर्मांच्या रूढी परंपरेवर टीका का केली जात नाही. रूढी-परांपरांना ह्यदुष्टह्व म्हणण्याचा त्यांना काय अधिकार वगैरे. मात्र आता आरएसएसकडून केरळमध्ये प्रवेश करण्याच्या व निवडणुकीची रणनीतीचा एक भाग म्हणून, इझावा समुदायाला जवळ केलं जात आहे आणि या पुरोगामी समाजसुधारकांना मानणाऱ्या लोकांना धारेवर धरलं जात आहे. समाजाच्या राजकीय भाराची जाणीव असलेल्या मठाने आपले पत्ते अजून उघडले नाहीत. बहुतेक त्यांच्यातले राजकीय-धार्मिक विरोधाभास आणि आर्थिक पाठबळ व सुविधांची गरज याचे मुख्य कारण असावे आणि असे असणे चिंताजनक आहे.

●●●●●●

# निवडणूक आयोग जेंव्हा राजकारण्यांचे कान टोचते...

दिल्लीतील विधानसभा निवडणुकांची घोषणा करताना भारताच्या मुख्य निवडणूक आयुक्तांनी महाराष्ट्रात पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीतील आरोपांवरही प्रतिक्रिया दिली आहे. दिल्ली विधानसभा निवडणुका ५ फेब्रुवारी रोजी होणार असून निकाल ८ फेब्रुवारी रोजी येणार आहेत. यावेळी त्यांनी स्टार प्रचारकांची हेलिकॉप्टर तपासणी ते मतदानाची टक्केवरील सर्व आक्षेपांना उत्तरे दिली आहे. याशिवाय सर्व राजकारण्यांनी शिष्टाचाराचे पालन केले पाहिजे, असे आवाहनही केले.

मतदार यादीत चुकीच्या नोंदी केल्याच्या आरोपांवर मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले की, आरोप ऐकून वाईट वाटते. ही ईव्हीएम निवडणूक असल्याचे सांगण्यात आले. मतदार यादीतून नावे वगळल्याची तक्रार करण्यात आली आहे. मतमोजणी संथगतीने होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवडणूक आयोगावर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. काही नियम बदलले आहेत, त्यामुळे पारदर्शकता संपली आहे, असे सांगण्यात आले.

४५-५० लाख मतदान अधिकारी आहेत, जे एकाच राज्याचे आणि वेगवेगळ्या विभागांचे आहेत. बूथवर २-३ दिवस अगोदर पोहोचा. प्रश्न विचारण्याचा अधिकार लोकशाहीत आहे. आम्ही त्याचा आदर करतो. उत्तर देण्याची जबाबदारी आमची आहे. सर्व प्रश्न महत्त्वाचे आहेत, उत्तर महत्त्वाचे आहे. आयुक्तांनी शेर ऐकवला- आदतन कलमबंद जवाब देते रहे, रूबरू जवाब बनता है। क्या पता कल हो ना हो, आज जवाब बनता है।

२०२० पासून ३० राज्यांमध्ये निवडणुका झाल्या. विविध पक्षांना सर्वाधिक जागा मिळाल्या. यावरून भारतीय मतदार किती जागरूक आहे हे दिसून येते. जर तुम्ही हे संपूर्ण चित्र एखाद्याला दाखवले तर पक्षांना कळेल की निकालाच्या आधारे प्रक्रियेचे मूल्यांकन केले जाऊ शकत नाही.

महाराष्ट्राचा संदर्भ देत ते म्हणाले की, हेलिकॉप्टर तपासणीवर आक्षेप घेतला गेला. खरे तर पोलिंग ऑफिसरचे कामच आहे की, सर्वकाही तपासले पाहिजे. राजकारण्यांनी शिष्टाचार पाळला पाहिजे, असे आवाहन आम्ही करतो. खरेतर, महाराष्ट्र निवडणुकीच्या वेळी उद्धव ठाकरे यांनी आयोगाकडून हेलिकॉप्टर तपासणीवर आक्षेप घेत एक व्हिडिओही बनवला होता. याची सर्व देशात चर्चा त्यावेळी झाली होती. याच संदर्भात निवडणूक आयुक्तांनी आज उत्तर दिले.

निवडणूक आयोगाच्या कारवाईवर उद्धव ठाकरे संतापले होते. १२ नोव्हेंबरला ते म्हणाले होते, गेल्या वेळी जेव्हा पीएम मोदींच्या हेलिकॉप्टरची झडती घेण्यात आली तेव्हा ओडिशात एका अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आले होते. तुम्ही माझी बॅग तपासली, काही हरकत नाही, पण मोदी आणि शहा यांच्या बॅगाही तपासल्या पाहिजेत. निवडणूक आयुक्तांनी हा आरोप लक्षात घेतला खरा . पण, राजकारण्यांचेही कान टोचले आहेत.

■ ■ ■

## कुंभमेळा : विश्वातील सर्वात मोठी धार्मिक यात्रा

13 जानेवारी 2025 पासून प्रयागराज येथे कुंभमेळा भरतो आहे. गंगा- यमुना-सरस्वती या त्रिवेणी संगमावरच्या महा कुंभाचे वेध साधू- संत यांना खूप आधीपासूनच लागतात. शासनाची तयारी पण वर्षभरापासून सुरू होते.

कुंभमेळा ही जगातील सर्वात मोठी सांस्कृतिक आणि धार्मिक यात्रा आहे. भारतातील आणि परदेशातील साधू - संत, भाविक, साधक यावेळी एकत्र येऊन कुंभ नदीत स्नान करतात . या पवित्र स्नानाला विशेष महत्त्व आहे. कुंभातील स्नानाने देहाची आणि मनाची शुद्धी होते अशी दृढ श्रद्धा आहे. सर्वच साधू - संत संसारिक मोह माया सोडून ईश्वर प्राप्तीसाठी साधना करतात. येथे गंगास्नान, साधना, दानधर्म, पितृतर्पण, श्राद्धविधी, संतदर्शन, धर्मचर्चा इत्यादी धार्मिक कृतींना विशेष महत्व आहे, त्यासाठीच देश विदेशातून कोट्यवधी भाविक येतात. विदेशी भक्तांची भक्ती तर भारतीय नास्तिकता वाल्यांना चपराक आहे. जे हिंदू असूनही, भारतीय संस्कृती आणि अध्यात्मावर टीका करतात.

प्रत्येक कुंभाच्या वेळी आखाड्यांच्या नियमानुसार शाही स्नान होतात. आखड्यांची आगमनाची शाही मिरवणूक आणि शाही स्नान हे कुंभ मेळ्याचे आकर्षण आहे. बरेच देश - विदेशी पत्रकार आणि संशोधक येथे येऊन त्यांचे संकलन आणि संशोधन कार्य करतात.

सर्वत्र मोठ्या प्रमाणात अन्नछत्र सुरू असतात. त्यामुळे इतकी गर्दी असतांनाही कुंभमेळ्यात कुणीही उपाशी राहत नाही.

या ठिकाणी बऱ्याच आध्यात्मिक आणि सामाजिक संस्थांचे स्टॉल, प्रदर्शन, सहायता कक्ष असतात. काही ठिकाणी भजन, प्रवचन, सत्संग, कीर्तन वगैरेंचे आयोजन केले जाते. एकूणच काय तर संपूर्ण वातावरण ईश्वरमय असतं आणि म्हणूनच आनंदाची अनुभूती येते. सगळ्या संसारी गोष्टींचा विसर पडतो. एवढ्या महान कुंभाचे आयोजन करत असताना, त्यात सहभागी होत असताना, आनंदासोबतच भयाची ही किनार आज दिसते आहे. कारण या महाकुंभात आता आतंकवाद्यांच्या हमल्याचे अरिष्ट घोंगावत आहे.

वाचक लिहितात

सुरक्षा यंत्रणा सतर्क आहे, सक्षम आहे. त्याचा थोडाफार त्रास होईल परंतु सुरक्षेच्या दृष्टीने ते गरजेचे आहे. कुंभमेळा भारताच्या आध्यत्मिक वैभवाचे, भारतीय परंपरेचे आणि एकात्मतेचे दर्शन घडवणारा असतो. महाकुंभा विषयीच्या अफवांवर विश्वास न ठेवता इतरांना सुद्धा जागृत करू या. या विश्वातील सगळ्यात मोठ्या आणि चैतन्यमय धार्मिक यात्रेचा एक हिस्सा बनू या.

■ सौ. माधवी पत्की
नागपूर.

# डायबिटीज असणाऱ्यांनी दिवसभरात किती चपात्या खाव्यात?

मधुमेह असणाऱ्या रुग्णांना खाण्या-पिण्याच्या बाबतीत फार काळजी घ्यावी लागते. अनेक नियम पाळावे लागतात. खाण्या-पिण्यावर अनेक नियंत्रण ठेवावं लागतं. त्यातील एक महत्त्वाचा पदार्थ म्हणजे चपाती. अनेकांना जेवणात चपाती ही हवीच असते. पण शुगरमुळे त्यांना चपाती खाणे टाळावे लागते. कारण चपाती खाण्यामुळे साखरेच्या पातळीत वाढ होते असं म्हटलं जातं.



तज्ज्ञांनी सांगितल्याप्रमाणे डायबिटीज असलेले लोकंही चपाती नक्कीच खाऊ शकतात. पण मग एका दिवसात त्यांनी किती चपात्या खाल्ल्या पाहिजेत. ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवता येईल?

गव्हापासून तयार केलेली चपातीमध्ये अनेक प्रकारचे पोषक तत्त्व असतात. संपूर्ण गव्हामध्ये फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे भरपूर प्रमाणात असतात. तसेच, हे पचन सुधारण्यासाठी प्रभावी आहे असतात. गव्हातील फायबर ग्लुकोजचे शोषण कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

जर तुम्हाला मधुमेह असेल तरीही तुम्हीही गव्हाची चपाती खाऊ शकता पण मर्यादित प्रमाणात. संपूर्ण गव्हाच्या चपातीमध्ये रिफाईंड पिठाच्या चपातीपेक्षा कमी ग्लायसेमिक निर्देशांक असतो, जो रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी प्रभावी ठरू शकतो.

डायटीशियन सांगतात की जर तुम्हाला मधुमेह असेल तर चपाती मर्यादित प्रमाणातच खाव्यात. एका दिवसात किती चपात्या खाव्यात हे चपातीच्या आकारावर अवलंबून असते.

जर तुम्ही मध्य आकाराच्या चपात्या खात असाल तर तुम्ही 2 ते 3 चपात्या म्हणजे (30-50 ग्रॅम कार्बोहायड्रेट) खाऊ शकता. मधुमेहाच्या रुग्णांनी फक्त नाश्ता किंवा दुपारच्या जेवणात चपाती समावेश करण्याचा प्रयत्न करावा.

परंतु हे देखील लक्षात घ्या की तुम्ही किती वेळा चपाती खाता ते तुमचे वय, लिंग, शारीरिक क्रियाकलाप आणि इतर आरोग्य परिस्थितींवर अवलंबून असते. अशा परिस्थितीत जर तुम्ही रोटी खात असाल आणि त्याचे योग्य प्रमाण जाणून घ्यायचे असेल तर एकदा तुमच्या एंडोक्राइनोलॉजिस्टचा सल्ला घ्या. तुमच्यासाठी हा सर्वोत्तम पर्याय असू शकतो. यामुळे तुम्हाला चपात्यांची योग्य संख्या आणि योग्य सल्ला मिळू शकतो.

**गव्हाव्यतिरिक्त इतरही पर्याय**

मधुमेहामध्ये चपाती खाणाऱ्यांनी या गोष्टींकडेही लक्ष द्यावे-तुम्ही चपाती किती आणि कोणत्या प्रमाणात खात आहात याकडे लक्ष द्या.

फायबरचे प्रमाण वाढवण्यासाठी गव्हाव्यतिरिक्त नाचणी, बार्ली किंवा बेसन वगैरे घालण्याचा प्रयत्न करा.

राजगिरा, बकव्हीट आणि नाचणी यांसारख्या पिठांमध्ये काबोर्हायड्रेट्सचे प्रमाण कमी असते आणि ते रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यासाठी प्रभावी ठरतात. रिफाइंड पिठाच्या ऐवजी संपूर्ण गव्हाच्या पिठापासून बनवलेल्या चपात्या तयार करा आणि खा, त्यात कमी ग्लायसेमिक इंडेक्स आहे आणि फायबर आणि प्रथिनांचा चांगला स्रोत आहे. यामुळे तुमची साखरेची पातळी नियंत्रणात राहू शकते. ■ ■

## अशोकायन

### भावांतर योजना राबवा

बाजारभाव व हमी भाव
यातील फरक शासनाने द्यावा
कृषीमाल खरेदीचा हेका
खरचं सोडून द्यावा . .

शासकीय योजना म्हणजे
वराती मागुन घोडे
आंधळं दळतयं अन
कुत्रं पिठ खातय गडे ..

मध्यस्थ व दलाल
होताहेत मालामाल
शेवटी बळीराजाच
राहतो भाऊ कंगाल . .


प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# प्रत्येक श्वासात आशा: शालिनीताई मेघे मदर अँड चाईल्ड हॉस्पिटलच्या नवजात शिशू विभागाचा प्रीटर्म बेबीसाठी जीवन वाचवणारा प्रवास

**नागपूर, ७ जानेवारी :** वेळेच्या आत जन्माला आलेल्या एका नवजात शिशूला वानाडोंगरी येथील शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरमध्ये ३०० खाटांची क्षमता असलेल्या शालिनीताई मेघे मदर अँड चाइल्ड हॉस्पिटलमधील माता आणि बाल संगोपन नवजात अतिदक्षता विभागाच्या टीमने अपवादात्मक काळजी प्रदान करीत रुग्णालयाची वचनबधता पुन्हा एकदा सिद्ध केली.

वेळेच्या आत जन्मलेले हे मूल गर्भधारणेच्या २९-३० आठवड्यांपूर्वी अकाली प्रसूती झाल्यानंतर गंभीर आव्हानांचा सामना करत होते. या बाळाचे वजन अवघे १.०७० किलोग्राम भरत होते. त्यामुळे बाळ एकेका श्वासासाठी गंभीर श्वसनसंकट सिंड्रोम आणि सेप्सिसशी झुंजत होते. बाळाला बालरोग विभागांतर्गत नवजात शिशू अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. बाळाचा जन्म ३२ आठवड्यांपूर्वीच झाल्याने बाळाचे गर्भात असताना फुफ्फुस परिपक्व होऊ शकले नव्हते. बाळाला सर्फेक्टंटचा त्रास होत होता. (फुफ्फुसांच्या आत द्रव आणि प्रथिनांचा थर असणे फुफ्फुसाची कार्यक्षमता कमी होणे) त्यामुळे या नवजात शिशूला १३ दिवस यांत्रिक पद्धतीने त्याच्या श्वासोच्छवासातला नैसर्गिक दबाव राखण्याचे आव्हान तज्ज्ञांसमोर होते. बाळाला सातत्याने सकारात्मक वायुमार्गाचा दाबच्या व्यवस्थापनासह त्वरीत वैद्यकीय हस्तक्षेपांची आवश्यकता होती. या जीवघेण्या परिस्थितीतून नवजात शिशूच्या श्वसन आव्हानांवर मात करण्यासाठी तज्ज्ञांची काळजी आणि अचूक उपचार आवश्यक असतात.



बाळ सकारात्मक प्रतिसाद देत असल्याने त्याला टप्प्या टप्प्याने कृत्रिम श्वासोच्छवास प्रणालीद्वारे पुरेसा प्राणवायू देण्यात आला. बाळाला संपूर्ण आहार मिळवा यासाठी हळूहळू ओरो गॅस्ट्रिक फीडिंग वाढविण्यात आले. बबल सीपॅप द्वारे बाळाच्या शरिरात दूध सोडण्यात आले. उपचारादरम्यान बाळाची दृष्टी सुरक्षित ठेवून त्याचे अंधत्व वाचविण्यासाठी त्याची रेटिनोपॅथी ऑफ प्रीमॅच्युरिटी (आरओपी) तपासणी करण्यात आली.

याबाबत बालरोग विभागाचे प्रमुख डॉ.सी.एम. बोकाडे म्हणाले, हे प्रकरण आमच्या एनआयसीयू टीमची उच्च-जोखीम असलेल्या अकाली अर्भकांचे व्यवस्थापन करण्यासाठी समर्पण आणि सांघिक कार्य अधोरेखित करते. तीव्र श्वसनाचा त्रास आणि इतर गुंतागुंत असूनही, या बाळाचे जगणे आणि त्याला धोक्यातून बाहेर काढणे शक्य झाले. शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरमध्ये केअर प्रोटोकॉलचे बारकाईने निरीक्षण केले जाते. सर्फेक्टंटवर आमचे लक्ष थेरपी, व्हेंटिलेटरी सपोर्ट आणि आरओपी स्क्रिनिंगने बाळाच्या न्यूरोलॉजिकल आणि एकूणच आरोग्याची खात्री केली जाते. अशा परिणामांचा आम्हाला अभिमान वाटतो. नाजूक नवजात शिशूंना शक्य तितकी सर्वोत्तम काळजी प्रदान करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.

शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे संचालक डॉ. अनुप मरार म्हणाले, वेळेच्या आत जन्माला आलेल्या या नवजात शिशूची यशस्वी पुनर्प्राप्ती ही रुग्णालयातील अत्याधुनिक सुविधा आणि क्लिनिकल उत्कृष्टता अधोरेखित करते. आमची नवजात शिशू अतिदक्षता टीम, डॉ सी.एम. बोकाडे यांच्या सक्षम नेतृत्वाखाली हाताळली जाते. नवजात आरोग्य सेवांमध्ये उत्कृष्टतेला प्राधान्य देणारी रुग्णालयाची टीम प्रत्येक गरजूच्या बाबतीत वचनबद्ध आहे.

शालिनीताई मेघे मदर अँड चाइल्ड हॉस्पिटलच्या प्रशासक डॉ. ऋचा शर्मा, म्हणाल्या, हॉस्पिटलच्या बाहेर प्रसूती आणि विशेष नवजात शिशू अतिदक्षता विभागाची काळजी आवश्यक असलेल्या नवजात मुलांसाठी खास या एनआयसीयुची रचना करण्यात आली आहे. पारंपारिकपणे रुग्णालये आपल्या संस्थेत जन्माला आलेल्या बाळांनाच ही सुविधा प्रदान करतात. शालिनीताई मेघे मदर अँड चाइल्ड हॉस्पिटल ने असे दोन वेगळे विभाग स्थापन करून आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. जन्मलेल्या नवजात बाळांसाठी अत्याधुनिक मिल्क बँकेच्या अतिरिक्त सुविधेसह हे विभाग सज्ज आहे. इतर स्त्रीरोग नर्सिंग होममध्ये जन्मलेल्या बाळांच्या पालकांना नवजात शिशू अतिदक्षता विभागात सुविधा मिळविण्यासाठी अनेकदा संघर्ष करावा लागतो. त्यामुळे रुग्णालयाचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण दिलासा आहे. प्रसूती तज्ञांनी शालिनीताई मेघे मदर अँड चाइल्ड हॉस्पिटलच्या प्रगतीशील पावलाचे कौतुक केले आहे. ते गरजू जन्मलेल्या नवजात बालकांची काळजी घेण्यास वचनबद्ध आहे.

## सीग्राम्स रॉयल स्टॅग पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरची ग्लोबल सेन्सेशन नेटफ्लिक्सच्या स्क्विड गेम सीझन २ सोबत सहयोगासाठी भागीदारी

*__नागपूर, ७ जानेवारी :__ सीग्राम्स रॉयल स्टॅग ने नेटफ्लिक्सची विक्रमी लोकप्रिय मालिका 'स्क्विड गेम' च्या दुसऱ्या सीझनसाठी भागीदारी केली आहे. या सहयोगामुळे रॉयल स्टॅग च्या लाइव्ह इट लार्ज तत्त्वज्ञानाचा समावेश सहजपणे केला गेला आहे, ज्यामुळे प्रेक्षकांना एका भव्य अनुभवाचा भाग बनण्याची संधी मिळेल. ही मालिका संपूर्ण जगभरातील कोट्यवधी प्रेक्षकांना मोहून टाकत आहे. के-ड्रामा युवकांमध्ये विशेष लोकप्रिय असल्याने, ही भागीदारी ब्रँडसाठी सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या युवा प्रवृत्तीला प्रोत्साहन देण्याची संधी निर्माण करते, ज्यामुळे त्याचा आकर्षण आणि प्रासंगिकता आणखी वाढते.*

*या सहयोगाबाबत बोलताना पर्नोड रिकार्ड इंडिया चे जनरल मॅनेजर मार्केटिंग जॉयदीप बसुरॉय म्हणाले, नेटफ्लिक्सच्या 'स्क्विड गेम' सोबत रॉयल स्टॅगची भागीदारी ब्रँडला युवा पिढीच्या के-कल्चरच्या क्रेझला जोडण्याची संधी देते, ज्यामुळे भावनिक संबंध वाढतो आणि ब्रँडचा युवा कल्चर उंचावतो. रॉयल स्टॅग ब्रँड नेहमीच मोठी स्वप्ने पाहणाऱ्या आणि उत्कटतेने व उद्देशपूर्ण जीवन जगणाऱ्या लोकांसाठी उभा राहिला आहे, जे या शोच्या संकल्पनेशी जुळते. 'स्क्विड गेम' सीझन २ सोबतची ही भागीदारी आम्हाला आमच्या प्रेक्षकांना 'लाइव्ह-इट-लार्ज' अनुभव आणि ठोस सामाजिक महत्त्व देण्याची संधी देते अर्थात 'जनरेशन लार्ज' साठी!*

*ब्रँड या सहयोगाचा विविध डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रभावी वापर करत आहे, ज्यामध्ये 'स्क्विड गेम' मधील खास वैशिष्ट्ये, जसे की गूढ मुखवटे घातलेले रक्षक आणि शोची विशिष्ट चिन्हे, ठळकपणे दाखवली जात आहेत. प्रेक्षकांना www.royalstagfan.com ला भेट देऊन रॉयल स्टॅग X स्क्विड गेम ची रोमांचक गिव्हवे जिंकण्याची संधीही मिळू शकते. महत्वाची बाब ही की ब्रँडची मोहिम#PlayItLarge २८ डिसेंबर २०२४ रोजी शोच्या प्रीमियरनंतर Twitter वर ट्रेंडिंग होती.*

## ओकाया ईव्ही चे नव्याने नामकरण, आता ओपीजी मोबिलिटी ; इलेक्ट्रिक वाहनांच्या वाढत्या पोर्टफोलिओसाठी नवीन दृश्यमान ओळख सादर

**नवी दिल्ली, ७ जानेवारी :** भारतातील वाढत्या इलेक्ट्रिक मोबिलिटी बाजाराच्या गरजा पूर्ण करण्याच्या रणनीतिक प्रयत्नांत, ओकाया ईव्ही ने आपल्या नवीन ब्रँड ओळखीची घोषणा केली असून, आता हा ब्रँड ओपीजी मोबिलिटी या नावाने ओळखला जाईल. हे पुनर्ब्रँडिंग कंपनीच्या अत्याधुनिक डिझाईन, भविष्यकालीन तंत्रज्ञान आणि टिकाऊ व सुरक्षित उत्पादनांप्रती असलेल्या दृढ वचनबद्धतेचे प्रतीक आहे, जे भारतातील सतत बदलणाऱ्या ग्राहकांच्या गरजा पूर्ण करेल. वाढत्या मागणीच्या पूर्ततेसाठी, ओपीजी मोबिलिटी देशभरातील विस्तृत डीलर नेटवर्कचा लाभ घेणार आहे. ओपीजी मोबिलिटी दोन उप-ब्रँड्स अंतर्गत कार्य करेल. फेराटो हा प्रीमियम इलेक्ट्रिक मोटरसायकल आणि स्कूटर्ससाठी समर्पित असेल तर ऑटोपीजी हा प्रवासी आणि मालवाहतूक तिपाहिया वाहनांवर केंद्रित असेल.



या रोमांचक घडामोडीवर भाष्य करताना ओपीजी मोबिलिटीचे व्यवस्थापकीय संचालक, अंशुल गुप्ता म्हणाले, बॅटरी आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील अनेक वर्षांच्या नेतृत्वानंतर, ओकाया ईव्ही वरून ओपीजी मोबिलिटीमध्ये रूपांतरित होण्याचा आम्हाला आनंद आहे. आम्ही संपूर्ण इलेक्ट्रिक वाहन उपाय प्रदान करणारा एक समग्र ब्रँड बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहोत. हे पुनर्ब्रँडिंग केवळ नाव बदलण्यापुरते मर्यादित नाही, तर भारतातील वेगाने विकसित होत असलेल्या ईव्ही बाजारात आघाडी कायम राखण्यासाठी एक रणनीतिक पाऊल आहे. आम्ही आधुनिक भारतीय ग्राहकांच्या गरजा समजून घेत आहोत, आणि ही नवीन ओळख आमच्या आधुनिक डिझाईन, प्रगत तंत्रज्ञान आणि ग्राहकप्रथम दृष्टिकोनाच्या बांधिलकीचे प्रतिबिंब आहे. आमचा नवीन लोगो आमची नवी ऊर्जा दर्शवतो आणि तरुण, तंत्रज्ञानी ग्राहकांशी अधिक जोडले जाण्याची आमची इच्छा देखिल व्यक्त करतो.

अंशुल पुढे म्हणाले, भारत मोबिलिटी २०२५ एक्स्पो ही आमच्या या नवीन दृष्टिकोनाचे अनावरण करण्यासाठी परिपूर्ण व्यासपीठ आहे. आम्ही ओपीजी मोबिलिटी ब्रँड अंतर्गत आमचे पहिले उत्पादन लाँच करू आणि संपूर्ण उत्पादन श्रेणीत ही दृश्यमान बदल प्रक्रिया लागू करू. हा बदल प्रत्येक ग्राहक संपर्क बिंदूवर डिजिटल तसेच भौतिक स्वरूपात दिसून येईल, ज्यामुळे एकसंध आणि आकर्षक ब्रँड अनुभव सुनिश्चित केला जाईल. आपल्या नव्याने साकारलेल्या ओळखीच्या माध्यमातून, ओपीजी मोबिलिटी भारतीय सरकारच्या आत्मनिर्भर भारत दृष्टिकोनाशी सुसंगत होत आहे. कंपनी भारतात निर्मित नव्या पिढीच्या इलेक्ट्रिक दुचाकी आणि तिपाहिया वाहनांच्या विकासावर भर देत आहे. ओपीजी मोबिलिटी दर्जेदार उत्पादने योग्य किमतीत उपलब्ध करून देण्यास वचनबद्ध आहे, ज्यामुळे मोठ्या ग्राहकवर्गाच्या गरजा पूर्ण करता येतील. यासोबतच, कंपनी भारतभर आपल्या सेवा आणि डीलरशिप नेटवर्कचा विस्तार करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. २०२५ पर्यंत, ओपीजी मोबिलिटी देशभरातील सर्व प्रमुख शहरांपासून ते टियर-३ आणि टियर-४ लोकेशन्सपर्यंत प्रत्येक ग्राहकाला प्रीमियम सेवा उपलब्ध करून देण्याचा मानस ठेवते.

## नवीन फिक्स्ड डिपॉझिट मार्केटप्लेस सादर करून टाटा न्यूने बचतीला दिली गती

**नागपूर, ७ जानेवारी :** टाटा डिजिटल कंपनीने आपल्या टाटा न्यू या प्लॅटफॉर्मवर फिक्स्ड डिपॉझिट मार्केटप्लेस ही सुविधा सादर केली असून या माध्यमातून किरकोळ गुंतवणुकीच्या क्षेत्रात आपला विस्तार केला आहे. या नाविन्यपूर्ण प्लॅटफॉर्मवरून ग्राहकांना ९.१ टक्क्यांपर्यंतच्या व्याजदराने आघाडीच्या वित्तीय संस्थांमध्ये मुदत ठेवींत गुंतवणूक करता येईल. त्याकरीता त्यांना बँकेच्या बचत खात्याची गरज लागणार नाही.

गुंतवणूक करणे आता पूर्वीपेक्षा सोपे आणि अधिक सुलभ झाले आहे. टाटा न्यूचे ग्राहक आता कमीतकमी १००० रुपयांची गुंतवणूक अखंड डिजिटल प्रक्रियेद्वारे अवघ्या १० मिनिटांत करू शकतात. ग्राहकांची सुरुवातीच्या भांडवलाची रक्कम कितीही असली, तरी या सुविधेमुळे प्रत्येक ग्राहकासाठी आर्थिक सक्षमीकरणाचे दरवाजे उघडले जातील. थेट बँकांमध्ये होणाऱ्या या गुंतवणुकीवर डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन (डीआयसीजीसी) या संस्थेद्वारे ५ लाख रुपयांचा विमा मिळतो. त्यामुळे ग्राहकांना सुरक्षितता आणि संपूर्ण मानसिक शांती मिळते.

टाटा डिजिटलचे वित्तीय सेवा विभागाचे मुख्य व्यवसाय अधिकारी गौरव हजरती म्हणाले, मुदत ठेव हा सुरक्षित आणि स्थिर गुंतवणूक पोर्टफोलिओ तयार करण्यासाठीचा एक विश्वासार्ह पर्याय आहे. आमच्या फिक्स्ड डिपॉझिट मार्केटप्लेसमध्ये आम्ही ग्राहकांना निश्चित परतावा व उच्च व्याजदर देणाऱ्या विश्वसनीय वित्तसंस्थांच्या सेवा पुरविण्याचे उद्दिष्ट बाळगले आहे. बाजारातील स्पर्धात्मक व्याजदर मिळवून देण्यासाठी हा साधा, सुरक्षित प्लॅटफॉर्म आम्ही तयार केलेला आहे. त्याचा लाभ नवोदित आणि अनुभवी अशा दोन्ही गुंतवणूकदारांना होईल आणि त्यांना आपली संपत्ती सहजतेने वाढविण्याचा आत्मविश्वासही यातून मिळेल.

सूर्योदय स्मॉल फायनान्स बँकेचे डिजिटल बँकिंग विभागाचे प्रमुख विशाल सिंग या संदर्भात म्हणाले, सूर्योदयने नेहमीच आपल्या ग्राहकांना मुदत ठेवींसाठी स्पर्धात्मक व्याजदर दिलेले आहेत. आमच्याकडे मुदत ठेवींची योजना डिजिटल स्वरुपात आहे. ग्राहकांना ही योजना पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने सुरू करता येते, तिचे व्यवस्थापन करता येते आणि ती ऑनलाईन पद्धतीनेच बंद करता येते.

श्रीराम फायनान्सचे सीएफओ आणि व्यवस्थापकीय संचालक पराग शर्मा म्हणाले, टाटा न्यू प्लॅटफॉर्मवर आमच्या मुदत ठेवी सादर करण्याकरीता आम्ही टाटा डिजिटलसोबत भागीदारी केली आहे. आम्ही महिला ग्राहकांना आणि ज्येष्ठ नागरिकांना अतिरिक्त लाभ व चांगला परतावा देत असतो. आमच्या या भागीदारीमुळे ग्राहकांना मुदत ठेवी ठेवण्याचा अखंडीत व सुरळीत अनुभव मिळेल.

टाटा न्यूच्या फिक्स्ड डिपॉझिट मार्केटप्लेसमध्ये आणखी अधिक बँका सहभागी होणार असल्याने ग्राहकांना त्याचा निश्चितच फायदा होईल. त्यांना नियमित व पद्धतशीर गुंतवणूक करता यावी, यासाठी टाटा न्यू आवर्ती ठेवी (रिकरिंग डिपॉझिट) योजनादेखील सुरू करणार आहे.

## छोटी सुरूवात, मोठी प्रगती तुमच्या उद्दिष्टांसाठी उत्पन्न निर्मिती करण्यासाठी गुंतवणूक ऑटोमेट करा!

**नागपूर, ७ जानेवारी :** प्रत्येक मोठी कामगिरी एका लहान पावलापासून सुरू होते. आपण चालायला शिकण्यापूर्वी उभे राहायला शिकतो आणि मग पहिले पाऊल टाकतो. त्याचप्रमाणे संपत्ती निर्माण करण्यासाठी लहान सुरूवात करणे, सातत्यपूर्ण गुंतवणूक आणि शिस्तबद्ध राहण्याची गरज असते. पारंपरिक गुंतवणुकीचे पर्याय एकेकाळी मान्यताप्राप्त होते. परंतु आजच्या आर्थिक वातावरणात अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यांच्यापैकी एक म्हणजे प्रामुख्याने सिस्टेमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन्स (एसआयपी)च्या माध्यमातून म्युच्युअल फंड होय, जे संपत्ती निर्मितीचे शक्तिशाली आणि सहजसाध्य माध्यम आहे.

छोटी सुरूवात करण्याची ताकद

आर्थिक स्थैर्य आणि संपत्ती निर्मिती या गोष्टींना सर्वाधिक महत्त्व असलेल्या या जगात दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टे आव्हानात्मक असू शकतात. विशेषतः मर्यादित स्त्रोत असतील तेव्हा. परंतु एसआयपीचा साधेपणा आणि प्रभाव यांच्यामुळे ते आदर्श पर्याय ठरतात.

उदाहरणार्थ, १२.६२ टक्के वार्षिक परतावा दर असलेल्या समभाग म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक केल्यामुळे १२ वर्षांत १५.८८ लाख रूपये आणि ३० वर्षांत तब्बल १.७३ कोटी रूपये उभे होऊ शकतात.

एसआयपी रिकरिंग डिपॉझिटसारखे काम करते परंतु त्याचे परतावे बाजाराशी जोडलेले असतात. दर महिन्याला तुम्ही निवडलेली रक्कम तुमच्या आवडीच्या म्युच्युअल फंडमध्ये गुंतवली जाते आणि फंडाच्या विद्यमान निव्वळ मालमत्ता मूल्यावर (एनएव्ही) युनिट्स खरेदी केले जातात. पुढील कालावधीत बाजारात चढउतार होतात आणि युनिट्सचे मूल्य वाढते. त्यामुळे तुमच्या आर्थिक ध्येयांच्या पूर्ततेसाठी मोठी रक्कम उभी करणे शक्य होते.

एसआयपीची खरी जादू चक्रवाढ पद्धतीने वाढत आहे. तुमची गुंतवणूक तुम्हाला परतावा मिळवून देते आणि हे परतावे आणखी परतावे उभे करतात. तुम्ही जितक्या लवकर सुरूवात कराल आणि जेवढ्या दीर्घकाळ गुंतवणूक कराल तेवढा चक्रवाढ पद्धतीचा प्रभाव जास्त असतो.

समजाः तुम्ही वयाच्या २५ व्या वर्षी मासिक ५००० रूपये बचत केल्यास वयाच्या ५५ व्या वर्षापर्यंत तुम्ही खूप मोठी रक्कम जमा करू शकता जी वयाच्या ३५ वर्षी बचत सुरू केल्यानंतर जास्त रक्कम गुंतवली तरी आलेल्या रकमेपेक्षा खूप जास्त असेल. लवकर सुरूवात केल्यामुळे तुमच्या गुंतवणुकीला वाढण्यासाठी खूप मदत मिळते कारण संपत्ती निर्मितीच्या प्रवासात कालावधी हा तुमचा सर्वांत मोठा मित्र असतो.

## श्रीमद् रामायण मालिकेत सीता मातेला सन्मान मिळवून देण्यासाठी लव आणि कुशचे अयोध्येकडे प्रस्थान

**मुंबई, ७ जानेवारी :** सोनी सबवरील श्रीमद् रामायण मालिकेत श्रीराम (सुजय रेऊ) आणि सीता (प्राची बंसल) यांची दिव्य कथा विशद केली आहे. अलीकडेच प्रेक्षकांनी एक भावुक करणारा क्षण अनुभवला, जेव्हा श्रीराम नकळत लव-कुश (शौर्य मंडोरिया आणि अथर्व शर्मा) या आपल्या दोन जुळ्या मुलांच्या विरोधात युद्ध करण्यास सज्ज झाले. हे युद्ध संपल्यानंतर लव-कुशने ज्या राजाशी युद्ध केले तो राजा म्हणजे श्रीराम आहे असे जेव्हा सीतेला समजते तेव्हा तिला धक्काच बसतो.

सीता लव कुशला आजवर तिने मनाशी जपलेले गुपित सांगते की, त्या दोघांनी ज्याच्याशी युद्ध केले, तो राजा दुसरा तिसरा कोणी नसून त्यांचा जन्मदाता आहे आणि ते दोघे जिचा शोध घेत आहेत, ती सीता त्यांची माता आहे. वाल्मिकी ऋषी लव आणि कुशला समजावतात की श्रीराम आणि सीतेला पुन्हा एकत्र आणण्यासाठी युद्ध हा उपाय नाही. ते या दोन कुमारांना सांगतात की, त्यांनी अयोध्येस जाऊन तेथील लोकांच्या मनातील सीतेविषयीचा गैरसमज दूर करावा आणि तिला सन्मानाने परत राज्यात आणावे. त्यामुळे राम आणि सीता यांचे पुनर्मीलन करण्याच्या ध्येयाने लव आणि कुश अयोध्येकडे प्रस्थान करतात. पण, सहस्रमुख रावण (प्रणीत भट्ट) हे घडू देईल का?



सगळ्या संकटांवर मात करून लव आणि कुश राम आणि सीतेचे पुनर्मीलन घडवून आणणार का?

श्रीमद् रामायण मालिकेत सीतेची भूमिका करणारी प्राची बंसल म्हणते, लव आणि कुशच्या प्रवासातून श्रीराम आणि सीता यांचे पुनर्मीलन घडवून आणण्याबाबतची आणि सीतेला आदर आणि सन्मान मिळवून देण्याची तसेच स्त्रीचा सन्मान करणारा समाज घडवण्याची त्यांची वचनबद्धता स्पष्ट दिसून येते. रामायणातील हा महत्त्वाचा अध्याय पडद्यावर जिवंत करताना धन्यता वाटत आहे. मला आशा आहे, हा प्रवास प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेईल.

## आज का अंदाज

बुधवार ८ जानेवारी २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ९ | २ | ५ | ६ | ७ |
| ३९० | १६६ | २५९ | ४५० | १३८ | १४० | १७८ | १२४ |
| ४८० | ५९९ | ४५७ | ५७७ | ३४५ | २३० | ३४९ | २७८ |
| ५७० | २२९ | १२३ | ३८८ | २५५ | ३५७ | २६८ | ३४० |
| २४ | ३४ | ६७ | ९१ | २० | ५० | ६८ | ७८ |
| २७ | ३७ | ६८ | ९८ | २१ | ५१ | ६४ | ७४ |
| २० | ३० | ६३ | ९५ | २९ | ५९ | ६३ | ७३ |

८ जानेवारी: सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| १० | ४० | ७३ | ८३ |
| १९ | ४९ | ७५ | ८५ |
| १२ | ४२ | ७६ | ८६ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी ६० पानांचा चार्ट मिळेल, १०० टक्के खात्रीशीर. फक्त सोमवारी मिळेल.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत बापोद्रावर कुरघोडी करण्यासाठी पुष्पा आणि दिलीप एकत्र झाले

**मुंबई, ७ जानेवारी :** पुष्पा (करुणा पांडे) या एका करारी आणि निडर स्त्रीची प्रेरणादायक गोष्ट सांगून सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेने प्रेक्षकांचे मन जिंकले आहे. आजवर आयुष्यातील सर्व आव्हानांना तिने हिंमतीने आणि दृढतेने तोंड दिले आहे. अलीकडच्या भागांमध्ये नववर्षाच्या कौटुंबिक सेलिब्रेशनमध्ये नाट्य तीव्र झाले, जेव्हा अचानक तिकडे बापोद्रा चाळीचा मालक, बापोद्रा (जयेश भारभाया) तेथे येऊन धडकला आणि त्याने पुष्पाचा पूर्वीचा पती दिलीप (जयेश मोरे) याला घर खाली करण्याची नोटिस दिली. ह्यामुळे समस्त कुटुंबाला धक्काच बसला.

आगामी भागांमध्ये, तणाव आणखीन वाढत जाणार आहे, कारण चाळीतून निघून जाण्यासाठी बापोद्रा दिलीपकडे तगादा लावणार आहे. असे झाल्यास कुटुंबाची पंचाईत होईल. दिलीपने आपल्याला कितीही त्रास दिला असला तरी तो आपल्या मुलांचा पिता आहे, हे पुष्पा जाणते, त्यामुळे या अडचणीत ती त्याच्या पाठीशी उभी राहते. चाळीत राहण्याचा दिलीपचा हक्क सिद्ध करण्यासाठी ते दोघे मिळून एक शक्कल लढवतात. पुष्पा दिलीपला आपल्या घरातच जागा देते आणि बापोद्राला असे सांगून जोरदार आव्हान देते की, दिलीप ४८ तासांमध्ये पुन्हा आपल्या घरी असेल. दिलीप आणि पुष्पा यांनी हातमिळवणी केल्यामुळे बापोद्रा आणखीनच वैतागतो. त्या वैतागलेल्या अवस्थेत तो घर विकण्याचा निर्णय घेतो, ज्यामुळे नाट्यमय परिस्थिती उभी होते.

## राशीभविष्य

**मेष :** काम वेळेत पूर्ण करा. घाईघाईने प्रतिसाद देऊ नका. दिखाऊपणापासून दूर राहा. व्यावसायिकता राखाल. आज तुम्ही लोकांशी प्रभावी चर्चा आणि संवाद राखण्यात यशस्वी व्हाल.

**वृषभ :** तुम्हाला नको असलेल्या प्रवासाला जावे लागेल. राजकारणात जनतेचा पाठिंबा मिळेल. तुमचे धोरण विचारपूर्वक ठरवा. अन्यथा तुमचे शब्द खराब होऊ शकतात. चोरीची भीती राहील.

**मिथुन :** व्यवसायात सावध राहा. कोणत्याही प्रकारचा धोका पत्करू नका. व्यवसायात नवा करार लाभदायक ठरेल. व्यवहारात अधिक सावध राहाल. जास्त पैसे खर्च होऊ शकतात.

**कर्क :** महत्त्वाच्या विषयांच्या केंद्रस्थानी राहू शकाल. आर्थिक आघाडीवर अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी कराल. करिअर आणि व्यवसायात वाढ होईल. इच्छित परिणाम साध्य होतील.

**सिंह :** व्यवसायात उत्पन्न चांगले राहील. एखाद्या राजकीय व्यक्तीकडून तुम्हाला मदत मिळेल. कुटुंबातील सदस्यांच्या इच्छा पूर्ण होतील. घरात आनंदाचे वातावरण राहील. घरातील सदस्याचे यश आणि आनंद वाढेल.

**कन्या :** सामाजिक कार्यात तुमचा सक्रिय सहभाग असेल. महत्त्वाच्या संवादात उपस्थिती नोंदवाल. व्यावसायिक कामात आणि स्पर्धेत यश मिळेल. कर्ज घेण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.

**तुळ :** कामाच्या तपशीलाकडे लक्ष द्याल. कामाच्या ठिकाणी अनावश्यक वादविवाद आणि वाद टाळा. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य न मिळाल्याने व्यवसायात अडचणींना सामोरे जावे लागेल.

**वृश्चिक :** पैसा आणि मालमत्तेवरून वाद होऊ शकतात. कोर्टात जाण्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते. महत्त्वाच्या कामाची जबाबदारी इतरांवर देऊ नका. नाती गोड राहतील. कर्ज घेणे टाळा.


**धनु :** प्रेमसंबंधांमध्ये अपेक्षेपेक्षा जास्त प्रेम मिळेल. महत्त्वाची कामे पूर्ण झाल्याने मनोबल वाढेल. तुम्हाला चांगली बातमी मिळेल. राजकारणात तुमचे वर्चस्व वाढेल. नोकरीचा शोध पूर्ण होईल.

**मकर :** व्यवसायात वाढ होण्याची शक्यता आहे. सहकार्यांशी सामंजस्याने वागा. घरगुती समस्या सुटतील. प्रेमसंबंधांमध्ये आनंद राहील. लग्नाची चर्चा पुढे सरकेल. पती-पत्नीमधील गैरसमज कमी होतील.

**कुंभ :** तुम्हाला काही सामाजिक कार्याची जबाबदारी मिळू शकते. व्यवसायात खूप मेहनत करावी लागेल. नोकरीत अधीनस्थांशी विनाकारण मतभेद होऊ शकतात.

**मीन :** कुटुंबातील सदस्यांच्या मदतीने कौटुंबिक प्रश्न सोडवले जातील. प्रेमसंबंधांमध्ये कमी अनुकूल परिस्थिती असेल. कामात यश मिळेल. व्यवसायात नवीन करार होतील.

## शब्दकोडे क्रमांक २०१०



**आडवे शब्द :-**

१) बातमी
४) बगल
६) जाणून-बुजून, हटकून
८) अधिक महिना
१०) लिंबू, साखर पाण्याचे पेय
१२) तुकडा, चावा
१३) पिता
१४) वेदना
१५) पत्र
१७) पृथ्वी
१९) एक आदिवासी जमात
२१) कुबेराचा सेवक
२२) एकाद्याच्या वतीने घातलेली भीड
२५) हाण! मार!
२७) धपाटा
२८) ओलसर हवा
३०) मर्यादा हद्द
३२) कोलकाताचे विमानतळ
३४) बारीक -सारीक
३६) आपले राष्ट्रगीत
३९) मान्यतेचा शब्द
४०) टिंगल
४१) **** कमीज एक पोषाख
४२) सत्ता
४४) दोरा
४६) प्रामाणिक
४७) रत्न
४९) फांदी तुटतानाचा आवाज
५१) धोका
५३) साल
५६) अवघड, कडक (इं.)
५७) कमीतकमी
६०) माफ
६१) संगीतातील एक राग
६२) जोखड
६३) चामखीळ
६४) त्वरा
६५) बशीचा जोडीदार
६७) चाबूक
६९) थोडक्यात सप्रेम नमस्कार विनंती विशेष
७२) पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
७३) दुर्गंधी येऊ लागलेला
७५) बारीक खांब
७६) युद्ध
७७) गीत
७८) दही घुसळण्याचे साधन
७९) पोलीस

**उभे शब्द :-**

१) वाळा
२) भरभराट
३) घासणे (इं)
५) दुष्ट माणूस
६) गुमान, मुकाट्याने
७) टप्प्याटप्पा घेत घेत
८) मध
९) गुरूजी
११) सिद्धता
१६) झाडाभोवतीचा कट्टा
१८) चीर, भेग, फट
१९) मंगळवेढ्यात जन्मलेली एक स्त्री संत
२०) तलवार
२३) कलंक
२४) घोडा, गाढवाची विष्ठा
२६) फूल, पुष्प
२९) अतिशय मऊ, मुलायम कापड प्रकार
३१) विहिरीतून पाणी काढण्याचे जोडसाधन
३२) पानासकट कोवळी फांदी
३३) समुद्रकिनारा
३५) पुरुष
३७) बाज विणण्याची कापडी पट्टी
३८) नूतन
४१) नवऱ्याची दुसरी पत्नी
४३) सरसकट
४४) भीती, वचक, दरारा
४५) गवंड्याकडील दोरीचे एक साधन
४६) शर्करा
४८) मवाळ धोरण
५०) शाहीराजवळचे चर्मवाद्य
५२) जबरदस्तीने लावलेला विवाह
५४) लोकर (इं.)
५५) मध्यस्थ
५८) लज्जास्पद
५९) स्थान, जागृत
६३) अंत:करण
६६) वारा
६८) मच्छर
६९) सटवाई, दुष्ट स्त्री
७०) छोटी विश्रांती
७१) मृत्यु नसलेला
७४) हात
७६) सदोदित, नेहमी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## नांदा फाटा येथील आरोग्यवर्धिनी केंद्राला भेट

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**कोरपना, दि. ७ जानेवारी :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या दिनी ३ जानेवारी २०२५ ला कोरपणा तालुक्यातील प्राथमिक आरोग्यवर्धिनी केंद्र नांदाफाटा येथे राज्यस्तरीय NQAS समितीने मूल्यमापन करण्याकरिती भेट दिली. त्यावेळी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत पारंपारिक आदिवासी नृत्याने स्वागत करण्यात आले. यानंतर शिवाजी कॉन्व्हेंट नांदा येथील मुलींनी स्वागत नृत्य सादर केले. प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.संकेत शेंडे यांनी पावर पॉइंट च्या माध्यमातून प्राथमिक आरोग्य केंद्राची माहिती दिली. राज्यस्तरीय समितीने ओपनिंग मीटिंग घेत मूल्यमापनाला सुरुवात करण्यात आली.त्यामध्ये संपूर्ण इमारतीची तथा रुग्णांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांची आतून व बाहेरून पाहणी करण्यात आली.

## प्रशिक्षण केंद्र व अभ्यासिका बांधकाम

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ७ जानेवारी :** आमदार बंटी भांगडिया यांनी तळोधी (नाईक ) येथे निवडणूक काळात प्रचार दरम्यान सामाजिक सभागृह बांधकाम करण्याचा दिलेला शब्द पूर्ण केला आणि खनीज विकास निधीतुन ४० लक्ष रू. निधी मिळवून देण्यात यश आले.तळोधी (नाईक ) येथे खनीज विकास निधी अंतर्गत ४० लक्ष रू. चे प्रशिक्षण केंद्र व अभ्यासिका बांधकाम करणे सभागृहाचे भूमिपूजन प्रसंगी माजी सभापती प्रकाश वाकडे, चिमूर सहकारी तांदूळ गिरणी संचालक ओमप्रकाश गनोरकर, माधवराव वाकडे, माजी सरपंच कलीम शेख,उपसरपंच प्रकाश धानोरकर, ग्रामसेवक चौधरी,किशोर येसाबरे उपस्थित होते.

# कोरपना तहसिल कार्यालयात रिक्त जागेचा भर

### नागरिकांच्या कामाचा खोळंबा

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**कोरपना, दि. ७ जानेवारी :** चंद्रपूर जिल्ह्यातील तेलंगना राज्य सीमेवर दुर्गम आदिवासी बहुल क्षेत्रातील १९९२ मध्ये कोरपना तहसिल अस्तित्वात आली या भागात महसूल विभागाचे ७३ पद मंजूर असून भरलेली पद ५४ आहे मात्र तहसिल कार्यालयात तहसिलदाराची जागा २७ सप्टेंबर २०२३ पासून रिक्त असून राजुरा येथील तहसीलदार यांच्या कडे कोरपना च्या कार्यालयाचा प्रभार आहे.

या ठिकाणी उद्योग व ंण्ठ रेती घाट, मोठ्या प्रमाणात असल्याने कामाचा व्याप व अधिक महसूल देणार म्हणून या तालुक्याची ओळख आहे तहसिल कार्यालयात तहसिलदार नायब तहसिलदार ह्या दोन जागा रिक्त आहेत तर महसूल सहाय्यक ३ जागा रिक्त आहेत वर्ग ३ च्या महसूल सहाय्यकांची निवडणूक विभागात १ जागा रिक्त आहे.

रोहयो अंतर्गत वर्ग ३ ची पुरवठा निरीक्षक १ जागा गोदाम सहाय्यक १ जागा लिपिक,गोदाम लिपिक १३ जागा वर्ग ४ च्या ३ जागा रिक्त आहेत तलाठीचे २ जागा तर कोतवाल ५ जागा रिक्त असल्यामुळे एकाच विभागातील टेबलवर २ ते ३ विभागाचा काम असल्यामुळे नागरिकांचे काम वेळेवर होत नाहीत या भागात वर्ग २ च्या जमिनी वर्ग १ करण्यामध्ये नागरिकांना कार्यावरची कसरत करावी लागते तहसिलकार्यालया मध्ये तहसीलदार नसल्यामुळे अर्धे-अधिक टेबल खाली असल्याने नागरिकांना कामासाठी अनेक वेळा चकरा टाकावे लागत आहे





कोरपना येथील महसूल विभागाच्या रिक्त जागा व कायम स्वरूपी तहसीलदार तातळीने देण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सह सचिव सय्यद आबिद अली यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे ,आमदार देवरावदादा भोंगळे,जिल्हाधिकारी यांना पाठवलेल्या निवेदनातून केली आहे.

# तालुक्यातील रस्त्याची दुरावस्था, जबाबदार, कोण ? ठेकेदार की सा. बा. विभाग

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. ७ जानेवारी :** नागभीड येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्यालय असून तालुक्यातील जिल्हा परिषद व सार्वजनिक विभागातील अनेक रस्ते बांधन्यात आले मात्र अल्पाविधत रस्ते खराब झाले आहे यासाठी जबाबदार, सा बा विभाग की ठेकेदार हा विषय महत्वाचा आहे.



नागभीड येथे मुख्यालय असल्याने चिमूर, सिंदेवाही, मूल, सावली, ब्रम्हपुरी नागभीड यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाची रस्ते बांधणी आणि दुरुस्तीचे कामे केली जातात.

मात्र केलेली कामे निकृष्ट दर्जाचे होत असल्याने एक महिन्यातच रस्त्याचे तीन -तेरा वाजत, असून दुचाकी व चारचाकी वाहने चालविताना रस्ते अपघात होत असल्याचे दिसून येत आहे. नागभीड तहसील अंतर्गत येणाऱ्या भंडारा जिल्ह्यातील बाम्हणी रस्ता, घोडाझरी, रस्ता, नवेगाव पांडव, वलनी, नांदेड, कच्चेपार, चिखलगाव, गिरगाव रस्त्याची दुरावस्था झाली असून वाहने चालविताना चालकाला कसरत करावी लागते.

ठेकेदार आणि सा बा विभाग कामे सुरु असताना कामाचा दर्जा निकृष्ट असल्याने रस्त्याचे तीन -तेरा वाजत आहे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसून येत असून याला सा बा विभाग की ठेकेदार जबाबदार हा प्रश्न ऐरणीवर आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची पूर्वतयारी म्हणजेच भाजपा सदस्य नोंदणी अभियान

### माजी आमदार ब्रम्हपूरी प्रा. अतुल देशकर

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. ७ जानेवारी :** भारतीय जनता पक्षातर्फे संघटन पर्व अंतर्गत भाजपा सदस्य नोंदणी अभियान देशभरात सुरू आहे. चंद्रपूर जिल्ह्यात हरीश शर्मा भाजपा जिल्हाध्यक्ष आणि या अभियानाचे जिल्हा प्रभारी संजय गजपुरे यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यामध्ये सदस्यता नोंदणीचे उल्लेखनीय कार्य सुरू आहे. ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्रात देखील या क्षेत्राचे अतिशय कर्तव्य तत्पर लोकप्रिय माजी आमदार प्रा.अतुल देशकर यांनी या अभियानाची सर्वस्वी जबाबदारी आपल्या खांद्यावर घेऊन पक्षाने दिलेल्या उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कार्यकर्त्यांना प्रोत्साहित करीत आहेत.

ग्रामीण भागातील मौजा आवळगांव येथे गुरुबाबा देवस्थान त्रिवेणी संगमावर ब्रम्हपुरी तालुका सदस्यता कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत संबोधित करताना प्रा. अतुल देशकर यांनी प्रत्येक बुथवर किमान २०० सदस्य नोंदणीचे लक्ष्य अपेक्षित असुन भविष्यात कोणाला भाजपाच्या कोणत्याही कार्यकारिणीत स्थान मिळण्याकरिता,आपण केलेल्या सदस्य नोंदणी वर अवलंबून असणार असल्याचे पक्षाचे धोरण स्पष्ट केले. तसेच पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणूक उमेदवारांनी किमान २५० सदस्य नोंदणी अपेक्षित आहे. तरी हे उद्दिष्ट ठेऊन पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी सदस्यता अभियान तालुक्यात राबविण्याचे आवाहन भाजपा ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार प्रा अतुलभाऊ देशकर यांनी केले आहे.



या बैठकीला विधानसभा प्रमुख प्रा.कादर शेख सर, तालुका अध्यक्ष प्राचार्य अरुण शेंडे ,भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष वंदनाताई शेंडे ,माजी जिल्हा परिषद सदस्य शंकर दादा सातपुते, सौ.कल्पनाताई नखाते माजी पंचायत समिती सदस्या,माजी पंचायत समिती सदस्य नीलकंठ मानापुरे, भाजयुमो जिल्हा महामंत्री तनय देशकर, भाजयुमो तालुकाध्यक्ष अविनाश मस्के, सोशल मीडिया तालुका प्रमुख धीरज पाल, आदिवासी आघाडी तालुकाध्यक्ष राजेश्वर मगरे, जिल्हा सचिव माणिक पाटील थेरकर , सरपंच अनिल तिजारे,माजी सरपंच अभय कुथे, माजी सरपंच सुजित बालपांडे, संजय गांधी निराधार समितीचे सदस्य विलास वाकुडकर ,विनोद नखाते, विलास डोंबळे, राजेंद्र राऊत, पुंडलिक पा. झोडे,कुमदेव लेनगुरे ग्रा .पं.सदस्य,सौ.ललिता ठाकरे चुमदेव जांभुळकर माजी उपसरपंच,इ.मान्यवर उपस्थित होते.

# सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थिनींची मेजवानी



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. ७ जानेवारी :** शनिवार रोजी श्री.साईबाबा ग्रामीण विकास संस्था, गडचिरोली द्वारा संचालित प्रियदर्शिनी कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,घुग्गुस त.जि.चंद्रपूर येथे दोन दिवसीय सांस्कृतिक महोत्सव अति उत्साहात पार पडला.

सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन प्राचार्य अनु खानझोडे यांच्या अध्यक्षतेखाली ए.सी.सी. (अदानी फाउंडेशन) चे सी.एस.आर व्यवस्थापकअक्षय पतंगे,लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे सी.एस.आर व्यवस्थापक दीपक साळवे, परिसरातील लोकप्रिय समाजसेवक राजूभाऊ रेड्डी, ब्रिजभूषण पाझारे, सय्यद अन्वर , दिलीप पिटलवार,अलीम शेख, फाल्गुन खमनकर मुकेश भोयर यांचे प्रमुख उपस्थितीत पार पडला .

दोन दिवसीय सांस्कृतिक महोत्सवात विद्यार्थिनींनी नृत्यनाट्य,एकांकिका , कविता वाचन,कथाकथन व विविध कृतीतून विद्यार्थिनींनी व प्रेक्षकांचे मनोरंजन केले.

समारोपीय कार्यक्रमात नम्रपाली गोंडाने सी.एस.आर.विभाग,प्राचार्य अनू खानझोडे यांचे अध्यक्षतेखाली विद्यार्थिनींना पारितोषिकाचे वितरण करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे संचालन प्रकाश सातार्डे यांनी तर आभार सुधीर डांगे यांनी मानले

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.वैशाली जोशी , उमादेवी लाटकरी प्रा.माधव वनकर, गणेश मत्ते,बालाजी लेडांगे, विद्यार्थिनींनी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# अज्ञानाच्या अंधारात खितपत पडलेल्या स्त्रियांना ज्ञानाचा प्रकाश देणारी सावित्री : श्वेता खर्चे

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**सावली, दि. ७ जानेवारी :** अज्ञानाच्या अंधारात खितपत पडलेल्या स्त्रियांना ज्ञानाचा प्रकाश सावित्रीबाईंनी दाखवला.त्यांनी लावलेल्या ज्ञानज्योतीच्या प्रकाशामुळेच आज भारतीय स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहेत.डॉक्टर,इंजिनियर,वकील, शिक्षक या सर्व क्षेत्रात स्त्रिया दिसतात,रेल्वे,विमान सुद्धा चालवितात,इतकेच काय तर देशाच्या राष्ट्रपती,पंतप्रधान होतात,सावित्रीबाईंनी आयुष्यभर स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न केले, असे प्रमुख मार्गदर्शनात विद्यालयाच्या सहाय्यक शिक्षिका श्वेता देतो खर्चे बोलत होत्या.



भारत शिक्षण प्रसारक मंडळ सावली द्वारा संचालित विश्वशांती विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालय सावली येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १९४वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.सर्वप्रथम सावली नगरीतून शालेय विद्यार्थ्यांची शोभायात्रा काढण्यात आली. कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयाचे पर्यवेक्षक मधुकर जाधव यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक जडण घडणीमध्ये अनेक समाजसुधारकांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले त्यातील एक महत्त्वपूर्ण स्त्री म्हणजे सावित्रीबाई फुले होय,जिने स्त्री शिक्षणास प्रारंभ केला आणि शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणली असे अध्यक्ष स्थानावरून मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक रवींद्र मुप्पावार डॉ.राजश्री बिडवई,सहाय्यक शिक्षिका वनिता गेडाम,रिंकी कोतपल्लीवार,प्रसन्ना अल्लुरवार,उर्मिला बारेकर,मेघा संगिडवार उपस्थित होते.याप्रसंगी शालेय विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या जीवनावर गीत आणि भाषणे सादर करीत प्रकाश टाकला.

# भविष्यात प्रशासकीय सेवेला समाजसेवेची जोड द्या



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ७ जानेवारी :** विद्यार्थ्यांनी भविष्यात प्रशासकीय अधिकारी नक्की व्हावे परंतु त्यासोबतच समाजसेवेला देखील आपला हातभार लागेल यासाठी देखील प्रयत्न करावे असे मत खासदार प्रतिभा धानोरकर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

छात्रवीर राजे संभाजी प्रशासकीय सेवा महाविद्यालय तर्फे जिल्हा परिषद शाळा घोनाड येथे विशेष वार्षिक शिबिराचे आयोजन दि. ०५ जानेवारी ते ११ जानेवारी २०२५ दरम्यान करण्यात आले आहे. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना खासदार प्रतिभा धानोरकर म्हणाल्या की, प्रशासकीय महाविद्यालयातील विद्यार्थी हे भविष्यात चांगले अधिकारी घडतीलच परंतु या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातून सामाजिक सेवेचे मूल्य अंगीकारून भविष्यातील प्रशासकीय सेवेसोबत सामाजिक सेवांचे मूल्य अंगीकारतील. या सात दिवसीय शिबिरातून आपल्या सुप्तगुणांना वाव देऊन आपल्या अंगी असणारे कला कौशल्य दाखवण्याची संधी हे शिबिर विद्यार्थ्यांना देणार आहे. त्यामुळे या शिबिरातील प्रत्येक कार्यक्रमात आपण सहभाग नोंदवावा असे आवाहन देखील विद्यार्थ्यांना केले आहे. या सात दिवसात गावकऱ्यांनी देखील विद्यार्थ्यांशी स्नेह जोपासावा असे मत देखील खासदार धानोरकर यांनी व्यक्त केले.

यावेळी मंचावर दिलीप चौधरी, घोनाड चे उपसंरपंच प्रशांत बोंडे, बबनराव खरोडे, ग्रामपंचायत सदस्य ज्योती उरकुंडे, आशा उरकुंडे, शाळा सुधार समितीचे अध्यक्ष प्रवीण आवारी, मनोहर पावडे, पांडुरंग मत्ते, पंढरीनाथ बोंडे, स्नेहल राऊत यांसह सर्व प्राध्यापक, प्रतिष्ठीत नागरीकांची व विद्यार्थ्यांची प्रामुख्याने उपस्थित होते.

# पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांच्या हस्ते राजुरा येथे भाजपा सदस्यता अभियानाचा शुभारंभ

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ७ जानेवारी :** संगठन पर्व मोहिमेच्या अनुषंगाने भारतीय जनता पार्टी राष्ट्रीय सदस्यता अभियान २०२५ चा शुभारंभ राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांचे शुभहस्ते राजुरा येथील ॲड. यादवराव धोटे महाविद्यालयाच्या प्रागणांत पार पडला. दि. ०६ जानेवारी २०२५ रोजी हंसराज अहीर यांच्या विशेष उपस्थितीमध्ये पार पडलेल्या या सदस्यता अभियानास माजी आमदार सदर्शन निमकर, भाजपा जिल्हा उपाध्यक्षद्वय अरूण मस्की, सतिश धोटे, भाजयुमो जिल्हा महामंत्री राहुल सुर्यवंशी, कामगार आघाडी उपाध्यक्ष महादेव तपासे, भाजयुमोचे माजी तालुकाध्यक्ष सचिन शेंडे, भाजयुमो सास्ती अध्यक्ष अरूण लोहबळे, भाजयुमो तालुका उपाध्यक्ष भुषण जुनघरी यांचेसह अनेक प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



या सदस्यता अभियान प्रसंगी हंसराज अहीर यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तालुक्याला दिलेले सदस्य नोंदणी अभियानाचे उद्दिष्ट साध्य करून पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी सर्वांनी सामुहिक प्रयत्नातून या अभियानाला यशस्वी करण्याचे आवाहन केले. आगामी जि.प., पं.स. व नगरपालिका व अन्य निवडणूका दृष्टीपथात ठेवून पक्षाचे संघटन मजबुतीने उभे करावे असेही त्यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आवाहन केले. या अभियानामध्ये शेकडो नागरिकांनी स्वयंस्फुर्तनि सहभागी होवून भाजपाचे सदस्यत्व स्विकारले. या कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.

# गिरीश चांडक यांच्या वाढदिवसानिमित्त स्वीकार दुर्बल मनस्क (मतिमंद) मुला-मुलींची निवासी शाला, ताड़ाली येथे आवश्यक वस्तूंचे वितरण

### चिमुरात व्हाईस ऑफ मिडीयाने साजरा केला मराठी पत्रकार दिन



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ७ जानेवारी :** शहरातील सुप्रसिद्ध समाधान पूर्ती सुपर बझार चे संचालक, विदर्भ इंग्लिश मिडीयम ट्रस्टी असोसिएशन चंद्रपूर चे अध्यक्ष, चंद्रपूर डिस्ट्रिक्ट बॅडमिंटन डेव्हलोपमेंट असोसिएशन चंद्रपूर चे अध्यक्ष, गुरुकुल शिक्षा संस्थेचे (श्री महर्षी विद्या मंदिर ) अध्यक्ष आणि चंद्रपूर चे सामाजिक कार्यकर्ते गिरीश चांडक यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त चंद्रपूर येथील श्री साई मतिमंद शिक्षण संस्था , चंद्रपूर द्वारा संचालित स्वीकार दुर्बल मनस्क (मतिमंद) मुला-मुलींची निवासी शाला, ताड़ाली येथे भेट देऊन तेथील संचालकांना १० खुर्च्या तसेच १ ऑफिस टेबल दिले.

आपण समाजाचे देणे लागतो. त्यामुळे आपल्या मिळकतीचा काही भाग समाजासाठी खर्च करावा. आपल्या वाढदिवसानिमित्त तेथील विद्यार्थ्यांसोबत हितगुज करण्याची संधी मिळाली आणि भेटवस्तू तसेच खाऊ दिल्यावर त्यांच्या चेहऱ्यावरील प्रसन्नता पाहून मनाला आनंद झाला, अशी भावना चांडक जी यांनी व्यक्त केली.

शाळेच्या संचालकांनी तसेच तेथील शिक्षकांनी श्री. गिरीशजी चांडक यांना अक्षवंत केले. तसेच त्यांनी दिलेल्या भेटीबद्दल आभार व्यक्त केले.

याप्रसंगी गुरुकुल शिक्षा संस्थेचे सचिव श्री. दत्तात्रय कंचर्लावार , कोषाध्यक्ष श्री. अनुपम चिलके सदस्य श्री. वीरेंद्र जयस्वाल आणि श्रीमती. अलका चांडक, श्रेयश चांडक तसेच श्री महर्षी विद्या मंदिर च्या मुख्याध्यापिका श्रीमती. श्रीलक्ष्मी मूर्ती आणि उपमुख्याध्यापिका श्रीमती. निशा मेहता उपस्थित होते.

# नेरी म्हसली व नेरी ऊसेगाव रस्त्याची दैन्यावस्था, लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष



**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. ७ जानेवारी :** चिमुर तालुक्यातील नेरी ते म्हसली आणि नेरी ते उसेगाव या रस्त्याची फार मोठी दुर्दशा झाली आहे तरीही याकडे मात्र लोकप्रतिनिधींचे साफ दुर्लक्ष झाले असल्याचे निदर्शनास येत आहे.

नेरी म्हसली या रस्त्याचे डांबरीकरण दोन वर्षापूर्वी झाले होते अल्पावधीतच हा रस्ता फुटायला सुरुवात झाली आहे. डांबरीकरण गीट्टी उखडुन रस्त्यावर अस्ताव्यस्त पसरत असल्याने वाहन धारकांना वाहने चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

चारचाकी वाहनांची तसेच बाईक स्वार या रस्त्याने मोठ्या प्रमाणात धावत असतात शालेय विद्यार्थी शेतकरी यांची या नेरी म्हसली व नेरी उसेगाव रस्त्यांनी मोठ्या प्रमाणात आवक जावक वाहतूक सुरू असते रात्रंदिवस या रस्त्यावर वाहनांची वर्दळ सुरू असते

एखाद्या वाहनधारकांचा केव्हा अपघात होईल याची शक्यता नाकारता येत नाही तेव्हा तात्काळ नेरी म्हसली रस्त्याचे रुंदीकरण करुन तात्काळ डांबरीकरण करण्यात यावे व उसेगाव रस्त्याचे खडीकरण पिचींग होवूनही बरेच दिवस झाले तरी देखील या रस्त्याचे डांबरीकरण बांधकामांला सुरुवात करण्यात आली नाही तेव्हा संबंधित लोकप्रतिनिधींनी जनतेच्या निगडित समस्येला धरुन रस्त्याचे बांधकामाला संबंधित विभागाला निर्देशीत करून घ्यावे अशी मागणी शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी शेतकरी व असंख्य वाहनधारकांनी केली आहे.

# आ.जोरगेवार जनसंपर्क कार्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. ७ जानेवारी :** घुग्घुस शहरातील आ.किशोर जोरगेवार जनसंपर्क कार्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस माल्यार्पण अर्पण करुन मान्यवरांनी अभिवादन करण्यात आले.

माजी उपसरपंच संजय तिवारी यांनी आपले मनोगत व्यक्त करीत म्हणटले की, क्रांतीज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले यांचा भारतातील पहिल्या महिला शिक्षिका, स्त्री मुक्ती चळवळीच्या प्रणेत्या, अत्याचारितांच्या समर्थक आणि प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या म्हणून त्यांचा वारसा कमी करणे अशक्य आहे. निरक्षर स्त्री शिक्षण घेईल, शिक्षिका बनेल आणि वर्षानुवर्षे त्रस्त असलेल्या स्त्रिया आणि शूद्रांसाठी अज्ञानाचा अंधार दूर करेल ही कल्पना भारतीय इतिहासाच्या दोन सहस्त्र वर्षात अतुलनीय आहे.



शिक्षणाच्या क्षेत्रातून सामाजिक क्षेत्रात पदार्पण करावे, दुष्काळात अन्नान्न करून तडफडणाऱ्या हजारो जिवांच्या मुखांत घास भरवावा, शेतकरी सामाजिक सुधारणांसाठी वाङ्मयाचे साधन हाती घेऊन कवयित्री आणि लेखिका बनावे, सर्व गाव, सर्व समाज सुशिक्षित, सुसंस्कृत करण्याचे, जनावरांप्रमाणे जिणे जगणाऱ्या स्त्री-शूद्रांना माणसात आणण्याचे वेड घ्यावे, पतीच्या निधनानंतरही शोक करीत न बसता सत्यशोधक समाजाच्या तत्त्वप्रसाराचे कार्य करण्याचे सतीचे वाण घेऊन अविश्रांत काम करावे, दीनदलितांसाठी, दीनदलितांच्या मुलांसाठी रोगांच्या साथीत दिवसा-रात्री घराबाहेर धावावे, त्यांची सेवा करावी, प्लेगच्या साथीत दत्तकपुत्र यशवंतराव फुले यांना कडेवर घेऊन प्लेगने त्रस्त असल्यामुळे रुग्णालयात आणले. आजारपणाने स्वताला खिळले आहे याची जाणीव होऊन सुद्धा सावित्रीबाई रुग्णांना मदत करत राहिल्या, व प्रक्रियेत अनंतासाठी विलीन झाल्या. अशा व्यक्तिमत्त्वाचे वर्णन केवळ अलौकिक म्हणून केले जाऊ शकते. माजी.उपसरपंच संजय तिवारी,निरिक्षण तांड्रा,संतोष नुने,अनिल बाम,श्याम आगदारी,नविन मोरे,स्वप्निल वाढई, रवी वासेकर पृथ्वीराज आगदारी,सौ.उज्वला उईके,सोनु कमतवार,सुरेखा तोडसे, नितुताई जयस्वाल,संध्या जगताप, कामिना देशकर, सुशीला डकरे, अलका भांडारकर, माया मांडवकर,सुनंदा सौदारी आदी उपस्थित होते.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक
मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# निरामय

## प्रथिनांसह कर्बोदकंही हवी

आहारतंत्र

वजन कमी करण्यासाठी प्रथिनयुक्त पदार्थ खाण्याचा सल्ला दिला जातो. या प्रक्रियेत कर्बोदकांचं प्रमाण कमी केलं जातं. मात्र कर्बोदकांमुळे शरीराला ऊर्जा मिळत असल्याने प्रथिनं आणि कर्बोदकांचा समतोल साधला जाणं गरजेचं आहे. प्रथिनांसोबतच कर्बोदकांच्या सेवनाने वजन कमी होण्यास मदत होते. प्रथिनं आणि कर्बोदकांचा समतोल कसा साधायचा, याविषयी...

* चिकनमध्ये भरपूर प्रथिनं असतात. चिकन उकडून, भाजून किंवा ग्रील करून खाता येतं. चिकन शिजवताना लाल तिखट घातल्याने शरीराला कर्बोदकं मिळू शकतील. १०० ग्रॅम लाल तिखटात ५० ग्रॅम कर्बोदकं आणि ३५ ग्रॅम डाएटरी फायबर असतं. यामुळे प्रथिनं आणि कर्बोदकं यांचा समतोल साधता येतो.



* कर्बोदकं आणि क जीवनसत्त्वाने समृद्ध भोपळी मिरची आणि प्रथिनयुक्त अंडं यांचं एकत्रित सेवन करता येईल. अंड्यामुळे चयापचय क्रिया सुधारते तर भोपळी मिरची चरबी कमी करण्याचं काम करते. जेवणात आमटी आणि पोळी खाता येईल. ओटमील, पेरु आणि कठीण कवचाची फळं एकत्र खाता येतील.

## देशातील ५५ टक्के लोकांना प्रदूषणाचा फटका

आरोग्यवेध

देशात सध्या प्रदूषणाचा प्रकोप प्रचंड वाढला आहे. त्यामुळे नागरिकांना विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे. या भयंकर प्रदूषणामुळे देशातील अर्ध्याहून अधिक लोकांना घसा, नाक आणि कानाची समस्या उद्भवली आहे. एका अहवालात याबाबत गौप्यस्फोट करण्यात आला आहे. देशातील प्रदूषणावर एक संशोधन करण्यात आले. त्यात देशातील ५५ टक्के लोक नाक, कान आणि घशाच्या आजाराने ग्रासलेले असल्याचं आढळून आले आहे. देशातील काही महत्त्वाच्या शहरात अभ्यास करण्यात आला. त्यातून ही आकडेवारी आली आहे. 'प्रिस्टिन केअर' नावाच्या आरोग्य संस्थेने हे सर्वेक्षण केले. दिल्ली, मेरठ, फरिदाबाद, नोएडा, गाझियाबाद, रोहतक, चंदीगड, कानपूर आदी शहरात ५६ हजार६ ७६ लोकांवर आधारित हे संशोधन केले गेले. यातून प्रदूषणामुळे ४१ टक्के लोकांना नेत्रविकार असल्याचे आढळून आले आहे. डोळ्यात पाणी येणे आणि डोळ्यात जळजळ होणे या समस्या या लोकांना जाणवत आहेत.



*** मास्क घालूनच फिरा**

हवेचे वाढते प्रदूषण ही चिंतेची गोष्ट आहे. प्रदूषणामुळे सर्वाधिक फटका लहान मुलांना बसत आहे. प्रदूषित हवा नाक आणि कानाच्या संवेदनशील श्लेष्मा आवरणात त्रास निर्माण करू शकते. त्यामुळे नाक आणि कानांच्या अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. अनेक भागात प्रदूषण अजूनही अत्यंत जास्त आहे. त्यामुळे लोकांनी त्यांच्या आरोग्याची काळजी घेऊन मास्क घालणे अत्यंत आवश्यक आहे.

*** डोळे जपा**

प्रदूषणाचा परिणाम फक्त नाक आणि कानांवरच नाही, तर डोळ्यांवरदेखील झाला आहे. अनेक लोकांना डोळ्यांत जळजळ होणे, पाणी येणे, डोळे लाल होणे, चुरचुरणे अशा समस्या जाणवू लागल्या आहेत. त्यामुळे सर्वांनीच डोळ्यांच्या आरोग्यालाही विशेष महत्त्व दिले पाहिजे. प्रदूषण आणि त्याच्या परिणामांनी आरोग्यावर होणारा हानीकारक प्रभाव सहज लक्षात घेतला पाहिजे, असा सल्लाही तज्ज्ञ देत आहेत.

*** गरोदर महिलांनी काळजी घ्या**

डोळे, कान, नाक आणि घशाचा त्रास होत असेल तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या. या बाबतीत बेसावध राहणे धोक्याचे ठरू शकते. प्रदूषणामुळे लोक त्रस्त आहेत. वृद्ध व्यक्ती, मुले आणि गरोदर महिलांना यापासून संरक्षणासाठी विशेष काळजी घ्यावी लागेल. ज्यांची रोग प्रतिकारक शक्ती कमी आहे, त्यांना प्रदूषणाचा धोका अधिक आहे. म्हणूनच प्रदूषणापासून वाचण्यासाठी काळजी घ्या. बाहेर पडताना पूर्ण खबरदारी घ्या. नाक, कान, घशाचा संसर्ग असलेल्यांच्या संपर्कात येऊ नका.

## कर्करोगाच्या उपचारात नवीन शोध उपयुक्त

भारतातील प्रमुख संशोधन संस्था 'एम्स' (ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस) च्या शास्त्रज्ञांनी एक मोठा शोध लावला आहे. तो कॅन्सरच्या उपचारात आणि निदानासाठी उपयुक्त ठरू शकतो. हे संशोधन 'एम्स'च्या बायोकेमिस्ट्री विभागाचे डॉ. शुभदीप कुंडू (पीएच. डी संशोधक) यांनी डॉ. अशोक शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली केले आहे. हे संशोधन मॅमेलियन जीनोम (स्प्रिंगर नेचर पब्लिकेशन) मध्ये प्रकाशित करण्यात आले आहे.



या अभ्यासात असे आढळून आले आहे, की बी-प्रकारचे लॅमिन्स, विशेषतः लॅमिन बी१ आणि लॅमिन बी२, कर्करोगाच्या प्रगतीवर आणि रुग्णांच्या जगण्याच्या शक्यतांवर खोल परिणाम करतात. 'लॅमिन्स' हे प्रथिने आहेत, ते पेशीच्या केंद्रकांना स्थिरता प्रदान करतात. 'एम्स'च्या शास्त्रज्ञांनी, विविध प्रकारच्या कर्करोगात 'आरएनए सिक्वेन्सिंग' तंत्रज्ञानाचा वापर करून असे निरीक्षण केले, की लॅमिन बी१ आणि लॅमिन बी२ चे उच्च पातळीचे उत्पादन कर्करोगाच्या रुग्णांना धोका निर्माण करू शकते. ज्या रुग्णांमध्ये लॅमिन बी १ आणि लॅमीन बी२ दोन्हीचे प्रमाण जास्त होते, त्यांचे आयुष्य लक्षणीयरीत्या कमी असल्याचे आढळून आले. जेव्हा हे दोन लॅमिनिन मोठ्या प्रमाणात एकत्रितपणे तयार होतात, तेव्हा कर्करोग अधिक घातक होण्याची शक्यता वाढते.

संशोधनात असेही समोर आले आहे, की लॅमिन बी १ आणि लॅमीन बी २ कर्करोगाच्या ट्यूमर सूक्ष्म वातावरणाशी संबंधित आहेत. लॅमिन बी१ थेट सीडी+ टी-सेल्स आणि टाइप-२ टी-हेल्पर सेल्स (टीएच२) शी संबंधित आहे. हे सूचित करते, की ते रोगप्रतिकारक पेशींच्या सहभागावर आणि कर्करोगाच्या प्रतिसादावर परिणाम करू शकतात. लॅमिन बी २ देखील काही प्रमाणात या रोगप्रतिकारक पेशींशी संबंधित असल्याचे आढळले; परंतु त्याचा प्रभाव लॅमिन बी १ पेक्षा कमी होता.

*** नऊ प्रोटिन्सची ओळख**

संशोधकांनी कॅन्सरमध्ये लॅमिन बी २ शी संबंधित नऊ प्रोटीन्स ओळखले आहेत, जे सेल डिव्हिजन आणि साइटोकिनेसिसवर परिणाम करतात. या शोधाने हे स्पष्ट केले आहे, की बी-टाइप लॅमिन्स केवळ कर्करोगाच्या वाढीसाठी जबाबदार नाहीत, तर ते बायोमार्कर म्हणूनदेखील वापरले जाऊ शकतात जे रुग्णाची स्थिती किती गंभीर आहे हे दर्शवतात.

*** बी-टाइप लॅमिन्स कॅन्सरच्या उपचारात उपयुक्त**

बी-टाइप लॅमिन्स कर्करोगाच्या उपचारात नवीन लक्ष्य म्हणून काम करू शकतात. लॅमिनिनवर आधारित औषधे आणि थेरपी विकसित करणे ही एक महत्त्वाची पायरी असू शकते. जर या प्रथिनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पद्धती विकसित केल्या गेल्या, तर ते कर्करोगाच्या रुग्णांना चांगले उपचार देऊ शकतात. हा शोध कर्करोग रुग्ण आणि वैद्यकीय समुदाय दोघांसाठी आशेचा किरण आहे. जर लॅमिनिन्सची भूमिका अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता आली, तर कर्करोगाचे निदान आणि उपचारांसाठी ते 'गेम चेंजर' ठरू शकते.

## का असतात सहा बोटं?

वेगळं काही

माणसाच्या दोन्ही हातांना मिळून दहा बोटं असतात. मात्र काहींच्या एका हाताला किंवा पायाला एखादं जास्तीचं बोट असतं. तुमच्याही संपर्कात अशी काही माणसं आली असतील. हात किंवा पायाला सहा बोटं असणं हा दैवी चमत्कार मानला जातो. पण खरंच असं असतं का? असा दैवी चमत्कार मोजक्याच लोकांच्या बाबतीत का घडतो, हा विचार कधी तुमच्या मनाला शिवला आहे का? खरं पाहता सहावं बोट हा कोणताही दैवी चमत्कार नाही तर तो एक विकार आहे. त्याला पॉलिडॅक्टिली असं म्हटलं जातं. ही व्याधी जडलेल्या माणसांना जन्मजात एक किंवा दोन अतिरिक्त बोटं असतात. हे अतिरिक्त बोट एका किंवा दोन्ही हातांना अथवा पायांना असू शकतं.

पॉलिडॅक्टिली हा अनुवंशिक विकार आहे. त्यामुळे एकाच कुटुंबातल्या अनेकांना ही समस्या असू शकते. हा विकार पुढच्या पिढ्यांमध्येही दिसून येतो. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होणाऱ्या या विकाराला फॅमिलियल पॉलिडॅक्टिली असं म्हटलं जातं. पॉलिडॅक्टिली अनुवंशिक नसेल तर आईच्या गर्भात असताना बाळाच्या जनुकांमध्ये होणारे बदल याला कारणीभूत ठरतात.

व्याधीच्या प्रकारावरून त्यावरच्या उपायांची दिशा ठरते. अनेकदा बोटांच्या जागी एखादा मांसल भाग दिसतो. या भागाला हाड नसतं. यामुळे रुग्णाला फारसा त्रास होत नाही. त्याच्या दैनंदिन आयुष्यावरही याचा परिणाम होत नाही. त्यामुळे यावर उपचार घेण्याची गरज नसते. मात्र हा भाग फार विचित्र दिसत असेल तर काही उपचार घेता येतात. हाड नसलेलं बोट पटकन काढता येतं. मात्र पूर्ण वाढ झालेलं किंवा वापरात असणारं अतिरिक्त बोट काढण्यासाठी शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेणं योग्य ठरतं. अर्थातच हे बोट काढावं की नाही याचा निर्णय सर्वस्वी तज्ज्ञांचा असतो. तपासणी अंती ते हा निर्णय घेतात.



अतिरिक्त अंगठ्यावरचे उपचार काहीसे गुंतागुंतीचे ठरू शकतात. यामुळे मूळ अंगठ्याच्या कार्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे ही शस्त्रक्रिया अत्यंत काळजीपूर्वक करावी लागते. सेंट्रल पॉलिडॅक्टिली या प्रकारात मधल्या, पहिल्या किंवा अनामिकेलाच अतिरिक्त बोट जोडलेलं असतं. अशा परिस्थितीत डॉक्टर अतिरिक्त बोट कायम ठेवतात. मात्र दुष्परिणाम टाळण्यासाठी लिगामेंट्स आणि स्नायूबंध काढून टाकले जातात. इतकंच नाही, तर शस्त्रक्रियेद्वारे दोन्ही बोटं काढून त्या जागी नवं बोटही बसवलं जातं. इतर काही जनुकीय कारणांमुळे पॉलिडिक्टिलीची समस्या उद्भवली असेल तर रुग्णाला इतर वैद्यकीय उपचारांची गरज पडू शकते. त्यामुळे हात किंवा पायाला असणाऱ्या अतिरिक्त बोटाकडे फक्त दैवी चमत्कार म्हणून पाहू नये. हा एक विकार आहे. त्यामुळे ही समस्या असणाऱ्यांनी त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणं गरजेचं आहे.

## धोका स्टॅटिन्सचा

नवसंशोधन

कोलेस्टेरॉलचं प्रमाण कमी करणारी औषधं म्हणजेच स्टॅटिन्स घेणाऱ्यांना टाईप २ मधुमेह होण्याचा धोका दुपटीने वाढतो, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. स्टॅटिन्स या औषधांच्या प्रकारामुळे रक्तातलं कोलेस्टेरॉल कमी होतं तसंच उच्च रक्तदाबावरही नियंत्रण मिळवता येतं. या औषधांमुळे हृदयविकार आणि स्ट्रोकचा धोकाही कमी होत असल्याने अनेकांची स्टॅटिन्सला पसंती असते. त्यामुळे संशोधकांनी स्टॅटिन्सच्या परिणामांचा अभ्यास केला. तेव्हा ही औषधं घेणाऱ्यांना ती न घेणाऱ्यांच्या तुलनेत मधुमेह होण्याचा धोका दुपटीने अधिक असल्याची बाब समोर आली. कोलेस्टेरॉल कमी करणारी ही औषधं दोन वर्षांपेक्षा अधिक काळ घेणाऱ्यांमध्ये मधुमेहाचा धोका तिपटीने वाढण्याची शक्यता असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.




## टूथपेस्टमुळे ऑस्टिओपोरॉसिस?

दंतारोग्य


टूथपेस्टसह साबण आणि विविध प्रकारच्या क्रीम्समध्ये वापरल्या जाणाऱ्या ट्रायक्लोसॅन नामक रसायनामुळे ऑस्टिओपोरॉसिसचा धोका वाढू शकतो, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. त्यातही महिलांना हा धोका अधिक प्रमाणात असतो, असंही हे संशोधन सांगत. टूथपेस्टमध्ये हे रसायन असू शकतं. यासोबतच शरीराच्या स्वच्छतेसाठी वापरल्या जाणाऱ्या उत्पादनांमध्येही ते असतं. ट्रायक्लोसॅन आणि हाडांचं आरोग्य यांचा संबंध तपासण्यासाठी १८४८ महिलांचा अभ्यास करण्यात आला.




## टाकून द्या या वस्तू

आपण कुठे चुकतो?

एखाद्या विकाराचा उगम आपल्या घरातूनच होऊ शकतो. वापरात असणाऱ्या असंख्य वस्तूंमधली रसायनं विविध व्याधींना आमंत्रण देतात तर काही वस्तू ताण वाढवणाऱ्या ठरू शकतात. इच्छा असूनही आपण काही वस्तू टाकून देणं टाळत रहातो. घरातल्या कोणत्या वस्तू हानिकारक ठरतात हे जाणून घेऊ या.



* प्लास्टिकच्या दुष्परिणामांबद्दल आपण बरंच काही वाचतो, ऐकतो. पण वापरायला सुलभ आणि वजनानं हलकं प्लास्टिक वापरातून लवकर बाद होत नाही. मात्र पीसी ही अक्षरं छापलेले प्लास्टिकचे डबे खूप घातक असतात हे जाणून घ्यायला हवं. पीसी म्हणजे पॉलिकार्बोनेट. यात बिस्फेनॉल नामक रसायन असू शकतं. हे रसायन शरीरात गेल्याने श्वसनविकार, हृदयविकार, उच्च रक्तदाब यासारख्या समस्या निर्माण होतात.
* एअर फ्रेशनर्समधली रसायनं आरोग्यासाठी हानिकारक ठरतात. म्हणूनच फ्रेशनर्सचा वापर टाळावा.
* जुने, खराब झालेले टूथब्रश घरात ठेऊ नका. या ब्रशवर बॅक्टेरियांचा वास असतो. यामुळे रोगांना निमंत्रण मिळतं.
* जुने, घट्ट होणारे कपडे तुमचा ताण वाढवतात. त्यामुळे असे कपडे देऊन टाका.

## तुळस आहे गुणकारी

आयुर्वेद आणि विकार

हिंदू धर्मात तुळशीचं महत्त्व आहेच शिवाय आयुर्वेदानुसारही ही अत्यंत गुणकारी अशी औषधी वनस्पती आहे. म्हणूनच विविध विकारांवर उपचार करताना तुळशीची पूड वापरली जाते. हृदयविकार, कीटकदंश, ताप, श्वसनाचे विकार, त्वचाविकार अशा असंख्य व्याधींवर तुळस गुणकारी ठरते. तुळशीच्या औषधी गुणधर्मांविषयी...




* तुळशीत जीवाणू, विषाणू तसंच रोगांना कारणीभूत ठरणाऱ्या विविध जंतूंचा नाश करणारे गुणधर्म असतात. तापाला कारणीभूत ठरणाऱ्या जंतूसंसर्गाचा प्रभाव कमी करण्याची क्षमता तुळशीत असल्याने ताप तसंच सर्दी, खोकल्यावर हा रामबाण उपाय ठरू शकतो.
* तुळशीतल्या औषधी तेलांमुळे स्वादुपिंडाचं कार्य सुरळीत सुरू राहण्यास मदत होते. यामुळे इन्शुलिनची निर्मिती योग्य प्रमाणात होऊन मधुमेहाला आळा घालता येतो. तुळशीच्या सेवनाने रक्तातली साखर नियंत्रणात ठेवता येते.
* तुळस शरीरातल्या युरिक ॲसिडची पातळी कमी करते. तुळशीतल्या औषधी घटकांमुळे मूत्रमार्गातले खडे विरघळू शकतात.
* तुळशीमुळे रोगप्रतिकारकशक्ती वाढते. सर्दी-खोकल्यासा त्रास कमी होतो. दाह कमी करण्याच्या क्षमतेमुळे श्वसनाच्या विकारांना आळा घालता येतो.

## 'मॅक्युलर डिजनरेशन'विषयी...

डोळ्यांचं आरोग्य

'मॅक्युलर डिजनरेशन' हा प्रौढांना होणारा नेत्रविकार आहे. कोरडा आणि ओला असे याचे दोन प्रकार आहेत. हा विकार पूर्णपणे बरा होऊ शकत नसला तरी भविष्यातलं डोळ्यांचं नुकसान टाळता येतं. योग्य औषधोपचारांनी रुग्ण सर्वसामान्य जीवन जगू शकतो. या विकाराला प्रतिबंध करण्यासाठी धूम्रपान सोडायला हवं. डोळ्यांची नियमित तपासणी करणंही गरजेचं आहे. डोळ्यांवर मधुमेहासारख्या विकाराचा विपरीत परिणाम होतो. त्यामुळे मधुमेह नियंत्रणाचे उपाय करणंही गरजेचं आहे. हा विकार प्रौढांना होत असला तरी तरुणांनीही योग्य ती खबरदारी घ्यायला हवी.



## ल्युकेमियाची लक्षणं

व्याधी विचार

ल्युकेमिया म्हणजे रक्तपेशी किंवा बोन मॅरोचा कर्करोग. याला रक्ताचा कर्करोग असंही म्हटलं जातं. शरीरातल्या पांढऱ्या रक्तपेशींच्या निर्मितीतले अडथळे या विकाराला कारणीभूत ठरतात. भारतात दर वर्षी जवळपास एक दशलक्ष लोकांना रक्ताच्या कर्करोगाचं निदान होतं. कॅन्सरग्रस्त रक्तपेशींवरून रक्ताच्या कर्करोगाचा प्रकार ठरतो. प्राथमिक टप्प्यात या विकाराचं निदान झालं तर रुग्ण वाचण्याची शक्यता असते. म्हणूनच या विकाराची लक्षणं जाणून घेणं गरजेचं आहे.

फारसे शारीरिक श्रम न करता थकवा येत असेल तर रक्ताची तपासणी करायला हवी. वारंवार येणारा थकवा शरीरातल्या लाल रक्तपेशींच्या कमतरतेकडे अंगुलिनिर्देश करतो. ॲनिमियामुळेही असं होऊ शकतं. मात्र लाल रक्तपेशींची कमतरता रक्ताच्या कर्करोगाला निमंत्रण देऊ शकते.

एकसारखी धाप लागणं हे ल्युकेमियाचं लक्षण असू शकतं. श्रमामुळे शरीर अशक्त होऊ शकतं. परिणामी, धाप लागू शकते. यामुळे चार जिने चढणंही कठीण होऊन बसतं. जिने चढल्यानंतर प्रचंड दमणूक होते.



कोणत्याही दुखापतीशिवाय जखम होत असेल किंवा शरीराचा एखादा भाग काळानिळा पडत असेल तर आरोग्य तपासणी करून घ्यायला हवी कारण हे ल्युकेमियाचं लक्षण असू शकतं. प्लेटलेट्स कमी होणं, रक्त साकळणं अशा कारणांमुळे ही समस्या निर्माण होते. शरीराच्या विविध भागांवर काळपट-निळसर डाग दिसतात. त्यातही पाय आणि हातांवर ते अधिक प्रमाणात दिसून येतात.

प्रत्येक वेळी तोंडाच्या अस्वच्छतेमुळेच हिरड्या सुजतात असं नाही तर हे तोंडच्या कर्करोगाचं लक्षणही असू शकतं. हिरड्यांचा आकार वाढण्याच्या त्रासाला शास्त्रीय भाषेत गिंगायव्हल हायपरप्लेसिया असं म्हणतात. ल्युकेमियामुळे ही समस्या निर्माण होते.

वरचेवर येणारा ताप हे जंतूसंसर्ग आणि रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्याचं लक्षण असतं. रक्ताच्या कर्करोगामुळे असं होऊ शकतं.

झोपेत घाम येणं ही सुद्धा सर्वसाधारण बाब नाही. वारंवार उद्भवणारी डोकेदुखी रक्ताच्या कर्करोगाचं किंवा डोक्यातल्या रक्तस्रावाचं लक्षण असू शकते.

## लाभ दुधाचे

आजीबाईचा बटवा

दूध आरोग्यासाठी लाभदायी असतं. यातले नऊ पोषक घटक विविध आजारांपासून आपला बचाव करतात. दुधात कॅल्शियम आणि प्रथिनांसह पोटॅशियम, फॉस्फरस, ड, बी १२, अ आणि बी २ ही जीवनसत्त्वं आणि नियासिन असतं. कॅल्शियममुळे हाडं आणि दात बळकट होतात. प्रथिनांमुळे स्नायूंना शक्ती मिळते. पोटॅशियममुळे रक्तदाबावर नियंत्रण मिळवता येतं. शरीराला फॉस्फरसचीही गरज असते. बी २ हे जीवनसत्त्व अन्नाचं रूपांतर ऊर्जेत करायला मदत करतं तर नियासिनमुळे चयापचय क्रिया सुधारते. अ जीवनसत्त्व डोळ्यांच्या आरोग्यासाठी गरजेचं असतं. त्यामुळे पोषणमूल्यांचा स्रोत असणारं दूध दररोज प्यायला हवं.



## दृष्यमानता कमी, १६ तास नागपुरात ठिय्या : दिल्ली-कोलकाताचेही विमान आले

# अदिस अबाबा-ढाका विमान वळविले नागपूरला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

इथोपीअन एअरलाइन्सचे अदिस अबाबा-ढाका विमान दृष्यमानता पुरेशी नसल्यामुळे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहाटे ४.३० वाजता वळविण्यात आले. येथून पुन्हा ढाकाच्या दिशेने उड्डाण भरण्यास या विमानातील प्रवाशांना सोळा तासांचा विलंब झाला. तोपर्यंत त्या सर्व प्रवाशांचा मुक्काम नागपूर येथे होता.

निर्धारित वेळापत्रकानुसार, इथोपिअन एअरलाइन्सचे अदिस अबाबा-ढाका विमान रविवारी दुपारी ४ वाजून ८ मिनिटांनी उडाले. मात्र, दृष्यमानता पुरेशी नसल्यामुळे हे विमान अचानक नागपूरला वळविण्यात आले. सोमवारी पहाटे ४.३० वाजता दरम्यान हे विमान नागपूर येथे पोहचले. यामध्ये एकूण १७ प्रवासी होते. रात्री ८.३० वाजता दरम्यान हे विमान ढाक्याच्या दिशेने उडाले. वळविण्यात आलेल्या विमानाला पुन्हा उड्डाण भरण्यास सोळा तास विलंब झाल्याचे हे गेल्या काही वर्षांतील पहिलेच उदाहरण ठरले.

दरम्यान, येथे थांबलेल्या सर्व प्रवाशांना चहानाश्ता, भोजन देण्यात आले. विमान पुन्हा उडण्यास दीर्घ विलंब झाल्याबाबत प्रवाशांनी नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे. प्रवाशांचा रोष लक्षात घेत या घटनेबाबत इथोपिअन एअरलाइन्सने स्वतःच्या अधिकृत संकेतस्थळावर दिलगिरी व्यक्त केली.





दिल्ली येथे गेल्या काही दिवसांपासून धुक्यांमुळे विमानाचे उड्डाण करण्यासाठी आवश्यक असलेली दृष्यमानता उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. धुक्यांमुळे येथील विमानसेवा प्रचंड प्रभावित झाली आहे.

इंडिगो एअरलाइन्सच्या फ्लाइट क्रमांक ६ ई २७८८ या दिल्ली-कोलकाता विमानाला बसला. दृष्यमानता पुरेशी नसल्यामुळे हे विमान नागपूरला वळविण्यात आले. निर्धारित वेळापत्रकानुसार, या विमानाने दिल्ली येथून सोमवारी रात्री २.५२ वाजता उड्डाण भरले. पहाटे ६.२६ वाजता कोलकाता येथे विमान पोहचणे अपेक्षित होते. परंतु, खराब हवामानामुळे विमान नागपूर येथे वळविण्यात आले.

**विलंबाची मालिका सुरूच**

इंडिगो एअरलाइन्सचे ६ ई ५०३५ मुंबई-नागपूर विमानाला २ तास ४५ मिनिटे, ६ ई २२१२ दिल्ली-नागपूर विमानाला १ तास ३ मिनिटे, ६ ई ७०३७ इंदूर-नागपूर विमानाला १ तास ५ मिनिटे, ६ ई ६१२५ मुंबई-नागपूर विमानाला १५ मिनिटे, ६ ई ८६२ कोलकाता-नागपूर विमानाला ५५ मिनिटे, ६ ई २६०१ दिल्ली-नागपूर विमानाला १ तास १० मिनिटे विलंब झाला.

**आरटीपीसीआरबाबत गाईड लाईन नाही**

ह्यूमन मेटान्यूमो व्हायरस' (एचएमपीव्ही) या विषाणूच्या संसर्गा संदर्भात केंद्राकडून कोणतीही ॲडव्हायझरी न आल्यामुळे विमानतळावर आरटीपीसीआर वा इतर कोणतीही तपासणी सुरू केलेली नाही, अशी माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागातील सूत्रांनी दिली.

## आणखी किती अब्रू घालवणार?

### बांगलादेश प्रकरणी ॲड. प्रकाश आंबेडकरांचा सवाल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :



बांगलादेशाने भारतातील ५० न्यायाधीश व न्यायिक अधिकाऱ्यांचा प्रशिक्षण कार्यक्रम रद्द केल्याच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर थेट हल्ला चढवला आहे. मोदी तुम्ही भारतीयांची आणखी किती बेइज्जती करणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

बांगलादेशातील उठावानंतर पदच्युत पंतप्रधान शेख हसीन यांच्यावर राजधानी ढाका सोडून पळून जाण्याची वेळ आली होती. सध्या त्यांनी भारतात आश्रय घेतला आहे. यामुळे भारत व बांगलादेशातील द्विपक्षीय संबंध ताणले गेले आहेत.

याचा परिपाक म्हणून बांगलादेशाच्या अंतरिम सरकारने रविवारी भारतातील ५० न्यायाधीश व न्यायिक अधिकाऱ्यांचा प्रशिक्षण कार्यक्रम रद्द केला. हा एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम पुढील महिन्यात म्हणजे फेब्रुवारीत होणार होता. या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणखी किती इज्जत घालवणार? तुम्ही कोणत्या तोंडाने स्वतःला विश्वगुरू म्हणवून घेता? तुमच्या 'ॲक्ट ईस्ट' धोरणाचे काय झाले? अशा विविध प्रश्नांची सरबत्ती प्रकाश आंबेडकर यांनी यासंबंधी पंतप्रधान मोदींवर केली आहे. त्यांच्या या ट्विटचे राजकीय वर्तुळात वेगवेगळे पडसाद उमटत आहेत.

बांगलादेश अंतरिम सरकारने प्रशिक्षणासाठी भारतात येणाऱ्या ७० न्यायाधीशांचा कार्यक्रम रद्द केल्याचा दावा केला होता. हे सर्व न्यायाधीश व न्यायिक अधिकारी १० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या ट्रेनिंगसाठी भारत दौऱ्यावर येणार होते. न्यायाधीशांच्या प्रशिक्षणाविषयी २०१७ मध्ये भारत व तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना सरकारमध्ये एक करार झाला होता.

बांगलादेशी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर युनूस सरकारने हा कार्यक्रम रद्द केला. तत्पूर्वी एक दिवस अगोदरच युनूस सरकारने ५० न्यायाधीश राष्ट्रीय न्यायिक अकादमी आणि मध्य प्रदेशातील राज्य न्यायिक अकादमी येथे एक दिवसीय प्रशिक्षणात सहभागी होणार असल्याची घोषणा केली होती.

पण २४ तासांतच हा दौरा रद्द करण्याची घोषणा झाली. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा संपूर्ण खर्च भारत सरकार उचलणार होते. या कार्यक्रमांतर्गत निवडण्यात आलेल्या प्रशिक्षणार्थी न्यायाधीशांमध्ये जिल्हा व सत्र न्यायाधीश किंवा त्याच्या समकक्ष अधिकारी, अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश, सह जिल्हा न्यायाधीश, वरिष्ठ सहायक न्यायाधीश आणि सहायक न्यायाधीश होते.

## पुण्यात १३ टक्के बालकांना दोन वर्षांपूर्वीच संसर्ग

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ७ :

एचएनपीव्ही व्हायरसने महाराष्ट्रात देखील शिरकाव केला असून नागपूरच्या एका सात वर्षीय मुलगा आणि तेरा वर्षांच्या मुलीला याची लागण झाली आहे. मात्र, हा व्हायरस काही देशात आत्ता आलेला नाही, २०२२-२३ पासूनच हा व्हायरस भारतात आहे.

दोन वर्षांपूर्वीच पुण्यातील १३ टक्के बालकांना एचएमपीव्ही व्हायरसचा संसर्ग झाला असल्याची माहिती जेजे रुग्णालयाच्या डीन डॉ. पल्लवी सापळे यांनी दिली आहे.

एचएमपीव्ही व्हायरस आधीपासून भारतात आहे. पुण्यातील १३ टक्के मुलांना या एचएमपीव्ही व्हायरसचा संसर्ग झाला असल्याचे एका रिसर्चमधून समोर आले आहे. एचएमपीव्ही व्हायरस चीनमधून आलेला नाही. मागील अनेक वर्षांपासून हा व्हायरस आपल्या देशात आहे. त्यामुळे एचएमपीव्ही व्हायरसला घाबरण्याची गरज नाही, असेही डॉ. सापळे यांनी स्पष्ट केले आहे.

# लग्नाच्या वाढदिवशीच पती-पत्नीने घेतला गळफास

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

जरीपटका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मार्टीननगरात एका दाम्पत्याने लग्नाच्या वाढदिवशी आत्महत्या करण्यापूर्वी व्हिडिओ बनवला. तो व्हिडिओ व्हॉट्सॲप स्टेटसवर ठेवला आणि त्यानंतर गळफास घेऊन आत्महत्या केली.

मुलं होत नसल्यामुळे दाम्पत्याने जीवनयात्रा संपविल्याचे कारण समोर आले आहे. या घटनेमुळे जरीपटका परिसरात एकच खळबळ उडाली आहे. जारील ऊर्फ टोनी ऑस्कर मॉनक्रिप (५४) आणि पत्नी ॲनी जारील मॉनक्रिप (४५) अशी आत्महत्या केलेल्या दाम्पत्याची नावे आहेत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, टोनी आणि ॲनी यांनी प्रेमविवाह केला होता. दोघांचाही सुखी संसार सुरु होता. परंतु, त्यांना मुलं होत नव्हती. त्यामुळे आयुष्यात नैराश्य आले होते. दोघेही खचलेल्या मनाने एकमेकांना सांभाळून घेत संसार करीत होते.

करोनानंतर टोनीच्या हातचे काम सुटले. तेव्हापासून टोनी नैराश्यात गेला. गेल्या दोन वर्षापासून टोनीच्या हाताला काम नव्हते. त्यामुळे दोघेही पती-पत्नी उदास राहत होते. मुलं नसल्यामुळे आता जीवनाला काय अर्थ आहे? असा प्रश्न त्यांना नेहमी पडत होता. मात्र, नातेवाईक त्यांची समजूत घालून दोघांचेही मन सांभाळत होते. परंतु, टोनी आणि ॲनी यांनी जीवनयात्रा संपविण्याचा निर्णय घेतला.

गेल्या दोन महिन्यांपासून ते आत्महत्या करण्याच्या विचारात होते. दोघांनीही लग्नाच्या वाढदिवशीच आत्महत्या करण्याचे ठरविले. नातेवाईकांसह खिसमस साजरा केल्यानंतर दोघेही निराश राहत होते. ६ जानेवारीला त्यांना आत्महत्या करायची होती. त्यामुळे सोमवारी दोघांनीही सकाळपासून जेवनसुद्धा केले नव्हते. टोनी आणि ॲनी यांनी सोमवारी रात्री नातेवाईकांना फोन केला. विचारपूस केली आणि सर्व काही सुरळीत असल्याचे दाखवले.

मध्यरात्रीनंतर पती-पत्नीने घरात दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. सकाळी १० वाजले तरी टोनी आणि ॲनी झोपेतून उठली नसल्यामुळे शेजाऱ्यांनी त्यांना आवाज दिला.

मात्र, दरवाजा आतून बंद होता. महिलेने खिडकीतून डोकावून बघितले असता पती-पत्नी गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आले. तिने लगेच अन्य शेजाऱ्यांना माहिती दिली. एकाने जरीपटका पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेऊन दोघांचेही मृतदेह ताब्यात घेतले. या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली.

## देशमुख कुटुंबीय घेणार सीएमची भेट

■ वृत्तसंस्था, बीड, दि. ७ :

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून राज्यात वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकरणात कोणालाही सोडणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीच सांगितले आहे.

संतोष हत्या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवण्यात आला असून एसआयटीची देखील स्थापना करण्यात आली आहे. संतोष देशमुख यांचे कुटुंबीय आज संध्याकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहेत.

९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांची अपहरण करून हत्या करण्यात आली होती. सुमारे २५ दिवसानंतर या प्रकरणातील दोन आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आले. मात्र, यातील एक आरोपी अद्यापही फरार असून पोलिसांकडून शोध सुरू आहे.

# राष्ट्रवादीच्या दोन बड्या नेत्यांमध्ये जुंपली...

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मधील दोन ज्येष्ठ नेते छगन भुजबळ आणि माणिकराव कोकाटे यांच्यात राजकीय वाद उफाळल्याने पक्षात अस्वस्थता निर्माण झाली आहे. नुकत्याच एका बैठकीत दोघांमध्ये वाद तीव्र झाला. कोकाटे यांनी छगन भुजबळांवर स्थानिक विकासकामांसाठी आवश्यक निधी मिळवण्यात अपयशी ठरल्याचा आरोप केला.

भुजबळ यांनी या आरोपांना उत्तर देताना, कोकाटेंवर पक्षातील अंतर्गत गोष्टी सार्वजनिक करण्याचा आरोप केला. त्यांनी म्हटले की, अशा वादामुळे पक्षाचे नुकसान होते आणि लोकांमध्ये चुकीचा संदेश जातो. भुजबळांनी आपल्या कारकीर्दीत केलेल्या कामांची यादी देत कोकाटेंच्या टीकेला प्रत्युत्तर दिले.

दुसरीकडे, कोकाटे यांनी भुजबळांवर पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या सूचना पाळत नसल्याचा आरोप केला. त्यांनी पक्षाच्या धोरणांवर काम करण्याचे आवाहन केले आणि कार्यकर्त्यांमध्ये एकजूट राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

या वादामुळे पक्षातील तणाव उफाळला असून, अजित पवार यांनी या विषयावर दोन्ही नेत्यांची भेट घेऊन मध्यस्थी करण्याचे संकेत दिले आहेत. पक्षात एकी राखण्यासाठी लवकरच वरिष्ठ नेत्यांची बैठक बोलावली जाणार असल्याचे कळते.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटामध्ये आधीच पक्षांतराच्या घडामोडी सुरू असताना, या वादामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. या संघषार्मुळे पक्षाची एकजूट टिकवण्यासाठी वरिष्ठ नेत्यांना अधिक प्रयत्न करावे लागतील, परिणामी समज द्यावी लागेल, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

**: मुलखावेगळी माणसं :**

## कोपरगाव कन्येचा रांगोळीचा विश्वविक्रम



कोणत्याही मंगलकार्यात प्रवेशद्वारासमोरच अभ्यागतांचे लक्ष वेधून घेते ती, विविध रंगानी सजलेली अशी सुबक, सुंदर आणि आकर्षक रांगोळी. आपल्या महाराष्ट्रात एकापेक्षा एक असे रांगोळी रेखाटणारे कलाकार आहेत.

मात्र या सर्व कलाकारांपेक्षा अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगावच्या एका खेडेगावातील एक कन्या ही एकमेवाद्वितीय अशी कलाकार ठरते. कारण अर्थातच या मुलीने अगदी लहान वयात जगातील सर्वात प्रचंड मोठी अशी विश्वविक्रमी रांगोळी रेखाटण्याचा विक्रम आपल्या नावावर करून संपूर्ण महाराष्ट्राचेच नाव जगाच्या नकाशावर झळकावले आहे.

या मुलीचे नाव आहे सौंदर्या बनसोड. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून अगदी अलीकडेच सौंदयार्ने हा विश्वविक्रमी रांगोळी रेखाटण्याचा पराक्रम केला आहे.

सौंदर्या बनसोड हिला ही विश्वविक्रमी रांगोळी रेखाटण्यासाठी तब्बल २५० टन अर्थात २५ लाख रुपयांची रांगोळी लागली आहे. या रांगोळीद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांची विश्वविक्रमी रांगोळी रेखाटण्याचा यशस्वी प्रयत्न सौंदर्याने केला आहे. सौंदर्या १२ वर्षांची असून ती सातव्या इयत्तेत शिकते. सौंदर्याचे वडील संदीप बनसोड हे संगणक विक्री आणि दुरुस्तीचा व्यवसाय करतात.

संदीप याना दोन मुली असून त्यांची परिस्थिती ही जेमतेम असताना केवळ आपल्या मुलीचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी संदीप यांनी आपले सर्वस्व पणाला लावले. सौंदर्याने छत्रपतींची भव्यदिव्य रांगोळी सुमारे ११ एकर परिसरात रेखाटली असून त्यासाठी एकूण ४० लाखाचा खर्च आला. त्यासाठी संदीप यांनी कर्ज काढले तर, सौंदर्याच्या आईने आपले दागिने देखील गहाण ठेऊन हे पैसे उभे केले.

आपल्या मुलीचा हट्ट आणि तिचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी संदीप आणि त्यांच्या पत्नीने हा धाडसी निर्णय घेतला आणि सौंदर्याचे स्वप्न पूर्ण केले. २६ जानेवारी पासून दररोज सकाळी ८ पासून दिवस मावळेपर्यंत सौंदर्याने अथक परिश्रमातून शिवरायांची रांगोळी रेखाटली. छत्रपती शिवरायांच्या विचारांनी प्रेरित होऊनच सौंदयार्ने

**लोकमानस**

महाराजांची पूर्णाकृती रांगोळी २० दिवसात पूर्ण केली. आजवर जागतिक स्तरावर चार लाख स्क्वेअर फुटाच्या रांगोळीचा विश्वविक्रम होता, तो मोडीत काढत सौंदर्याने साडेचार लाख स्क्वेअर फुटाची रांगोळी रेखाटून हा विश्विवक्रम आपल्या नावावर नोंदवला आहे. या चिमुरडीचे सर्वस्तरातून कौतुक होतेय. मनात असलेली प्रचंड जिद्द, आत्मविश्वास आणि विश्वविक्रमाचा ध्यास घेऊन तो पूर्णत्वास नेऊन आपल्या अनोख्या कलेने महाराष्ट्राचे नाव जगभरात रोशन करणाऱ्या सौंदर्याला मनापासून सलाम. ■ ■ ■

## चीनच्या मेटांन्यूमोव्हायरसच्या संसर्गाचा भारताला धोका आहे का?

■ **मनीष मळेकर (पोलीस अधिकारी)**

होय. मागील सप्ताहापासून चीनमध्ये मेटान्यूमोव्हायरस सारख्या विषाणूने धुमाकूळ घातलेला असल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमांमधून वाचायला आणि पाहायला मिळत आहेत. या विषाणूमुळे श्वासाचा विकार बळावतो आणि हा विषाणू फुफ्फुसांवर हल्ला करतो आणि फ्फुफुस निकामी करतो इतका धोकादायक आहे.

म्हणूनच आपण सावध राह्यला हवे. मागे चार वर्षांपूर्वी कोरोना सारख्या भयानक विषाणूमुळे जगभरात लाखो लोक मृत्युमुखी पडलेच आणि याच विषाणूमुळे अक्षरशः जगाचे व्यवहार अनेक वर्ष ठप्प झाले होते. हे लक्षात घेऊनच आता भारत सरकारने रिस्क न घेता आताच सावध होऊन किमान चीनच्या प्रवाशांना काही महिने तरी भारतात प्रवेशास बंदी घालावी आणि या विषाणूला रोखावे.

■ **विद्या काळोखे (प्राध्यापिका)**

चीनमध्ये एच एम पी व्ही विषाणूचा उद्रेक झाल्याच्या बातम्या जरी येत असल्या तरी आपल्या महाराष्ट्रात अद्याप तरी अशा कोणत्याही रुग्णाची नोंद झालेली नाही. त्यामुळे कुणीही घाबरून जाऊ नये असे आपल्या सार्वजनिक आरोग्य विभागाने आणि केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने देखील स्पष्ट केले आहे. या एच एम पी व्ही प्रकारचा विषाणू हा केवळ फुफ्फुसावर हल्ला करत असला तरी रुग्णाला सर्दी आणि खोकल्याचा त्रास होतो मात्र रुग्ण औषधोपचाराने बरा देखील होतो असे तज्ज्ञांचे निरीक्षण आहे. त्यामुळेच या विषाणूच्या संसगार्चा आपल्या देशाला इतका धोका आहे असे वाटत नाही. कोरोना नंतर आपल्याकडे लसीकरण देखील झाले आहे त्यामुळे आपले नागरिक सुरक्षित आहेत. ■ ■

## रेंज रोव्हर स्पोर्ट्सची विक्री सुरु

रेंज रोव्हरने २०२५ च्या स्थानिक पातळीवर उत्पादित रेंज रोव्हर स्पोर्टसाठी विक्री सुरू करण्याची घोषणा केली आहे. 3.0' पेट्रोल डायनॅमिक HSE आणि 3.0' डिझेल डायनॅमिक HSE प्रकारांमध्ये उपलब्ध, रेंज रोव्हर स्पोर्ट हे अत्याधुनिक एमएलए-फ्लेक्स प्लॅटफॉर्मवर तयार केले आहे, जे पुढील-स्तरीय क्षमता, कार्यप्रदर्शन आणि हाताळणी तसेच अधिक कार्यक्षमता प्रदान करते .



खंबीर, आत्मविश्वासपूर्ण आणि स्नायूंनी युक्त, हे त्याच्या लहान ओव्हरहँग्स, मोठी चाके आणि निःसंदिग्ध, नाट्यमय प्रोफाइलद्वारे अतुलनीय रस्त्यावर उपस्थिती प्रदान करते. जे एल आर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक राजन अंबा म्हणाले, नवीनतम रेंज रोव्हर स्पोर्ट इष्टतेमध्ये एक नवीन बेंचमार्क सेट करते आणि आमच्या सर्वात प्रगत आणि गतिमानपणे सक्षम वाहनांपैकी एक आहे. छिद्रित अर्ध-ॲनलिन लेदर सीट्स, मसाज फ्रंट सीट्स आणि हेड-अप डिस्प्ले यांसारख्या नवीन वैशिष्ट्यांचा परिचय करून दिल्याने, आमच्या विवेकी ग्राहकांना रेंज रोव्हर स्पोर्टमध्ये आराम आणि तंत्रज्ञानाचा उन्नत अनुभव मिळेल.

नवीन रेंज रोव्हर स्पोर्टचा आतील भाग अत्याधुनिक आहे, ज्यामुळे हलकेपणा, ताकद आणि जागेची छाप निर्माण होते. त्याच्या हृदयात अपवादात्मक आराम, शैली आणि कल्याण यावर लक्ष केंद्रित केले आहे. २०२५ रेंज रोव्हर स्पोर्ट अर्ध-ॲनलिन लेदर सीट्स ऑफर करते. पुढील आणि मागील विंग्ड हेडरेस्ट, प्रदीप्त सीट बेल्ट बकल्स आणि ॲल्युमिनियम ट्रेडप्लेट्स यासारखी अतिरिक्त नवीन वैशिष्ट्ये, प्रत्येक प्रवास आरामात, आणि सुरेखतेमध्ये उत्कृष्ट आहे याची खात्री करतात. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या महिलेची निर्घृण हत्या

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ७ :

मॉर्निंग वॉकसाठी घरातून बाहेर पडलेल्या एका महिलेची गळा आवळत रस्त्यावर डोके आपटून निर्घृण हत्या करण्यात आली. शेजारच्या सोबत दोन महिन्यांपूर्वी झालेल्या किरकोळ वादातून हे हत्याकांड घडल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

जुने शहर पोलीस ठाण्यांतर्गत जुना हिंगणा मार्गावर सविता विजय ताथोड (४६) आपल्या मैत्रिणीसोबत मॉर्निंग वॉकसाठी गेल्या होत्या. यावेळी आरोपी धीरज चुंगडे याने पूर्ववैमनस्यातून सविता ताथोड यांचा घरापासून काही अंतरावरच रस्ता अडवला.

आरोपीने महिलेचा गळा आवळला. त्यांना खाली पाडून रस्त्यावर डोके आपटले. दुसऱ्या एका महिलेने व परिसरातील पुरुषाने सविता ताथोड यांना वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना यश आले नाही. आरोपीने सविता ताथोड यांना गंभीर जखमी केल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला.

या गंभीर प्रकरणाची माहिती मिळताच जुने शहर व स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेतली. घटनेचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आला.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. आरोपीचा शोध घेण्यासाठी श्वान पथकाला देखील घटनास्थळावर पाचारण केले. पोलिसांकडून आरोपीचा शोध घेतला जात आहे.

मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या महिलेची भररस्त्यात निर्घृण हत्या झाल्याच्या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. त्यामुळे शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. आरोपीच्या मुसक्या आवळण्याचे आव्हान अकोला पोलिसांपुढे राहील. दोन महिन्यांपूर्वीचा किरकोळ वाद विकोपाला गेला आणि महिलेला आपला जीव गमवावा लागला आहे.

**दोन महिन्यांपूर्वी झाला होता वाद**

सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार, दोन महिन्यांपूर्वी सविता ताथोड व आरोपीच्या कुटुंबामध्ये वाद झाला होता. या वादातून मारहाण देखील झाली होती. त्यावरून परस्पर विरोधी तक्रार सुद्धा दाखल करण्यात आली होती. या किरकोळ वादाचा राग आरोपीच्या मनात कायम होता. त्या वादातूनच आरोपीने आज महिलेवर गंभीर हल्ला करून हत्या केली. या घटनेमुळे ताथोड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## मनपा निवडणुकीसाठी राज ठाकरेंची बैठक

### फेरबदलाची शक्यता

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :

विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा दारुण पराभव झाला होता. मनसेचा एकही उमेदवार निवडून आला नाही. आता महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती.

राज ठाकरे यांच्या दादरमधील शिवाजी पार्कजवळील 'शिवतीर्थ' या निवासस्थानी ही बैठक पार पडली. राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकींसाठी तयारी करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच मनसे पक्षात मोठे फेरबदल होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

बैठकीत राज ठाकरे यांनी मुंबई महापालिका निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. महापालिका निवडणुकीच्या तयारी लागा अशा सूचना राज ठाकरे यांनी मनसेच्या विभाग अध्यक्षांना दिल्या.

महापालिका निवडणूकीपूर्वी मनसे नेत्यांची एक टीम तयार करण्यात येणार आहे. ही टीम राजकीय स्थितीचा आढावा घेईल. आगामी निवडणुकीत इतर पक्षांसोबत युतीबाबतच्या चर्चा, याबाबतचे अंतिम निर्णय घेताना टीमची मते लक्षात घेतली जाणार आहेत.

# मरणारा शेतकरी हिंदू नाही का?

## शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बच्चू कडू आक्रमक



■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ७ :

पश्चिम विदर्भात वर्षभरात ११५१ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या असताना या प्रश्नावर सरकारची संवेदनशीलता दिसत नाही. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये हिंदू शेतकऱ्यांची संख्याच जास्त आहे. राज्यात आणि केंद्रात हिंदुत्ववादी सरकार आहे. तरीही हिंदू शेतकऱ्यांवर स्वतःला संपवण्याची वेळ का येते? असा सवाल बच्चू कडूंनी सरकारला विचारला आहे.

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू आणि राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांच्या नेतृत्वात येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर शेतकरी आणि मेंढपाळांच्या विविध मागण्यांसाठी वाडा आंदोलन सुरू करण्यात आले आहे. यावेळी माध्यमांशी बोलताना बच्चू कडू यांनी सरकारवर टीका केली.

बच्चू कडू म्हणाले, सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागत आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये हिंदूंचीच संख्या जास्त आहे. तरीही केंद्रातील आणि राज्यातील हिंदूत्ववादी सरकारला शेतकऱ्यांचा कळवळा का नाही, हा प्रश्न आहे. आम्ही शेतकरी, शेतमजूर, मेंढपाळांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरलो आहोत. आंदोलनाची ही आमची पहिलीच वेळ नाही. आमचा जन्मच आंदोलनासाठी झाला आहे. पदावर असो किंवा नसो, सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्षाची भूमिका सोडणार नाही. सरकारने आमच्या मागण्यांची दखल घ्यावी, पोलिसांनी आंदोलकांची अडवणूक करू नये, अशी अपेक्षा असल्याचे कडू म्हणाले.

राज्यातील मेंढपाळ सरकारचे उंबरठे झिजवित असताना मुख्यमंत्री कुठलेही ठोस पाऊल उचलत नाहीत. शेतकरी व मेंढपाळांसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. सोयाबीन, तूर, कापसाचे भाव कोसळले आहेत. दुसरीकडे बियाणे, रासायनिक खते, शेणखताचे भाव वाढत जात आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांनी कुटूंबाचा उदरनिर्वाह कसा चालवायचा? असा सवालही कडू यांनी विचारला आहे.

येथील संत गाडगेबाबा मैदानावरून मोर्चाला सुरूवात झाली. मेंढपाळाच्या वेशात घोड्यांवर स्वार होऊन बच्चू कडू आणि महादेव जानकर हे विभागीय आयुक्त कार्यालयावर पोहचले. मोर्चादरम्यान कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.